
# डॉ. नितीन मोरे

# व्यक्ती आणि कथा २

## ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..



# व्यक्ती आणि कथा : २

## ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# व्यक्ती आणि कथा : २

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# व्यक्ती आणि कथा : २

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २९ जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे एकतिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# व्यक्ती आणि कथा : २


## ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..

डॉ. नितीन मोरे

# व्यक्ती आणि कथा : २

## अनुक्रम


१. ढेप
२. अज्ञानेश्वर
३. रघुवीर
४. देवकुळे मास्तर
५. औरंगजेब
६. सगुणाबाई
७. नटसूर्य
८. धृतराष्ट्र
९. निवृत्तीबुवा
१०. साहेब
११. रूपमती


DON'T TREAT PEOPLE
AS BAD AS THEY ARE,
TREAT THEM AS GOOD
AS YOU ARE.
PRIME WAY OF LIFE

# ढेप !

ती एक गूढ होती. तशी माझी मैत्रीण म्हणावी अशी फार जवळची होती असे नाही. पण माझ्या शेजारच्याच रूममध्ये रहायची ती होस्टेलला त्यामुळे तशी ओळख होती माझी तिच्याशी.

एकलकोंडी होती ती. अभ्यासू म्हणता येईल पण हुशार म्हणावे का तिला? कारण रूममध्ये तासनतास् अभ्यास करायची, पण परीक्षेत मात्र दिवे लागलेले दिसायचे तिचे. बहुतेक विषय डोक्यावरून जायचे तिच्या. मॅथॅमॅटिकल कॅल्क्युलेशन्स मात्र झटझट करायची. एक चिकाटी होती तिच्याकडे. रेटून बसायची अभ्यासाला. अशी की तासन् तास उठायची नाही एका जागेवरून. बाकी पोरी तिला गुळाची ढेप म्हणायच्या. खरेतर सगळ्याच तिच्याबाबतीत गोंधळलेल्या असाव्यात. गुळाची ढेप का तर मुंगळे तिला असेच तासन् तास चिकटतात म्हणून! म्हणजे ही ढेप की मुंगळा.. किंवा मुंगळी? पण इथे लॉजिकचे काम नाही. पोरी तिला

ढेपच म्हणायच्च्या हे खरे.. म्हणजे तिच्या रूम पार्टनरला म्हणायच्च्या, 'ढेप दिसत नाही आज..' किंवा 'ढेप काय पुस्तके खाते की काय .. जेवायला मेसमध्ये दिसत नाही आजकाल..' वगैरे.

तर ही ढेप.. म्हणजे तिचे नाव होते अस्मिता आसोलकर. अस्मिता.. म्हणजे न हसणारी अशी फोड केली तर योग्य होते नाव तिचे! तर ती अशी होती .. एकटी, एखादी मैत्रीण होती तिला, कमला कापडिया नावाची. तीही हिच्या सारखीच. म्हणजे एकलकोंडी. त्यामुळे दोघांचे जमायचे की काय न कळे. तर दोघी बसायच्च्या अभ्यासाला कधी कधी. सगळ्या कॉलेजची पोरंपोरी तारूण्यसुलभ उत्साहाने उफाळून कट्ट्यावर नि नाक्यावर टाइमपास करत असताना अस्मिता आणि कमला गहन विचारात एकीकडे बसलेल्या दिसत. त्यांच्या लेखी आजूबाजूला कुणी नव्हतेच की बाकीच्या गर्दीला ह्या दोघी आहेतच की नाहीत हे वाटावे अशी परिस्थिती. लॅब वर्कमध्ये अस्मिताला बोलावे लागायचे इतरांशी, तेही संकट असावे असा चेहरा असायचा तिचा. पुस्तके आणि वह्या नि जर्नल्स घेऊन बसायची ती अशी की आजूबाजूला दिसायचे नाही तिला काहीच. इतके करूनही वेळेवर सबमिशन्स न झाल्याने क्लासमध्ये ओरडाही खायची ती खाली तोंड करून!

मला तिच्याबद्दल कुतूहल होते. कुणी इतके जगात राहून जगापासून दूर कसे राहू शकते? त्यात तिच्या अबोलपणाने ती स्वभावाने बरी की वाईट हे ही कोणास ठाऊक नव्हते. संध्याकाळी ती एकटी असताना कधीमधी बोलायची माझ्याशी ती. गावाकडची ती. घरी पाच सहा पोरंपोरी. त्यात हिला शहरात शिकायला पाठवली हाच चमत्कार होता. तिच्या छोट्याशा गावास तिचे फार कौतुक होते म्हणे. तिकडच्या लोकांत इतकी हुशार अजून कोणी निपजली नव्हती. गावात शाळेचीच बोंब मग कॉलेजात कोण जाणार? गावातील पोरंही टवाळक्या करण्यात हुशार. त्यात दहावीत हिने स्वतःच्या मेहनतीने पंच्याऐंशी टक्के मिळवले .. असला आकडा तोवर परीक्षेच्या मार्कांत कुणी पाहिला नव्हता! चिकार पोरंपोरी असणाऱ्या कुटुंबात एखादी देवाधर्मास दान दिली जाते तशी हो नाही करता तिच्या घरच्यांनी हिला 'शिकायला' दिली. गावच्या वातावरणातून शहरातल्या इंग्रजाळलेल्या पोरापोरींत ही तशी दबली जाणे साहजिकच होते. पण मुळातच अस्मिता अबोल असावी, त्यात इकडे आगीत तेल ओतल्यासारखे झाले असणार.

"तू इतकी अबोल कशी गं?"

मी विचारले तिला एकदा.

म्हणाली, "बोलायचं येतं मनात .. सुचतं काहीकाही पण बोलेतोवर विसरायला होतं.. कधी वाटतं कुणी हसले तर? त्यापेक्षा गप्प राहणे चांगले." आणि आता तर कुणी तिच्या तोंडून काही ऐकण्याची अपेक्षा पण करत नाहीत. उलट काही बोलली ती तर तोंडात बोटे घालतील सगळे.

"पण म्हणून इतकी गप्प गप्प?"

"जाऊ देत. शहरातली तू.. तुला नाही कळणार."

एकदा ती गावची हकीकत सांगत बसली मला. इतरांशी न बोलणारी माझ्याशी थोडी मोकळी व्हायची. मीही तिच्या बोलण्यात प्रतिप्रश्न करत नसे.. संवादात दोन्ही बाजू बरोबरीच्या असल्या तरच संभाषण पुढे जाते. मी माझे वाक्चातुर्य दाखवायला गेले असते तर आमचा संवादच खुंटला असता. त्यामुळे तिला बोलते करणे एवढाच ॲजेंडा ठेऊन बसायचे मी.

माझ्या इतर मैत्रीणी मात्र मी तिच्याशी इतके काय बोलते आणि त्याहूनही इतकी कशी बोलते याचे आश्चर्य करायच्या. आणि हाऊ डू आय टॉलरेट हर.. हा ही प्रश्न पडायचा त्यांना. पण एव्हरी वन हॅज हर स्टोरी .. ती ऐकून घेणे.. आणि समजून घेणे महत्त्वाचे. बाकी पोरी त्यासाठी मला वेड्यात काढत..

येस! काहींनी तर ढेप.. ती ॲक्च्युअली वेडी आहे.. म्हणत मोडीत काढलेली तिला.

ती वेडी तर नव्हतीच. शहाणी होती. पण आपल्याकडे बोल बोल बोलणाऱ्या हुशार आणि चंचल मुलीच नायिका असतात .. एखादी घुमी किंवा अंतर्मुख असणारी कोणी नायिका म्हणून दिसते का? त्यामुळे शहाणी असली तरी ही ढेप वेड्यात काढली गेलेली!

गावी तिच्या शेती आहे, दोन बैल आहेत, विहीर आहे, मोटेचं पाणी आहे. पाऊसपाणी उत्तम म्हणून सारे हिरवेगार आहे. खाऊनपिऊन सुखी सारे. दर घरी पाच सहा पोरंपोरी. त्यामुळे शेतात कामाला हात आहेत. शिकावे म्हटले तर त्याची गरजच काय हा मुद्दा बिनतोड वाटतो त्यांना. शिकून काय साहेब होणार .. त्यापेक्षा शेतात काम करेल तर दोन हात जास्त मिळतील कामाला .. अशात हिला अभ्यासाची गोडी. शाळेत एक दिवस चुकायचा नाही. धो धो पावसात ही दप्तर सांभाळत शाळेत पोचायलाच हवी ती. त्यात गणित म्हणजे हातखंडा. इंग्रजी शाळेतल्या शिक्षकांनाच नाही येत तर पोरांना काय शिकवणार ते..

ही शेवटची गोष्ट असणार हिच्या बुजरेपणाला अजूनच खोलात नेणारी. गणितात हुशार ती.. आता कशीबशी मॅथ्समध्ये

दिवे लावतेय.. आपल्याकडची हुशारी सगळी इंग्रजी भाषेच्या ज्ञानाच्या तराजूत मोजली जाते.. फाड फाड इंग्रजीतून चुकीची उत्तरे चालतात पण चुकीच्या इंग्रजीत बरोबर उत्तरे नाही चालत! इंग्रजी न येणारा जात्याच इकडे निर्बुद्ध असतो.. बिचारी अस्मिता.. त्या तिच्या अबोल स्वभावात हे अजून एक कारण गप्प गप्प रहायला. गावाकडची, साधी, अबोल आणि त्यात इंग्रजी जेमतेम .. तिच्या वागण्यास कॉलेजात वेडेपण समजले जाणे साहजिक होते. खरेतर इंडिया विरूद्ध भारत संघर्षाचा हा एक भाग होता म्हणा!

मग तासन् तास ती इंग्रजीशी झटापट करत अभ्यास करत बसतेय.. आपल्या इंग्रजी भाषेत जर्नल्स पूर्ण करतेय.. तिच्याबद्दल सहानुभूती दाखवावी म्हणावे तर तशी संधी कधीच तिच्या वागण्याने मिळायची नाही. गप्प गप्प बसून तिची मूठच झाकलेली ठेवायची.. अशी की त्यात लाखभर रूपये खरेच असतील तरी कळू नये कुणाला.

थोडीफार तिला मी ओळखू लागले तशी मला तिची कीव यायला लागली. फक्त एका कुठल्याश्या खेड्यातून, म्हणजे भारतातून इंडियात आली ती तर तिची अशी फरफट व्हावी?

तिला मी एकदा म्हणालेही, "अस्मिता .."

"तू नाही मला ढेप म्हणत?"

तिच्या प्रश्नाने मी गार पडले अगदी. तिला ढेप म्हणतात हे ही तिला ठाऊक होते तर. मी आताच नव्हे तर चुकूनही तिचा तसा उल्लेख आजवर नव्हता केला कुठे, अगदी तिच्या मागे ही. त्यामुळे मला तसे अपराधी वाटावे असे काही नव्हते.

"छे गं. पोरंपोरी ना वाह्यात आहेत अगदी. उगाच कुणामागे हात धुवून लागणे मला नाही पटत. पण तुला मी विचारतेय.. तुला हवे तर थोडे इंग्रजी शिकवीन मी. तुझा प्रॉब्लेम हुशारीचा नाही .. भाषेचा आहे. मूळ इंग्रजी तुला येते.. त्यात फक्त सुधारणा केली की झाले.."

यावर ती काहीच बोलली नाही. परत गप्प होऊन आपल्या कोषात गेली.

सुरवंटाचे एक बरे असते.. कोषावस्थेतून कधी ना कधी बाहेर पडायचेच असते.. पण स्वतःच विणून घेतलेल्या कोषातून ही कशी नि कधी येणार होती बाहेर? मुख्य म्हणजे तिलाच तसे यावेसे वाटत असेल तर ना?

ती मला त्यामुळे अजूनच गूढ वाटायला लागली. गंमत काय आहे पहा.. कोणी जास्त बोलत असेल तर आपण म्हणतो, नुसत्या बोलण्यावर जाऊ नका .. बोलायला काय कुणी काहीही बोलेल..

कुणी बोलत नसेल तर, न बोलून शहाणी! काही असो एखादा व्यक्ती कशी असेल याचा अंदाज न बोलणाऱ्यांत येत नाही हे खरे.

आमची शेवटच्या सेमिस्टर आधीची सुट्टी होती. सगळे आपल्या घरी पांगलेले. गावच्या पोरांना गावी जायचेही असते नि नसते ही. ही गोष्ट मी होस्टेलला पाहिली म्हणून विश्वास बसला माझा. नाहीतर म्हटले असते, काहीपण सांगतात लोक.

गावाहून येतात शिकायला शहरात त्यांच्या डोळ्यांत मोठमोठी स्वप्ने असतात. मुख्य म्हणजे गावच्या शेतीवर अवलंबून असणे संपवायचे असते. जमेल तशी कर्जे फेडायची असतात. शहरात आले की गावच्या घरी खाणारे एक तोंड कमी होते.. तेवढाच घरी दिलासा. पण म्हणून घरची ओढ तर कमी होत नाहीच. होस्टेलला राहून वरची कामे केली सुटीत तर चार पैसे कमवता येतात .. जमवता नाही आले तरी कॉलेजच्या खर्चाला होतात. मग मध्यम मार्ग म्हणून चार दिवस घरी भोज्याला हात लावून पोरं परततात नि शहरात मिळेल त्या कामाला लागतात. अस्मिता पण तशीच आलेली गावाहून. पण तिचे गाव तसे संपन्न असावे. खाण्यापिण्याची ददात नसावी. त्यामुळे ती सुटीत गावीच जायची तशी गेलेली. शेवटच्या सेमिस्टर नंतर तर सगळेच पांगणार

वेगवेगळ्या दिशांना. त्यामुळे सगळीच पोरंपोरी आता पुढे भेट नाही म्हणून विचार करायला लागलेली. चार वर्षात नाही म्हणायला चांगलेच बंध निर्माण होतात, विशेषतः आमच्यासारख्या होस्टेलला राहणाऱ्यांत.

मी आपल्या घरी येऊन परतले. सुटी म्हणजे घरी लाड करून घ्यायचे, खाऊन पिऊन परत यायचे. माझ्या सारख्या शहरी म्हणा किंवा सुस्थित असणाऱ्यांचे म्हणा, एक चांगले असते. पुढे मागे फक्त अभ्यास नि तो संपत आला की प्लेसमेंटचा विचार. आमच्या ग्रुपमध्ये याबद्दल डिसक्शन्स झालेली. डायरेक्ट नोकरी मिळण्याबाबत आमचे कॉलेज फेमस होते. शेवटच्या टर्ममध्ये प्लेसमेंटचा इंटरव्ह्यू .. त्यासाठी जय्यत तयारी. मग मिळणारी नोकरी नि स्वकमाईचे पहिले पैसे.. त्याबद्दल कसले कसले प्लॅनिंग. अस्मिताशी ही एकदा बोललेले मी याबद्दल. तर ती म्हणाली, "माहिती नाही. नोकरी म्हणजे फार झाले.. शिकले मी, ती ही इंजिनियर. यापुढे अजून काही मागणे म्हणजे गावी कठीण आहे.."

सुटी संपवून सगळे आले परत. अस्मिताचा पत्ता नव्हता. एका टर्मसाठी कोणी शिक्षण सोडणार नाही अर्धवट .. तिच्या त्या मैत्रिणीला, कमलालाही नव्हते ठाऊक काय झाले ते.

दोन दिवसांनी अस्मिता आली, सारे थक्क होऊन पाहात राहिले तिच्याकडे. अस्मिता साडी नेसून, डोक्यावर पदर घेऊन नि हातात हिरव्या बांगड्यांचा चुडा घालून अवतरली. गळयात ठसठशीत मंगळसूत्र .. तिचा सोडायला आलेला बहुधा तिचा नवरा असावा. त्याचा निरोप घेऊन ती होस्टेलला आली.. होस्टेलला एकच खळबळ माजली. आजवर खिजगणतीत नसलेली अस्मिता ऊर्फ ढेप अचानक सेंटर ऑफ अट्रॅक्शन बनली. कुणी कुणी तिला चिडवू लागले तर कुणी काही विचारायला लागले. ती आधीच अवघडलेली अजून अवघडून अजूनच चुप्प झाली.

थोडे दिवस जाऊ दिले नि एके दिवशी तिला मी विचारले तिच्या लग्नाबद्दल. मी विचारेपर्यंत बाकीच्यांचा उत्साह म्हणा की नाक खुपसणे म्हणा.. संपले होते..

"काय एकाएकी लग्न? डायरेक्ट?"

"हे होणारच होते एक दिवस .."

"म्हणजे?"

"आमच्याकडे सोळा वर्ष झाली म्हणजे फारच मोठी होते मुलगी. माझ्यासाठी अपवाद कसा काय केला आईबापानी ते त्यांनाच ठाऊक.."

"म्हणजे?"

"माझी माय म्हणाली मला, स्मिते, तू हुशार आहेस, शिकतेस.. आम्हाला नुसतेच कौतुक नाही, अप्रूप आहे त्याचे. फार पूर्वी आनंदीबाई म्हणून कोणी बाई डॉक्टरीण झालेली परदेशी जाऊन. तिच्याइतके नाही पण तसेच धाडस पोरी तुझे .. माय आणि बाबा दोघांनी लोकांची तोंडं गप करत काढली इतकी वर्षे. शेवटची परीक्षा आली जवळ.. सहा महिने बाकी फक्त. तेव्हा ती देऊ देण्याचे कबूल करून जमवले लग्न माझे .."

"आणि तू तयार झालीस?"

"अगं, मी माय नि बाबाला किती त्रास देणार अजून? माझ्यासाठी त्यांनी गेली चार पाच वर्ष सगळ्या गावाचे ऐकून घेतले. गावातले लोक पण काय.. एकीकडे कौतुक करतात .. दुसरीकडे जनरीत दाखवतात .. तिसरीकडे भीतीही. एकटी मुलगी, शहरात राहणारी .. तिचा काय भरवसा म्हणून. मी सारे ऐकून घेतले.. कारण माझ्या माय नि बाबानी सारे कानाआड केले.. आता एक मुलगा असा आला तर मी नाही म्हणून त्यांना तोंडघशी पाडू?"

इतक्या वर्षात मी इतकी सारी वाक्ये बोलताना तिला पहिल्यांदाच पाहात होते. मी तिची जवळची मैत्रीण होते म्हणून नसणार तर कुणाला तरी तिला हे सांगावेसे वाटत असणार म्हणून

बोलली असावी ती इतके सारे. इथे आम्हाला काठावर पास होणे संकट वाटते.. नोकरी मिळणार कशी नि असले प्रश्न.. आणि तिकडे तिला नुसती डिग्री मिळाली तरी इतिहास घडणार होता तिच्या गावी.. वाटले, ही गावात जन्मली नसती तर? आमच्या सारखीच कुठे चमकत असती.. इतक्या दिवसांत मला तिच्या हुशारीचा अंदाज आलाच होता.. परीक्षेतले मार्क्स काही म्हणोत. आता तिच्या चिकाटीचा नि शहाणपणाचाही येत होता. आणि हिला आमच्यातलेच काही शहाणे वेडी ठरवायला निघालेले!

"पण आम्ही सगळे आता नोकरी शोधणार.. कामाला लागणार .. आणि तू?"

"नवरा चांगलाय माझा. शिकलेला नाही फार. आमच्यात शिकलेला मुलगा मिळणे कठीण, कुणी शिकत नाही. उगाच वेळ वाया जातो म्हणतात. त्यापेक्षा कामाला लागतात सगळे. खरे सांगू ना तर त्यांना शिकायचे नाही असे नाही, पण ही मेहनत कोण करणार? शिकल्यावाचून प्रगती नाही .. या जगात राहायचे तर शिक्षणाला पर्याय नाही. नुसते इंग्रजी येत नाही म्हणून किती मागे पडले मी.. जगाबरोबर धावायचे तर आत्मविश्वास पाहिजे .. तोच शिक्षणाने मिळतो.. तेवढा मिळाला .. खूप झाले. आता पुढची पिढी याच्यापुढे जाईल. काही मुली गावच्या शिकायला लागल्या

तरी माझी मेहनत कामाला आली म्हणता येईल. लग्न काय उद्या व्हायचे ते आज झाले.. पण सासरी कौतुक आहे शिकल्याचे.. याहून जास्त काय पाहिजे? पण सांगते तुला .. कौतुक जास्त मला माझ्या लोकांचे. आपल्याकडे बाई असणे हेच पाप.. त्यात माझ्या शिक्षणाचे कौतुक करणारी दोन्ही घरे मिळाली.. याहून काय पाहिजे?"

आणि आजवर न हसलेली अस्मिता चक्क हसली.

अस्मिता कशीबशी काठावर पास होत जाणारी.. आणि आत्मविश्वासाच्या गोष्टी करत होती. कदाचित त्याच्यामुळेच तर आता इतक्या खोलवर जाऊन विचार करत असावी नि ते सगळे मला सांगत असावी ती. अस्मिता सांगत होती ते शिक्षण.. तेही मुलींचे.. मी एका शिकल्या सवरलेल्या घरातली. आई माझी. जेमतेम मॅट्रिक. त्यानंतर लग्न झाले नि शिक्षण सुटले तिचे. ती काय कमी हुशार असणार? आजी माझी .. हुशार होती फार. चटाचटा तोंडी हिशेब करायची काय.. सत्तरीत लिहायला शिकली ती.. गावाहून पत्र लिहायची .. ती काय कमी हुशार असणार? पण आमच्या पुढारलेल्या किंवा तसे समजले जाणाऱ्या समाजातही दोघींना नाही शिकू दिले तेव्हा. आता परिस्थिती बदलली. खेड्यातली ही अस्मिता आज सगळे काही सोसून शिकतेय.. नवा

मार्ग दाखवतेय.. आमच्यासारखे शहरी लोक तिला वेडी समजताहेत.. मार्कशिटवरच्या पॉइंट्सवर तिची हुशारी मापली जातेय.

.. आमची परीक्षा झाली. अस्मिता नेहमीप्रमाणे काठावरच पास होऊन तिच्या घरी निघून गेली.

आमच्या त्या कॉलेजच्या दिवसांतल्या कित्येक जणी लक्षात नाहीत माझ्या. तशा इंजीनियर बनणाऱ्या मुली थोड्याच.. त्यात अस्मिता इंजिनियर का बनली असेल? कुणास ठाऊक.. पण ही अस्मिताला मात्र विसरू म्हणता विसरले नाही मी कधी. विसरले नाही म्हणायला कारण आहे.. तिचा तो ढिम्म चेहरा नि सदा गोंधळल्यासारखी ती डोळ्यांसमोर यायची माझ्या नि ते लग्नानंतरचे तिचे आत्मविश्वासाबद्दल आत्मविश्वासाने बोलणे ही आठवायचे अधूनमधून.. आमच्यापैकी सगळे कुठे कुठे नोकरीला लागले. मी मुंबईत परत आले नि इथेच जॉबवर लागले.

खूप वर्षांनी ती भेटली अशीच. मुंबईत. बरोबर तिचा नवरा नि हाताला धरून चालणारी तिची परकर पोलक्यातली मुलगी. मी ओळखले नाही तिला, पण तिनेच हाक मारली मागून..

क्षणात ओळख लागली ..

इतक्या वर्षांपूर्वीचा तिचा चेहरा.. तो तसाच होता. पण आता तिच्या बोलण्यात एक स्मार्टनेस आलेला दिसत होता..

"हे माझे मिस्टर.. आम्ही दोघी एकाच कॉलेजात होतो.. ती टॉपला नि मी तळाला.."

क्लासमध्ये आपल्या तळाशी असण्याबद्दल सहज उल्लेख करत ती नवऱ्याकडे पाहात म्हणाली.

"आता इकडे कुठे?"

"अगं इकडेच असते मुंबईत मी.."

"तू आणि मुंबईत?"

तिची मुलगी चूळबुळ करत होती जाण्यासाठी..

"ही माझी एकुलती एक लेक.. आश्विनी.. हुशार आहे.."

"असणारच.. हुशार आईबापाची लेक ती.. हुशारच असणार.."

"अगं हिच्यासाठी आलो आम्ही इकडे. यांना मिलमध्ये चांगला जॉब मिळाला .. मी ही घेते शिकवण्या मुलांच्या.. म्हटले मुलगी हुशार आहे. खेड्यात राहिली की माझ्यासारखी व्हायची.."

ती अजून खूप काही बोलत राहिली. त्यावेळची अबोल म्हणा किंवा काही म्हणा अशी ती.. आपल्या मुलीसाठी शहरात, तेही मुंबईत येऊन राहिली होती.. आपल्या गावच्या लोकांना पटवून मुलीच्या शिक्षणासाठी इकडे येणे किती कठीण गेले असणार हिला? ती म्हणाली होती तो आत्मविश्वास.. तोच उपयोगी पडला असणार तिला यासाठी. त्याच बळावर सारे काही. हिची मुलगी आता नक्कीच शिकणार.. हिने पाया भरण्याचे काम केलेय.. त्यावरची इमारत तिची आश्विनी बांधेल.. ती तेव्हा म्हणाली ते खरेच होते.. पुढची पिढी आता पुढेच जाणार.. याच आत्मविश्वासाच्या जोरावर.

मला आठवले.. कॉलेजात पोरापोरींच्या भाषेत ती एक ढेप! गुळाची ढेप! तशीच ढेपेसारखी ढिम्म दिसणारी.. पण हे ढेप म्हणणे तिला एकाएकी योग्य वाटू लागले मला. एखाद्या ढेपेसारखी अडिग आणि अचल ती.. इंग्रजीत अनशेकेबल म्हणतात तशी! ढेप म्हटली जाणारी अस्मिता.. केवढी झेप घेतलीय तिने.

निरोप घेऊन ती निघाली. मीही आपल्या कामासाठी पुढे निघाले .. समोरून एक रिक्शा चाललेली .. तिच्या पाठीमागे लिहिलेले..

मुलगी शिकली.. प्रगती झाली..

# अज्ञानेश्वर

आमच्या जगदंबेच्या देवळाच्या कठड्यावर तो माझे बौद्धिक घेतल्यासारखा बोलतो. एखाद्याने ज्योत से ज्योत जलाते चलो म्हणावे तसा हा जणू फुंकरसे ज्योत बुझाते चलो सांगायचा प्रयत्न करतो. तरी बरे, त्याचे नाव प्रकाश आहे! प्रकाश प्रभाकर वासरमणी अशा नावाचा तो काही शतके आधी इंग्लंडमध्ये शेक्सपियरच्या सेवेत वगैरे असावा पूर्व जन्मी. इंग्लंडात लाईट, ब्राईट किंवा एन्लाईट असले काहीतरी नाव असू शकेल त्याचे तेव्हा. आणि त्याला पाहूनच शेक्सपियरने नावात काय आहे याचा शोध लावला असावा. त्यामुळे पुनर्जन्मावरचा विश्वासही दृढ झाला आहे माझा.

प्रकाशचे आपले वेगळे तत्वज्ञान होते. त्याच्या समोर तत्वज्ञान शब्द वापरण्याची चोरी, तो अतत्वज्ञान म्हणेल किंवा खरेतर तत्व अज्ञान म्हणेल. प्रकाशसमोर ज्ञानरूपी प्रकाशाची काय मातब्बरी? त्याच्या मते अज्ञान आहे म्हणून ज्ञानाला किंमत आहे! "उद्या सगळेच झाले ज्ञानी तर कोण कोणाला काय शिकवणार? ज्ञान दिल्याने ज्ञान वाढत असेल तर ते वाटण्यासाठी कुणीतरी

अज्ञानी हवाच. आणि माझे काय आहे ना.. उगाच कुणाच्या तोंडाकडे पाहात बसत नाही मी. शिवाजी जन्माला यावा पण इतरांच्या घरात असला प्रकार नाही माझ्याकडे. सुरूवात करायची ती स्वतःपासूनच. आपणच उदाहरण घालून दिले नाही तर उगाच गप्पा मारत बसण्यात काय अर्थ आहे सांग? म्हणून मी अज्ञानीच राहणे पसंत करत तसा वसा घेतला. आणि न उतता नि मातता टाकून नाही दिला तो वसा."

एखाद्या प्रवचनकाराने उकलून सांगावा कसला अर्थ तसा तो आपल्या जास्त न शिकल्याचा म्हणजे त्याच्या मते त्याच्या अज्ञानाचा अर्थ सांगत होता.

प्रकाशने दहावीनंतर शाळा सोडली. आयटीआयचा डिप्लोमा करायला गेला पण तो काही महिन्यांतच अर्धवट सोडून एका कॉलेजात शिपाई म्हणून लागला. आम्ही अगदी कॉलेजच्या ॲडमिशनच्या रांगेत उभे असताना हा कॉलेजातच एखाद्या साहेबाच्या केबिनबाहेर उभा राहात होता. महिन्याकाठी पगार घेत होता. त्यामुळे आम्ही ग्रॅज्युएट होऊन सुशिक्षित बेकारीचे क्वालिफिकेशन मिळवेतोवर हा नोकरीत सिनियर झालेला.

प्रकाशची आणि माझी दोस्ती होतीच शाळेपासूनची. फक्त हुशार मुलांशीच मैत्री करत जा, प्रकाश सारख्या ढ मुलाशी नको असले सल्ले मला घरून कधी मिळायचे नाहीत. त्यामुळे त्याची नि माझी मैत्री अबाधित होती. थोडासा अभ्यासात कच्चा म्हणावा तर कित्येकदा कुठल्याशा परीक्षेत चांगले मार्क्स मिळवून जायचा. कधी कठीण गणिते पण चुटकीसरशी सोडवायचा. त्यामुळे तसा बुद्धीने कमी नव्हताच तो. अभ्यासाचा कंटाळा हाच मुद्दा असावा तेव्हा. किंवा अजून काही कारण असावे कोण जाणे. पण होता तो तेव्हा असा हे खरे. पुढे आम्ही नोकरीत चिकटलो. आम्ही म्हणजे मी आणि माझ्यासारखेच डिग्री होल्डर, सुशिक्षित बेकार म्हणून भटकणारे नोकरीच्या शोधात. आणि गंमत म्हणजे ज्या कॉलेजात लागलेला प्रकाश त्याच कॉलेजात मी क्लार्क म्हणून चिकटलो. तब्बल दहा एक वर्षे उलटून गेलेली मध्ये. प्रकाश त्या कॉलेजात चांगलाच रूळला होता इतक्या वर्षात.

दोन चार दिवसांनी कँटीनमध्ये भेटला. त्याच्या युनिफॉर्ममध्ये होता. चहा पिता पिता गप्पा झाल्या. मजेत होता गडी. शिपायाची नोकरी अंगी लागली .. पगार वेळेवर, जास्त कठीण काम नाही .. कॉलेजची पोरंपोरी आजूबाजूला, त्यामुळे कायम उत्साही

वातावरण वाटायचे त्याला तिथे. मला कॉलेजच्या  वातावरणात तसे काहीच दिसले नव्हते अजून, पण हा खुशीत होता. जणू शिपाई बनण्याचे त्याचे स्वप्न असावे नि ते पूर्ण झाल्याने तो खुशीत होता.

एकदा असाच भेटला तर इकडतिकडच्या गप्पा झाल्या. त्याला म्हटले मी, "प्रकाश, तू तर शाळा सुटली नि लगेच लागलास नोकरीला. तुला कधी वाटत नाही हे कॉलेज पाहून, इथे शिकला असतास तर.."

त्यावर तो म्हणाला, "तुम्ही लोकं कॉलेजात जाऊन शिकलात तो अभ्यास. मी शिकलो ते पोरांकडे पहायला .. आज मी इकडे कामाला लागून दहा वर्षे झाली. किती बॅचेस गेल्या हाताखालून.."

याच्या हाताखालून? जणू हा शिकवत होता पोरांना.

"अरे, कॉलेजची कोवळी पोरं ती, त्यांना मदत केली की बरे वाटते."

"पण तुलाच का नाही वाटले शिकावेसे? तू तसा हुशार होतास .."

"छे रे! मी हुशार असण्याचा किंवा नसण्याचा काही संबंधच नाही माझ्या या करियरशी."

करियर? शिपाई बनणे पण करियर होऊ शकते? पण प्रकाशला त्याबद्दल खात्री होती..

"तसे नाही. पण सगळे कसे मोठमोठी स्वप्ने पाहतात. साहेब व्हावे, अधिकारी व्हावे .."

"इथेच चुकतोयस तू. स्वप्न बघतात हे खरेय. किती जणांची सत्यात येतात तेही पहा.. मला सांग खरेच, क्लार्क बनण्याची तुझी कधी महत्वाकांक्षा होती? नसणारच. पण झालास. तू आनंदी आहेस?"

एम.ए. करून कारकुनी आणि खर्डेघाशीत कुणी कसे शोधावे जॉब सॅटिस्फॅक्शन? अगदी तोंडदेखले पण मी हो म्हणू नाही शकलो.

"पण मी आनंदी आहे. नोकरी आहे. चांगली दहापेक्षा जास्त वर्षे झालीत. पगार आहे. जबाबदारी कामाची खूप नाही. पण काम महत्त्वाचे आहे. मला ठाऊक आहे, मी काही इतका ढ नव्हतो. शिपायाच्या पोस्टसाठी तर हवी त्याहून जास्त हुशारी होती माझ्याकडे. मी कॉलेजात शिकलो असतो समजा. त्यातून सुशिक्षित बेकारी. मग कुठलीही नोकरी मिळाली असती. त्यात समाधान नसते मिळाले. त्यापेक्षा कधीच नोकरी पत्करून मी आज आनंदात आहे की नाही? कशाला हवेय शिक्षण?"

"पण म्हणून शिकायचेच नाही कुणी?"

"छे रे. अरे माझ्यासारखा विचार करणारे खूप थोडे. पण खरं सांग.. नाटक असते ना.. त्यात नाव कोणाचे होते? नटाचे, लेखकाचे.. वगैरे वगैरे. कुणी पडदा पाडणाऱ्याचे नाव घेते का? पण तो असतोच. आणि योग्य वेळी योग्य प्रकारे काम नाही केले तर नाटकाची वाट लागू शकते. कुणी पडदा पाडणारा नि हरकाम्याचे काम करणारा असतो. तशी सगळीकडे अशांची गरज असते. कुणी मुद्दाम ते बनत नाहीत. पण मी मुद्दाम बनलो शिपाई.. माझ्यावाचून प्रिन्सिपॉल सरांचे पान नाही हलत. ऑफिसात येणारी सारी पोरं माझ्याकडे येऊन सगळी कामे विश्वासाने करून घेऊन जातात. प्रोफेसरांचा जॉब महत्त्वाचा, पण कुणी म्हणो न म्हणो माझाही महत्त्वाचाच. कॉलेजचे गाडे नीट सुरू ठेवायचे तर मी ही महत्त्वाचाच."

प्रकाशचे लॉजिक काही फार चुकीचे नव्हते. अगदी एखादी मर्सिडीज गाडी घेतली तरी तिच्यातील एक छोट्यातला छोटा स्क्रू पण महत्त्वाचा असू शकतो. तो स्क्रू म्हणजे गाडी नाहीच पण त्या स्क्रू शिवाय मर्सिडीज ही का असेना पण ती नाही धावू शकत!

"आणि ही सारी कामे कुणी दुसरे काम मिळत नाही म्हणून का करावे? माझ्यासारखे आनंदाने का करू नये कुणी?"

प्रकाशचे हे सारे स्वतःचे तत्वज्ञान होते! खरेतर तत्वज्ञान शब्द आवडला नसता त्याला.

"पण म्हणून शिकू नये कोणी? मोठे होऊ नये कोणी?"

'तुझे चुकतेय ते इथेच. इतरांनी काय करावे ते मी कसे सांगू? शहाणे करून सोडावे सकळजन म्हणताना सगळे उपजत शहाणे असतील तर इतरांना काम काय उरणार? कोणाला शहाणे करणार? मी ठरवले पिरॅमिडचा मी पाया होणार."

बापरे! हा शिपाईगडी पिरॅमिडच्या गोष्टी करतोय! "अरे, समाजातली ही उतरंड असते. पाया मजबूत तर इमारत मजबूत. पायाचे दगड कळसाइतकेच महत्त्वाचे. कोणी त्यांना नमस्कार नाही करत. पण म्हणून त्यांचे महत्त्व नाकारता येत नाही कुणाला. फक्त कुणी पायाचे दगड होण्याचे स्वप्न पाहात नाही. कळस व्हायचे सर्वांना."

दहावी शिकलेला प्रकाश असा खोलवर विचार करत असेल असे वाटले नव्हते मला कधी.

"पण म्हणजे शिक्षण नको? अरे, अज्ञानाच्या अंधारातून वर उठायला नको?"

"काही गोष्टींचा आपल्याकडे उगाच उदो उदो होत असतो. शिक्षणाचेच घे. ज्ञानाचा उजेड म्हणतात. पण शिकले सवरले

म्हणजे सगळेच सुशिक्षित होत नाहीत आणि कित्येक जण शाळेची पायरी ही न चढता शिकलेल्यांच्या पुढे जातात.. पण मी माझी थियरी बनवलीय.. म्हणजे बघ ना, अंधारच नसेल तर उजेडाला महत्त्व ते काय? किंवा दु:खच नसेल तर सुखाला महत्त्व काय? इतक्या दूर जायला नको खरेतर. लहान मुलांचेच बघ.. शाळाच नसतील तर सुट्ट्यांचे महत्त्व काय? पण साधी उदाहरणे घेतली तर त्या गोष्टीचे महत्त्व ठसत नाही. खरेतर मोठी कुठलीतरी उदाहरणे घ्या, जीवन, भवसागर, सुख दु:ख वगैरेची उदाहरणे घेतली तरच कुणी गंभीरपणे ऐकते आपले. थोडक्यात काय तर साॅलिड उदाहरणे महत्त्वाची."

"हे खरंय तुझे."

"तर आपल्याकडे काही गोष्टींचा बाऊ होतो नि काहींना डोक्यावर घेतले जाते. म्हणजेच उदाहरणार्थ ज्ञान. मोठमोठे संत महात्मे काय की गेला बाजार कुठलेतरी बुवा आणि स्वामी काय.. काय सांगतात? ज्ञान मिळवा. कोणत्याही गोष्टीच्या मुळाशी जा. ज्ञान मिळवून मनात त्याचा प्रकाश पाडा. तिमिरातून ज्योतीकडे, तमातून प्रकाशाकडे नि अंधारातून उजेडाकडे वाटचाल करा .. म्हणजे उजेड पडू द्या डोक्यात त्यांना काय म्हणायचे त्याचा. अज्ञान रूपी अंधारास ज्ञानरूपी प्रकाशाने पळवून लावा!"

"पण काय खोटे आहे त्यात?"

"नसेलही. पण खरे सांगू तर अंधार ही गोष्टच मुळात अस्तित्वात नसते जगात. अंधार कधी कुणी पाहिलाय? कसा पाहणार? कारण कुठलीही गोष्ट दिसायला प्रकाशाची गरज असते.. मग काळोख कुठल्या उजेडात बघावा? आणि उजेड आला तिथे तर काळोख कसा राहणार? म्हणजे इतकेच .."

"काय?"

"प्रकाशाचा अभाव म्हणजे अंधार! आता पुढचा प्रश्न. अंधारात तसे वाईट काय आहे? म्हणजे विचार कर.. चोवीस तास दिवस आहे. अंधार न पडता सर्वत्र सगळीकडे लख्ख उजेड. डोळे दिपवणारा. आणि अंधार इतका वाईटच आहे म्हणावे तर निसर्गाने तो पाडावाच का? थोडक्यात अज्ञानाचा अंध:कार म्हटले कुणी तरी त्यात वाईट वाटावे असे काहीच नाही. कारण न अज्ञान वाईट ना अंध:कार!"

"वा!"

"तेव्हा मी ठरवले.. अज्ञानी व्हा.. अज्ञानी रहा आणि सुखी व्हा."

प्रकाशने आपल्या न शिकण्याला अज्ञानी राहण्याची संज्ञा चिटकवून टाकली होती. आणि आता आपल्या कमी शिकण्याचेही

तत्वज्ञान बनवणारा प्रकाश समोर बोलत होता. त्याच्या लॉजिक पुढे काय मी काय बोलणार? पण त्याच्या बोलण्यात कुठेतरी संगती होती. तर्काच्या बळावर वाद घालणे कठीण होते त्याच्याशी. म्हणाला असता, सारे कशासाठी? तर आनंदासाठी. पण मग मी क्लार्कच्या पोस्टवर आनंदी कुठेय कॉलेजात इतकी वर्षे जाऊनही. नि हा तर आनंदी माणसाचा सदरा घालून भटकतोय! खरेतर अज्ञानी नाही आहे तो, अशिक्षित तर नाहीच नाही. शिकला कमी असेल पण त्यामागे कुठलासा त्याचाच त्याला पटलेला विचार होता.

कॉलेज व्यवस्थित सुरू होते. मी मान मोडून कारकुनी करत होतो आणि प्रकाश प्रिन्सिपॉल साहेबांच्या केबिनबाहेर हसतमुखाने काम करताना दिसायचा. कॉलेजच्या पोरांत बराच लोकप्रिय होता तो हे लगेच कळून यायचे.

एकदा हातात पेढा ठेवत म्हणाला, "मुलगा झाला काल."

सगळ्या ऑफिसने त्याचे अभिनंदन केले. काही दिवसांनी आम्ही भेटलो त्याच देवळाच्या कट्ट्यावर.

प्रकाश आपल्या मुलाच्या भविष्याची स्वप्ने पाहात बोलत होता ..

"तुला सांगू .. माझा मुलगा ना चांगलाच हुशारी निघणार. मी काही तसा कमी हुशार नाही. त्याची आई पण चांगली शिकलेली आहे. म्हणजे मुलगा हुशार निघणार .."

"त्याला तू खूप शिकवणार मग?"

"नाही रे. खूप शिकून काय होतेय? मी म्हटले ना पायाचा दगड बनवणार मी त्याला .."

"म्हणजे तो ही शिपाई..?" नकळत मी बोलून गेलो.

"छे. एक पाऊल पुढे. त्याला मी शिक्षक बनवणार.."

"आणि आपल्याच कॉलेजात प्रोफेसर?"

"छे रे. प्रोफेसर बिफेसर नाही. तो प्राथमिक शिक्षक बनेल. पहिली ते चौथी."

लोकं पोरांना डॉक्टर इंजिनियर बनवण्याची स्वप्ने पाहतात. हा शिक्षक बनवण्याची.

"विचार कर. मुलांना शिक्षणाची गोडी लागण्याचा मुख्य काळ तोच असतो. एकदा पोरं शिक्षणात रमली की पुढे पहायला लागत नाही. लहान पोरांना काय आहे ना पहिल्यांदा घरातून बाहेर पडतात. शाळा म्हणजे दुसरे घर त्यांचे. ती आवडली की पुढे शिकत जातात पोरं. पण शाळा आवडणे म्हणजे शिक्षक आवडणे. पोराला प्राथमिक शिक्षक बनवणार मी.. खूप शिकून उपयोग नाही त्याला.

नाहीतर खूप शिक्षणानंतर प्राथमिक शिक्षक बनताना कां कू करायचा.. बनेल तर शाळेतला शिक्षकच. अरे तिथे हुशारीची खरी गरज आहे की नाही सांग?"

यावर मी काय म्हणणार होतो? पण हा खरेच तसे करेलही.

"तुला सांगतो मी अगदी अज्ञानेश्वर आहे. ज्ञानियांचा राजा होता तो ज्ञानेश्वर. मी त्याच्या उलट. ज्ञानाची आस नाही मला.."

खरेतर हे खरे नव्हतेच. प्रकाशचे सारे विचार करणे एका वेगळ्या पद्धतीचे होते इतकेच. तो हुशार ही होता नि विचारी ही. पायाचे दगड बनण्याचा विचार कुण्या सामान्याच्या मनात नाहीतर कसा येईल? तो स्वतःला भले म्हणो अज्ञानेश्वर, वेगळ्या पद्धतीने तो ज्ञानी होताच.

कुणाला त्याचे हे विचार म्हणजे मोठे काही न करता ते न करण्याची सबब शोधणे वाटले तर नवल नाही त्यात काही. पण मी प्रकाशला ओळखत होतो नीट. त्याचे म्हणणे कितीही जगावेगळे असले तरी ते त्याला स्वतःला पटलेले होते हे नक्की. अगदी स्वतःला अज्ञानेश्वर म्हणवून घेणे ही!

# रघुवीर

आजकाल पन्नाशी कोणी साजरी करत नाहीत.साठी बुध नाठी झाली की किंवा तशी ती झाल्यामुळे असेल.. हीरक महोत्सव साजरा करतात पण सुवर्ण महोत्सव काही फार जोरात करत नाहीत कोणी. म्हणजे राजकारणी लोक करतात. पन्नास किलोचा पन्नास मीटर लांब पन्नास मेणबत्त्या लावून केक वगैरे कापतात.. अगदीच संस्कृती रक्षक असेल तर तो मेणबत्त्या विझवण्याऐवजी केकवर पन्नास पणत्या पेटवतो. पण तो रघुवीर आहे. तो काही राजकारणी नाही तरीही अपवाद. अगदी लहान मुलासारख्या उत्साहाने त्याने वाढदिवसाला बोलावणे पाठवले मला. अर्थात बाकी कोणी नव्हते घरी त्याच्या. बायको त्याची माहेरी गेलेली. लग्नाला वीस पंचवीस वर्ष होऊन गेली तरी उत्साहाने माहेरी जाणारी पत्नी लाभली आहे त्याला. मला थोडा हेवा नाही म्हटले तरी वाटलाच.

रघुवीरच्या घरी गेलो तर त्याने दोन मास्क बाहेर काढले. एक मला नि एक त्याचा स्वतःचा. दोघांवर चक्क हसताहेत असे वाटावे असे गाढवाचे चित्र..

"चढव तो.."

मास्क देत तो म्हणाला.

"अरे पण गाढवाचा मास्क? तो ही वाढदिवसाला?"

"अर्थात. हाच योग्य आहे. पन्नाशी म्हणजे पंचविशीची दुप्पट. गद्धे पंचविशी दुपटीने म्हणजे गद्धे पन्नाशी!"

"गद्धे पन्नाशी? नवीन संकल्पना दिसतेय!"

"तुला सांगतो गद्धेपणा काय फक्त पंचविशीतच करतात? पन्नाशीत तर जास्त करता येतो.. माझी गद्धेपन्नाशी सुरू होतेय आज.. आता गद्धेसाठी.. बुध नाठीची वाट पाहेन .. अजून दहा वर्षे आहेत.. पण गद्धेपणा हॅज नो एज लिमीट .. म्हणजे आयॅम अ बाॅर्न विथ गद्धेपणा.."

"वा! आय ॲग्री.. पूर्वी लोक गद्धेपणाबद्दल उघड बोलायचे नाहीत .."

"स्वतःच्या.. इतरांच्या बद्दल बोलायचे.."

त्याचे म्हणणे पटले मला. आपला तो बाब्या इतरांचे ते कार्टे हा न्याय सगळीकडे सारखाच लागू पडतो. त्याला नवा संदर्भ जोडत मी म्हणालो,

"खरंय. आपले तो चातुर्य.. दुसऱ्याचे ते गादर्भ्य!"

"वा! गादभ्र्य! भाषेला नवीन शब्द अर्पण केलास.."

ही सवय मला लहानपणापासूनची. ह्याला अति शहाणपणा म्हणायची आई तर आगाऊपणा म्हणायच्या शाळेतल्या बाई. पण ही सवय माझी कायम आहे. स्वतःच स्वतःचे शब्द किंवा वाक्प्रचार बनवले म्हणजे बरे असते एक..

"मायबोलीचे ऋण फेडण्याचा फूल न फुलाची पाकळी म्हणून एक यत्न रे.."

प्रयत्नला यत्न म्हणून जास्त संयुक्तिक वाटेल म्हणून मी तोच शब्द वापरण्याचा यत्न करत म्हणालो.

"हुं. पण आता जमाना बदललाय.. ऑल ॲनिमल्स आर इक्वल .."

"म्हणजे?"

रघु एखाद्या चिंतकासारखा गंभीर होत म्हणाला,

"गाढवालाच फक्त तो गाढवपणा करतो असे म्हणता येत नाही आता.. वाघ आणि सिंहाला पण म्हणू शकतो.. कसला गाढवपणा करताय. नाहीतर .. गाढवाला म्हणू शकतो.. कसला वाघपणा करतोयस तू .. किंवा सिंहपणा.."

"खरंच.. काही निर्लज्ज जणं गेंडेपणा पण करत असतील नाही? कसलं मूलभूत चिंतन करतोस रे! ?"

"कसचं.. कसचं. अरे ही माझी सवयच आहे रे.. मला हैना एखाद्या विषयाच्या आजूबाजूच्या गोष्टीही दिसतात .. ना ॅट लाइक दॅट कुंतीसुत.."

"कोण?"

कुंतीसुत म्हणजे अर्जुन हे मला कळायला हवे होते. पण त्याची गाडी डायरेक्ट महाभारतात घुसेल अशी कल्पना नव्हती मला. त्यामुळे मी गाफील राहिलो.

"अरे कुंतीपुत्तर अर्जुन.. हू एल्स? त्याला पोपटाचा फक्त डोळा दिसायचा .. मला पोपट,त्याचा डोळा, पंख.. लाल चोच.. हिरवेगार झाड, त्याच्यावरच्या फळांसकट.. निळे आकाश त्यातील पांढऱ्या ढगांसकट.. नदी आणि तिच्यातली तरंगती बोट.. एखाद्या एका पायावर मासा पकडायला तयार असल्यासारख्या उभ्या बगळयासकट.. सगळे सगळे दिसते एका नजरेने.."

"मग पोपटाच्या डोळयाचा लक्ष्यभेद? नाहीतर तू चुकून बगळयाचा डोळा फोडायचास!"

"अरे लक्ष्यभेद करायला एकच एक लक्ष्य हवे असे थोडीच आहे! एक करू शकतोस.. जे भेदले जाईल तेच लक्ष्य म्हणून डिक्लेअर करून टाकायचे .. पूर्वलक्षी प्रभावाने कायदे कसे बनवतात ना तसे.. किंवा एम सी क्यू टाइप.. ऑर यू कॅन भेद एनी

वन लक्ष्य.. अर्जुनाच्यावेळी थोडा एक्झाम पॅटर्न वेगळा होता. नाऊ इट्स मोअर स्टुडंट फ्रेंडली! आणि रिॲलिस्टिक!"

रघूची गाडी भन्नाट सुटली होती. अगदी परीक्षेची गोष्ट करत होता तो!

"आता पन्नाशीत कसली देतोयस एक्झाम बिक्झाम?"

मी उगाच विचारले. रघु पापण्याही न लववता लगेच म्हणाला,

"मी? यू डोन्ट नो? आयुष्य इटसेल्फ इज ॲन एक्झाम. आयुष्य ही एक अखंड चालणारी परीक्षा आहे. तिला न सिलॅबस न सेट पॅटर्न. नवा दिवस नवा पेपर.. नवीन प्रश्न .. नवीन उत्तर .. नो अपेक्षित

ट्वेंटीवन वगैरे. डायरेक्ट परीक्षा!"

"कसली? डोळा फोडण्याची.. तो ही पोपटाचा?"

"ऑफकोर्स! फक्त दरवेळी तो पोपट बदलत राहतो.. त्याचा डोळा बदलत राहतो.. जिंदगी हर दिन एक नयी जंग है.. किंवा जिंदगी इम्तिहान लेती है म्हटलेय ते उगीच नाही."

महाभारतातून तो थेट आधुनिक हिंदी चित्रपटाकडे वळत म्हणाला.

"पण सगळ्याचा तुझ्या गद्धेपन्नाशीशी काय संबंध?"

हा चिंतक यावर काय म्हणेल? खरेतर त्याच्या संभाषणाचा संबंध नव्हताच गद्धेपन्नाशीशी. पण रघु हुशार आहे. कॉलेजातही त्या जोरावर तो माझ्यापुढे असायचा. तो उत्तर शोधून देणारच लगेच..

"आहे! अभ्यास झाला नाही म्हणून परीक्षेला न बसण्याचा गाढवपणा मी नाही करत.."

"बट यू से यू आर अ गाढव.. ॲट पन्नाशी .."

"ते खरंय.. पण डेज हॅव चेंज्ड! एकेकाळी गाढवपणा म्हणवला जायचा तो आता शहाणपणा म्हणवला जाऊ शकतो.."

हे खरंय! पूर्वीचे काही राहिले नाही.. पण मी मुद्दाम त्याला डिवचायला म्हणालो,

"डेज हॅव चेंज्ड हे खरंय रे. बघ ना.. काल शनिवार होता.. आज रविवार! चोवीस तासांत वार बदलतो .. तीस दिवसांत महिना .. झालंच तर तीनशे पासष्ट दिवसांत वर्ष.."

"तू असा कसा रे? तुला सिंबा ॅलिक काही कळत नाही? गाढवच आहेस..!"

मला गाढवाची उपमा मिळाली पण माझा पॉईंट सर झाला.. कारण तो चिडल्यासारखा झाला.

"ऑब्जेक्शन मिलॉर्ड! पण गद्धेपन्नाशी तुझी आहे.. माझी नाही बरं!"

"पण मीच माझ्यावरचे ऑब्जेक्शन ओव्हररूल करतोय. तुला सांगतो हाऊ टाइम्स हॅव चेंज्ड.."

"टेल्मी.."

काळ बदलायला वेळ लागत नाही. पण रघुच्या व्याखेतील काल बदल काय असावा?

"बघ हां.. त्यादिवशी मी त्या राण्यांकडे गेलेलो.."

"राण्या? एक सोडून अनेकवचनी? या वयात? व्हा ॅट विल वहिनी फिल? यालाच गद्धेपन्नाशी म्हणतोयस का?"

"गप रे.. मला अगदी भरून आले रे.. "

"एक सोडून अनेकवचनी राण्यांकडे गेलास.."

"राण्यांकडे म्हणजे राणे यांच्याकडे. व्हा ॅट आदरातिथ्य!"

"म्हणजे अगदी खाऊपिऊ घातले की काय?"

"हेच.. हेच बदललेय अगदी. पूर्वी खाऊ पिऊ घालत.. चहा पाणी विचारत कुणी आला घरी की. नाऊ टाइम्स हॅव चेंज्ड! फा ॅर बेटर!"

"म्हणजे? डायरेक्ट जेवायला घातले की काय? झिंगा मसाला की बोंबिल?"

राणे म्हणजे हिरव्या घासफूसच्या जवळही न फिरकणारा द्विपाद प्राणी. तो असले सामिषच खाऊ घालायचा.

"ते सोड रे. खाऊपिऊ कोणीही घालेल. पण हा राणे त्याच्या घरी गेलो की आलेल्याला प्रथम मोबाईलचा चार्जर देऊ करतो .. सगळ्या मोबाईल्सना फीट होईल असे कॉर्ड्स आणून ठेवलेत त्यानी .. आणि ते कमी म्हणून की काय.. गेल्या गेल्या तो काय देत असेल? एनी गेसेस?"

"काय? म्हणजे चहा पाणी नाही तर .."

"तेच तर सांगतोय. गेल्या गेल्या ते वायफायचा पासवर्ड देतो रे. अगदी भरून येते असले आदरातिथ्य पाहून. आणि दॅट मॅन इज सच परोपकारी यू नो.. ही हॅज ॲन आयडिया.."

"असणार .. एक आयडिया जो दुनिया बदल दे.."

मी उगाच मल्लीनाथी केली.

"पूर्वी कसे वाटसरूसाठी पाणपोई उघडत.. तशी मोबाईल पोई उघडणार आहे राणे.."

"मोबाईल पोई? म्हणजे?"

"अरे.. तेच चार्जिंग टर्मिनल. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या पांथस्थांना मदत म्हणून सर्व चार्जर्स ठेवणार तिथे.. पाणी काय कुठेही मिळेल. चार्जरचे तसे नाहीना.. सच नोबल आयडियास.. "

"खरंय.."

"मी म्हणालो त्याला. सगळ्या लोकांचा दुवा मिळेल तुला. पुण्यवान माणूस रे .. आजकाल कुणासाठी कोण इतके करते? खरी समाजसेवा रे.. म्हटले ना टाइम्स हॅव चेंज्ड.. फाॅर बेटर. राणे इतका समाजसेवक बनेल असे वाटले नव्हते मला. पण माणसं बदलतात. शेवटी पुण्य कमवावेच लागते पुढचा विचार करून."

"पुढचा विचार म्हणजे?'

"अरे, शेवटी आपल्याला पापपुण्याचा हिशेब द्यावाच लागतो की नाही चित्रगुप्ताला.."

आपण हिशेब देतो नि चित्रगुप्त गुप्तपणे तो टॅली करून पाहात असेल का? टॅली नावाचे साॅफ्टवेअर वापरून? कोणास ठाऊक!

"म्हणजे? पाप पुण्य वगैरे कल्पना बदलल्या नाहीत अजून?"

"का? टाइम्स हॅव चेंज्ड.. पण इतकेही नाही. काही गोष्टी कालातीत असतात. तशीच ही.. पाप आणि पुण्याची संकल्पना स्पष्ट आहे रे.. तुला सांगतो हे जग आहे ना ते अशा संकल्पनेनेच

व्यवस्थित चालले आहे. लहान मुलांना कशी बागुलबुवाची भीती दाखवतात तशी मोठ्यांना चित्रगुप्तबुवाची! ट्रेझरर!"

वाढदिवस राहिला बाजूला. अगदी गाढवाचा मास्क ही न घालता रघुवीर नि माझे असले मौलिक चिंतन सुरू झाले. रघुवीर असाच आहे.. त्याचे विषयाचे तारू कुठून कुठे भरकटेल त्याचा नेम नाही. न राहवून मी म्हणालो त्याला,

"रघु.. आपण इतकी वर्षे ओळखतोय एकमेकांना. ना मला तुझा न तुला माझा वाढदिवस ठाऊक इतकी वर्षे. तू बोलावलेस मला म्हणून माहिती पडला.. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा रघुवीर .. आज कसला बेत? की शाब्दिक मेजवानी फक्त?"

"अरे.. चल.."

मी मास्क काढू लागलो.. तर तो म्हणाला,

'मास्क राहू देत.."

गाढवाच्या चेहऱ्याचे मास्क घालून रघु आणि मी त्याच्या गच्चीवर आलो. आकाशाकडे बोट दाखवत रघु म्हणाला,

"तो कोण आहे?"

"कोण कोण आहे?"

"तो आकाशात?

चंद्र! तू काय लहान मुलासारखा मला चांदोबा दाखवणारेस की काय?"

"दाखवत नाही. मीच बघतोय. चंद्रदर्शन रे! सव्वा सहाशे चंद्रदर्शन सोहळा आहे माझा .."

"म्हणजे?"

"अरे लोक ऐंशीव्या वाढदिवसाला सहस्त्र चंद्र दर्शन करतात .. पन्नासाव्या वाढदिवसाला मी सव्वा सहाशे चंद्र दर्शन का करू नये?"

रघुने गणिती हिशेबाचे त्रेराशिक मांडून ऐंशीला हजार तर पन्नासाला किती हे गणित सोडवले असणार ..

तो सव्वा सहाशेवा चंद्र पाहून आम्ही परत आलो.

"आता काढू का रे हा गाढवाचा मास्क? नि संपवू हा गदर्भावतार?"

मी विचारले घरी परतताच. नशीब गच्चीवर जातायेता कुणी भेटले नाही. नाहीतर हा काय गाढवपणा नक्कीच म्हणाले असते.

"काढ.. किंवा नको काढूस. काय फरक पडणार आहे? अरे, प्रत्येक माणसात हा गाढवपणाचा अंश दिलाय.. तो असतोच. दर

वयात असतो. कुणी जास्त कुणी कमी. त्यासाठी मास्कची गरजच काय? पंचविशीतच गाढवपणा करायचा कुणी मक्ता घेतलाय?"

रघु काहीतरी गंभीर भाष्य केल्याच्या थाटात बोलत होता. गंभीरपणा नि माझे वावडे आहे.. म्हणून मी म्हणालो,

"अरे.. आय टेल्यू व्हाय.. साधारणपणे ते वय असतं ना ते लग्नाच्या गाढवपणाचे वय. म्हणून त्याला गद्धेपंचविशी म्हणत असतील रे.."

"असतीलही. पण मी विचार केलाय .. गाढवाची एक गोष्ट सांगतात. त्याच्या गळयात एक हवी तितकी लांब दोरी बांधून खुंटीला बांधून टाकायची. गाढव दोरी जितकी लांब तिथवर मोकळेपणाने जात राहातो. अगदी दोरी खेचून. तितकी मर्यादा समजते त्याला.. काही दिवस गेले की दोरी काढून टाकायची.. तरी गाढव काही त्या मर्यादेबाहेर जात नाही. गळयात दोरी नाही हे त्याला कळतही नाही.. माणसाचे तसेच आहे रे.. एका अदृष्य दोरीने तो बांधल्यासारखा असतो.. मर्यादा आखून घेतो. त्यापलिकडे तो जाण्याचा विचारही करत नाही .. अँड नो एज इज ॲन एक्सेप्शन .. पंचविशी काय की पन्नाशी काय!"

"वा! म्हणणे खरेय तुझे.."

"तुला सांगतो.. विचार केला ना तर लक्षात येईल.. सो कॉल्ड रूढी आणि परंपरा आहेत ना.. इस्पेशियली ज्या इल्लाॅजिकल आहेत किंवा माणसाचा माणूसपणावर प्रश्नचिन्हासारख्या आहेत.. त्या ह्या दोरी सारख्या आहेत. गळयात कधी बांधल्या गेल्यात ते कळत नाही कुणाला. ती अदृष्य असेल दोरी पण अति मजबूत. माणसाचे गाढव करणारी ती दोरी.. माणूस एकवेळ माणूसपण सोडेल पण ती नसलेली दोरी तोडणार नाही .. आखून दिलेल्या चौकटीबाहेर जाणार नाही.. जातपात, धर्म, पंथ.. अगदी भाषा सुद्धा .. सगळयाच्या अभिमानाचे बाळकडू पाजले की गळयात दोरी बांधायला सुरूवात होते.. मोठया अभिमानाने मग सगळे त्या दोऱ्या मिरवत फिरू लागतात .. शतकानुशतके माणूस असाच फिरतोय.. आणि गाढवाला गाढव म्हणून फिरतोय.. या सारखा दुसरा गाढवपणा नसेल..!"

रघुवीर असला गंभीर विचार करण्याचा गाढवपणा करत असेल असे मला आजवर चुकूनही वाटले नव्हते. पण रघु म्हणतो ते बरोबरच होते तसे..

रघुवीर नि मी. आम्ही जवळचे मित्र. दर रविवार संध्याकाळी असेच गप्पाष्टक चालते आमचे. आज वाढदिवसाच्या निमित्ताने

भेटतोय असे म्हणावे तर तोच पुढे एखादा गौप्यस्फोट करावा तसे म्हणाला,

"तुला सांगू? आज माझा वाढदिवस वगैरे काही नाही .. पण गेल्या काही दिवसांपासून मला वाटतंय ना ते तुला सांगायचं होतं.. म्हणून हा सगळा गाढवपणा.. निमित्त माझ्या मुलीच्या मोडलेल्या लग्नाचे.. मुलगा परप्रांतीय .. त्याच्या घरच्यांनी धमक्या दिल्या.. तिकडच्या पंचायतीने फतवा काढला.. तुला ठाऊकच आहे ते सारे. पटत नाही .. पण माझ्या हातात ही काही नाही .. माणसाच्या वागणुकीचे निरीक्षण करता करता लक्षात आले.. पन्नाशी आली तर ध्यानात आले हे एक सत्य .."

आम्ही कॉलेजपासूनचे मित्र. गंभीर काही चिंतन करावे असा त्याचा स्वभाव कधीच नव्हता. कदाचित परिस्थितीने असेल माणसाच्या वागणुकी नि व्यवहाराबद्दल विचार करायला भाग पाडले असणार त्याला. त्याचे म्हणणे खरे होते.. त्याचा निरोप घेऊन मी निघालो..

जवळच्या टेबलावर ते दोन्ही मास्क आमच्याकडे बघून हसत होते..

# देवकुळे मास्तर

देवकुळे मास्तर वर्गात शिरले. परश्याचा बाक आजही रिकामाच होता. बाजूच्या सदा पाटलाच्या पोराला मास्तर म्हणाले, "जा रे, परशुराम गुंठेला बोलावून आण."

पाटलाचा पोर शाळेतून बाहेर पडायला मिळतेय म्हणून खुश झाला.

थोड्यावेळाने परश्या त्याच्याबरोबर आत शिरला तो हातात बेचकी घेऊन. चेहऱ्यावर मारक्या म्हशीचे भाव. एका खिशात चिंचेचे आकडे भरलेले. दुसऱ्यात बोरं.

परश्या रागाने पाहात होता. आजवर तीनचारदा आलेला शाळेत. पण तो न आला तर मास्तर सुटकेचा निश्वास टाकीत. सारी पोरं टकामका पाहात होती. काही घाबरत होती. काही परश्याइतकी हिंमत आपल्यात नाही म्हणून वाईट वाटून घेत होती. आता परश्या आपला रामबाण इलाज करणार. बेचकीतल्या दगडाचा नेम घेऊन मास्तरांना घाबरवणार. पोरं वाट बघत होती या क्षणाची. ते नाट्य

आजवर तीनदा पाहिलेले त्यांनी. त्यात एक थरार होता. गावात एवढा थरार त्यांना फक्त गावाबाहेरच्या जंगलात भूत आहे नि ते कुणाला दिसले तर ज्या गावगप्पा होत त्यातच जाणवत असे.

मास्तर पुढे आले. परश्याच्या पाठीवर हात ठेवत म्हणाले, "परश्या, आज तू आणि सारी पोरं मला शिकवा."

परश्यासकट सगळ्या पोरांची तोंडं आ वासून उघडी पडली.

"काय शिकवाल? परश्याकडची बेचकी छान आहे. आज शाळेला सुट्टी. चिंचा पाडूयात."

परश्याला कळेना कसे वागावे. मास्तर स्वतःच बेचकी शिकणार.. क्षणात अविश्वासाने तो परत रागीट चेहरा करणार तोच सारी पोरं उठून उभी राहिली नि एकच गलका करत गावाबाहेरच्या चिंचेच्या झाडाखाली पोहोचली. परश्या सगळ्यांचा लीडर. मास्तरांनी बेचकी शिकायला घेतली. एकेकाला तीन चान्स.. करत हळूहळू एक ते वीस आकडे सगळ्यांचे पाठ करून घेतले. बोलता बोलता मराठीची एक कविता म्हणून घेतली.. परश्या आज हीरो होता. त्याचे कौतुक करत मास्तर म्हणाले,

"आज शाळा इथेच सुटली. परश्या जमतंय ना मला बेचकी वापरायला."

"व्हय मास्तर. पन थोडी अजून सवय पायजे."

"परत येऊ आपण. पण उद्या परश्या आला की निघू. बरं का परश्या, नीट जमेतोवर शिकव मला."

"शिकवीन की मास्तर. ती शाळा नाय आवडत मला. जंगलच मस्त हाय की.."

"तू आम्हाला घ्यायला ये की. मग जाऊ आपण सारे. काय रे पोरांनो. उद्या येऊया परत?"

पोरं एकच गलका करत घरी निघाली. अशी शाळा असेल तर तिच्यात यायला परश्या पण तयार झाला. आजवर कुठल्याच मास्तरांनी बिना छडी त्याला वागवले नव्हते. देवकुळे मास्तर तर थेट जंगलात त्याच्याकडूनच शिकायला निघालेले.

परश्या म्हणजे परशुराम. बिना आईचा पोर. बाप मजुरी करणारा. शिकावे त्याने असे न बापाला वाटे न त्याला स्वतःला. थोडा मोठा झाला तर मजुरीसाठी हाताशी येईल म्हणून वाट पाहात होता त्याचा बाप. शाळेतून त्याच्या तक्रारी आल्या तरी मजुरी बुडवून शाळेत कधी गेला नाही. मास्तरच नवीन आले कुणी की परश्याला दर्शनासाठी बोलावून घ्यायचे. नि काही दिवसांत ही ब्याद टळेल तर बरे असा विचार करत बसायचे. दुसरीत पोहोचला परश्या पण न अक्षर ओळख ना आकडे मोजता येत. देवकुळे

मास्तर आले तेव्हा त्याची कीर्ती मास्तरांच्या कानावर आलेली. मास्तरांना लहान मुले प्रिय. देवाघरची फुलेच ती. आईविना पोराला मायेचे दोन शब्दही पुरतील इतका अंदाज आलेला त्यांना. दुसरी तिसरीतली मातीच्या गोळयासारखी पोरं. त्यांची मागणी असून असून काय असणार? एकदा मास्तरांचा लळा लागला की पोरं शाळेसाठी जीव टाकतील. आजवर सहा ठिकाणी बदली झाली मास्तरांची. प्रत्येक गावात मुलं वेगळी. पण त्यांच्या गरजा तशाच. एखाद दुसरा परश्या असणारच त्यात. जिल्हापरिषदेच्या शाळा सगळ्या. शासकीय आदेशानुसार पटसंख्या हवी म्हणून पोरांना बोलावणे धाडत दिवस भरले जायचे. पण देवकुळे मास्तर आले की पोरं शाळेची वाट पाहात धावत शाळेत पोहोचायची. बिचारे मास्तर एका गावात थोडे स्थिर स्थावर होत आले की बदलीचा आदेश यायचा. बाडबिस्तरा गुंडाळून दुसऱ्या गावी दाखल व्हायचे. साने गुरूजींचा आदर्श समोर ठेऊन मास्तरकी चाललेली मास्तरांची. दिवसाकाठी पोरं मजेत घरी जाताना नि दुसऱ्या दिवशी शाळेच्या ओढीने येताना पाहिली की मास्तरकीचे सार्थक झाल्यासारखे वाटायचे त्यांना. त्यात मग त्यांना कुणी मास्तर म्हणा की गुरूजी.. त्यांना त्याचे काही वाटायचे नाही.

आपल्याकडे एक हायरार्की आहे.. उतरंड म्हटले की क्रम उतरता असतो. इथे चढता क्रम आहे म्हणून 'हायर'आर्की. छोट्या गावात नि झेडपीत, मोठ्या गावात नि मग शहरात.. विद्या दानाचे एकच प्रकारचे पवित्र समजले जाणारे काम करणारे शिक्षक मास्तर, गुरुजी आणि सर अशा क्रमाने ओळखले जातात. एकच विद्यादाता पण आदराची भावना बदलत जावी? गावचा मास्तर तर फक्त डायरेक्ट बोलताना आदरार्थी. एरवी एकेरीच. गुरुजी आणि सरांना कुणी एकेरी हाक मारताना ऐकलेय? आणि मास्तर हा शब्द काही गावच्या गुरूजींसाठी राखूनही ठेवत नाही कुणी. एस्टी न बसचा कंडक्टर मास्तर, पोस्टातही मास्तर.. वगैरे मास्तर कुठे कुठे आढळतात. त्यात परत मास्तरांची प्रतिमा अशी बनवून ठेवलीय सिनेमावाल्यांनी. एकतर विनोदी किंवा कामचुकार. पोरं हाकणारा कर्मचारी. आणि शासन दरबारी मास्तर म्हणजे हजार शासकीय कामे करणारा, त्यात एक मुलांना शिकवण्याचेही वेळ उरला तर.

देवकुळे मास्तर मात्र या सर्वांवर पोहोचलेले. शितलापूर गावची एकुलती एक शाळा. दगडी बैठी इमारत, त्यात चार खोल्या. एकात ऑफिस, बाजूला दोन खोल्यांत भरणारे वर्ग. चौथीपर्यंतचे चार वर्ग, खोल्या दोन. त्यात काही शक्कल लढवून पोरांना

बसवायचे. एकुलते मास्तर शाळा चालवायचे. पोरांचा गलका असायचा. पिन ड्राॅप सायलेन्सची साहेबी कल्पना मास्तरांना पटायची नाही. मास्तरांचा वर्ग नेहमीच हसता खेळता असायचा नि खेळण्यातून सगळा अभ्यास पोरांच्या गळयात उतरवणे ही मास्तरांची खासियत होती. त्यात मग चुकार पोरांना शिक्षा झाली तरी ते पोर रागवायचं नाही. अभ्यास संपला की खेळाचा तास मास्तर रोज ठेवत. आणि वर्गातील सामान्यातील सामान्य मुलास भाग घेता येईल अशा स्पर्धा भरवीत. लहानग्यांची बक्षिसे ही काय, एक खडूचा तुकडा नाहीतर पाटीवरची पेन्सिल. पण मोठ्या अभिमानाने पोरं ते बक्षीस घेऊन घरी जात. एकूण स्वतःबद्दलची अभिमानाची म्हणा किंवा आत्मविश्वासाची पेरणी करणे ही मास्तरांची शिक्षणपद्धती होती. कुठले कुठले शिक्षणातले प्रयोग किंवा आजची शिक्षणपद्धती असले परिसंवाद न अटेंड करता स्वतः बनवलेली. सर्वांमागे एकच एक समान धागा, आपली पोरं कुठे मागे पडू नयेत. दिसायला वेडीबिंद्री पोरं आपल्या आत्मविश्वासाने वागायला नि बोलायला हुशार व्हावीत. पोरांबद्दल आत्मीयता नि निखळ प्रेम आणि त्यातून जे पोरांसाठी करावे लागतील ते शिक्षणाचे प्रयोग. अंतरीच्या तळमळीतून आलेले सारे, ते चुकणे कसे शक्य होते? चौथीत शाळा सोडून जाणारी मुलं आता मास्तर भेटणार नाहीत म्हणून खट्टू होत. पण मास्तरांच्या दट्ट्यापुढे

पुढे शिकायला तालुक्याच्या शाळेत जायला तयार होत. अशा किती बॅचेस मास्तरांच्या हाताखालून गेल्या असाव्यात? प्रत्येक वेळी एक नव्या तऱ्हेचा परश्या असायचा नि मास्तर दरवेळी नव्या पद्धतीने त्याला सांभाळून घ्यायचे.

आज हे सारे का सांगतोय मी?

काही दिवसांपूर्वी जिल्हा रूग्णालयातून फोन आलेला.

"सर, एक आयसीयूत पेशंट आहे.. मिस्टर देवकुळे."

"पूर्ण नाव काय?"

"सदाशिव देवकुळे. सर ही इज अनकॉन्शस.."

"सदाशिव देवकुळे?"

मी धावतच हाॅस्पिटलात पोहोचलो. नाव ऐकताच मनात आलेला विचार खराच होता. ते माझे देवकुळे मास्तरच होते..

मास्तर गंभीर होते. हळूहळू शुद्धीवर आले. उठून बसू लागले. वाचा आली परत..

राऊंडवर होतो, तसे म्हणाले..

"डॉक्टर, बिल कसे भरू मी..?"

एकाएकी मी म्हणालो,

"मास्तर, ओळखलं नाहीत मला? मी शितलापूरचा परश्या .."

बाजूला सिस्टर आणि रेसिडेंट डॉक्टर आश्चर्याने पाहात होते. डॉक्टर पी.एस.गुंठे म्हणजे परश्या?

देवकुळे मास्तरांच्या डोळयांत पाणी तरळले ..

"परश्या .. अठ्ठ्याहत्तरचा.. शितलापूर.."

सिनेमात फ्लॅशबॅकमध्ये दाखवतात तसा तेव्हाचा मी दिसत असावा असे दूरवर नजर लावून मास्तर बघत होते..

"होय मास्तर. बिलाची चिंता तुम्हाला नको. सिस्टर काहीही लागले तर फोन करा मला .."

मास्तर पूर्ण ठीक झाले. आठ दहा दिवस होते त्यांच्या खोलीत. मुद्दाम दुपारी जाऊन त्यांच्याशी गप्पा मारत बसायचो. मास्तर एका आदर्शाने झपाटलेले. सदाफटिंग. गावोगावी सरकारी नोकरी करत आता निवृत्त झालेले.. आजच्या शिक्षणाबद्दल मी काही म्हणालो तर बोलले, "परश्या.. नाही डॉक्टर .."

"मास्तर तुमचा मी परश्याच. तुम्ही नसतात तर कुठेतरी रोजगार हमी योजनेत हा परश्या दगड फोडत असता .."

"अरे, शिक्षण बदलले, शाळा बदलल्या. स्पर्धा आहे म्हणतोस.. सारे ठीक रे. पण शाळेतली मुलं? ती नाही रे बदलली. त्यांची गरज आजपण तीच आहे. पोरांना मोठमोठ्या शाळा नकोत.. त्यांना हवे ते प्रेम. आधी शिक्षकाबद्दल.. मग शाळेबद्दल.. ते झाले की शिक्षणाबद्दल. सगळी पोरं बघ कशी शिकून मोठी" होतात. मी श्रीमंत आहे बघ. माझी पोरं अशी मोठी झालेली पाहिली की डोळे भरून येतात."

"खरंय मास्तर."

जिल्हा रूग्णालयाचेही बिल भरायला पैसे नसलेले मास्तर खरेच श्रीमंत होते.

"मी प्राथमिक शाळेत राहिलो ते त्यासाठीच. पोरांच्या गळतीचे प्रमाण तेव्हाच जास्त असते डॉक्टर .."

"मास्तर, खरंय तुमचे. मी एकटाच नाही गावोगावी किती असे परश्या असतील.."

मास्तर डिस्चार्ज होऊन घरी गेले. शिक्षणाने पिढ्या घडवण्यात विश्वास असणाऱ्या शेवटच्या पिढीतले असावेत ते. शिक्षक नि शिक्षणाबद्दल मूलभूत विचार होत असतात. मोठमोठया शब्दांत चर्चा घडत राहतात. पोरांच्या शिक्षणाविषयीची आतून

आलेली तळमळ हा मुद्दा सोडून सगळ्या चर्चा होतात. आज मास्तरांच्या शिकवण्याचा विचार केला की वाटते, मोठमोठे शिक्षणतज्ञ होऊन गेले, पण खऱ्या शिक्षणात फक्त या एका मुद्दयावर भर दिला तरी पुढचे काम किती सोपे होईल?

शाळा आमची चौथीपर्यंत होती. पुढे मोठ्या शाळेत गेलो. कॉलेजात गेलो. अगदी मेडिकल कॉलेजातही. सगळीकडे कोणीना कोणी शिक्षक भेटत गेले ज्यांच्यामुळे शिकायची ओढ कायम राहिली. देवकुळे मास्तरांनी लावली नसती ती गोडी तर या गोष्टीला कायम मुकलो असतो मी. माझे मास्तर ग्रेट आहेतच.

आणि पुढे भेटत गेलेले सगळे शिक्षकही तसेच.. एकाएकी वाटले, देवकुळे मास्तर एक व्यक्ती नाहीत .. प्रातिनिधिक आहेत शिक्षकी पेशाचे.

घोड्याला पाण्यापर्यंत आणता येते पण पाणी पाजायला नाही भाग पाडू शकत म्हणतात. पण इथेतर घोडा पाणवठ्यावर यायला ही तयार नाही.

हा घोडा पाणी प्यायला असता की नाही कुणास ठाऊक. पण शिक्षणाचे पाणी प्यायला माझ्या सारख्या नाठाळ घोड्याला पाणवठ्यापर्यंत आणणारे मात्र आमचे मास्तरच.. देवकुळे मास्तर.

# औरंगजेब

त्याला आम्ही सगळे औरंगजेब म्हणतो.

अगदी पाळण्यात असल्यापासून ख्याती आहे त्याची. गवयाचा पोर नसल्याने कुणी हा सुरात रडतो असे चुकून म्हणू नसता शकला. भिंतीवरच्या रेघोटया बालसुलभ म्हणून ओढल्या असतील पण चित्रकला नि गायनातल्या परीक्षेत नापास होणारा तो सबंध शाळेत एकमेव होता. निबंध लेखन वगैरे अवांतर लेखन तर त्याने कधीच केले नाही. प्रश्न त्याच्यासाठी 'तत्वा'चा होता तेव्हाही. अवांतर लेखन हा वेळेचा अपव्यय. त्यासाठी निबंधाच्या दहा मार्कांचे बलिदान त्याची अपार ध्येयासक्ती दाखवत नाहीत का?

त्याने पाहून ठेवलेय, हे जग तिरपागडे आहे. जो बघावा तो काही कलागुणांच्या मागे लागलाय. कुणी आ ऊ करून गळा काढतोय, कुणी नाटक सिनेमात सोंगे वठवतोय, कुणी ब्रश घेऊन कागद रंगवतोय.. कुणी लिहीत बसलाय.. कुणी कविताच काय ऐकवतोय कुणाला कात्रीत पकडून ..कुणाचे काही न कुणाचे काही.. आणि तो? सगळ्यांना कात्रजचा घाट दाखवतोय..

आणि त्यातूनच त्याने स्वतंत्र ओळख कमावली. बाकी जण उपासना नि साधना किंवा तप, तपस्या वा तपश्चर्या .. असले करीत आयुष्य खर्ची घातले तरी ओळख बनवू शकत नसताना त्याची ओळख औरंगजेब म्हणून तेव्हापासूनच होती. समस्त कलांचा दुस्वास करणारा तो .. आयुष्याकडे गांभीर्याने पाहायच्या एकाच एक ध्येयाने प्रेरित होता .. आणि आहे ही. 'बुडाला औरंग्या पापी' रामदास स्वामी आनंदाने म्हणाले असतील ही, पण वाईटातला चांगला गुण नको बघावयास? जपमाळ घेऊन एका निष्ठेने औरंगजेब बसला असणार विविध कलांकडे तुच्छतेने पाहात किंवा खरेतर नजरही तिकडे पडणार नाही याची काळजी घेत. तसाच तो ही.

माझा तो मित्र म्हणावा तर त्याला मैत्री म्हणजे वेळेचा अपव्यय नको वाटायला. तर तो माझ्या ओळखीचा म्हणूयात. चुकून कधी तो वेळ वाया न घालवता बोलण्याच्या मूडमध्ये आला तर आपल्या आतली खदखद सांगत बसतो. सारे जग कला नि कलावंताच्या मागे कसे लागलेय नि लहान मुलांच्या गोष्टीत तो पाइडपायपर सर्वांना कसा भुलवून आपल्या मागे घेऊन जातो या

थाटात. ही गोष्ट मी देतोय उदाहरण म्हणून. त्याला ती गोष्ट वाचणे म्हणजे ही वेळ वाया दवडणेच वाटेल.

तो म्हणे आधीपासूनच असा आहे.

आम्ही तरीही भेटत असतो मधून मधून. तेही शनिवारी हनुमानाच्या देवळात पिंपळाच्या पारावर. हनुमंताच्या साक्षीने त्याला वाचा फुटते.. तो बोलतो. बोलत राहतो. त्याच्या त्या वाक्ताडनातून त्याच्या औरंगजेबीय व्यक्तिमत्त्वाला वेगळीच झळाळी मिळत राहते. बिचारा मारूतीराया.. शेंदूर आणि तेलात नाहात रूईच्या हारांच्या ओझ्याआड लपून आमचे बोलणे ऐकत बसतो!

"कविता काय, काव्यमय भाषा काय किंवा कुठले कुठले लिखाण काय.. मला पाहूनच हसू येते. नाही, विनोदी काही असते ते म्हणून नाही. पण कुठल्या गोष्टीला कसे कुठे सांगावे .. कशाला कशाची उपमा द्यावी .. थोडक्यात वडाची साल पिंपळाला कशी लावावी ते शिकावे ते या कवी आणि काव्यमय लिहिणाऱ्यांकडून. उगाच एकाच कवी मागे लागेन मी असे नाही. अखंड कवी जमातच अशी. 'जे न देखे रवी' म्हणत आपल्याला ते दिसतेय असा दावा

करणारी. थोडक्यात अंधारात पण त्यांना दिसत असावे असा अंदाज आहे माझा."

"म्हणजे कवितांवर बंदीच आणावी? आजकाल जे न पटेल कुणाला त्याच्यावर बंदी घालण्याची पद्धत रूळलीय नाहीतरी.."

"नाही. फक्त कवितांवर नाही. माझा मुद्दा समजून घे. माझा आक्षेप फक्त अशा कवितांनाच आहे असे नाही. सगळ्याच कलांना आहे. म्हणजे गाणे बजावणे नि चित्रफित्र काढणारे इत्यादी सारे. जगण्याचे इतके प्रश्न पडले असताना कसले हे यात वेळ घालवतात. घालवतात ते ठीक कदाचित, पण साधना साधना म्हणवत स्वतःचे कौतुक करवून घेतात."

हे सांगताना त्याचा आवाज एखाद्या गवयासारखा चढतो थोडा.

"मागे एका कवीने दहा हजारावी कविता लिहिली म्हणून त्याचा सत्कार होणार होता म्हणे! पण तो त्यातल्या पंचवीस निवडक म्हणून दाखवणार अशी बातमी येताच बारगळला म्हणे. असेलही. या जमातीबद्दल ऐकावे ते नवलच अशा बातम्या येतच असतात."

एकदा सुटला तो की मग थांबत नाही तो. अगदी उदाहरणासकट सारे समजावून सांगतो.

"एक काहीतरी ऐकले त्यादिवशी. 'फिरूनी नवी जन्मेन मी' म्हणे. एकतर पुनर्जन्म आहे की नाही ते ठाऊक नाही. एकवेळ मानू तो आहे.. मग 'सातों जनम में तेरे साथ रहूंगा' म्हणावे तर पुढचा जन्म परत माणसाचाच मिळायची ग्यारंटी पण देतोय .. किंवा अगदीच जन्मबदल लिहिलाच असेल तर तो दोघांना एकाच टाईपचा .. तो मासा तर ती माशी.. म्हणजे स्त्रीलिंगी मासा. तो बैल तर ती गाय.. ती चिमणी तर तो चिमणा.. तो पोपट तर ती पोपटी पोपटीण.. हे दोघांचे एकावेळी सिंक्रोनाइज्ड पुनर्जन्म खरेच होतील? समजा झालेही.. पण समजा त्याला अमीबाचा किंवा असल्या कुण्या सूक्ष्म प्राण्याचा जन्म मिळाला तर? मग बोंबलले सात जन्म. अमीबी असते असा कुठे जीवशास्त्रीय पुरावा नाही. अगदी एखादा झुरळाच्या जन्माला आला तर झुरळी म्हणून ती जन्मली तरी त्याला एकाच घरातल्या बाथरूममध्ये भेटण्याची ग्यारंटी काय? प्रश्न अनंत आहेत, पण आहे कुण्या कवीकडे उत्तर?"

कवीकडे काय असणार? माझ्याकडे ही नाहीच. प्रश्न गहन आहे!

" तुला सांगतो हे कवीगण अति हुशार ..

'काय तू मागशी माझ्याकडे उत्तर

प्रश्न असेल एक तुजला, मजला पडती सत्तर'

म्हणून हे कवीलोक आपलीच बोलती बंद करतील."

"हो ना.."

"प्रेमकविता म्हटले की या कविलोकांची गाडी भन्नाट सुटते. भन्नाट म्हणजे तर्काचे कुठलेच स्टेशन न घेता धडाधडा सुटते अगदी. एका हिंदी शायरीसारख्या ओळीवर मी पटत नसूनही संवाद लिहिलाय एकदा..

"तू? आणि लिहिलायस?"

"मग काय करू? काय तर म्हणे

'बहुत हंसी है तुम्हारे पांव

इन्हें जमींपर ना उतारना..'

म्हणजे बघा, ती उतरतेय एका कुठल्याशा रिक्षामधून मधून. जमिनीवर पाय ठेवणार ती..

तो: प्रिये, थांब.. उतरू नकोस

ती: का? का माझ्या प्राणप्रिया?

तो: किती सुंदर पावले तुझी.

ती: असतील. मग?

तो: यांना जमिनीवर नकोस ठेवू..

ती: कायपण तुझे.. मीटर वाढत चाललेय उगाच..

रिक्षावाला आरश्यातून मागे पाहतोय ..

तो: ये हंसीं पांव जमींपर मत उतारिएगा .. मैले हो जाएंगे ..

ती: हात तुझ्या. मग काय हवेत उडत चालू?

रिक्षावाला: ते जमिनीवर चालायचे की नाही तुम्ही पाहून घ्या. कडेवर घ्या नाहीतर.. भाडे द्या .. उशीर होतोय.. सकाळी सकाळी कामाची खोटी..

आता कुणी कवी अशी अनरिझनेबल मागणी करायला लागला तर हे असेच होणार की नाही?"

"वा! खरंय हे!"

"पण नाही. हे चेकाळले की त्यांना आकाशातून चंद्र आणि तारे तोडून आणावेसे वाटतात."

माझ्या 'वा!' नी तो ही चेकाळला!

"बघ कवी काय म्हणतोय..

'तुजसाठी आणिन मी चंद्र आणि तारे

तू दिसता वाहती समुद्री मतलई वारे..'

एका प्राथमिक शिक्षकाने केलेली ही कविता ऐकलीय मी. तो बिचारा काय करणार? भूगोलात शिकवून शिकवून पाठ झालेले वारे अशा वेळी यमक जुळवायला कामी नाही आले तर उपयोग

काय त्यांचा? कालिदासापासून ते उंबरवाडी बुद्रुक मधील नवकवी उमाकांत सीताकांत झांबरें पर्यंत अगदी उज्ज्वल परंपरा असलेले हे कवी आणि कविवर्य."

"खरंय रे."

त्याच्या भडकू पाहणाऱ्या स्टोव्ह ला मी पिन मारू पाहात होतो.

"कालिदासाने तर ढगाला पकडून आपले पर्सनल काम करवून घेतले नि कविता लिहिली.. आमचे शिक्षक कवी वाऱ्यांना पकडून लिहिताहेत! पण कवीगण कशालाच नाही सोडणार. झांबरेंनी स्वतः लिहून ठेवलेय एके ठिकाणी,

'हृदयातील ऊर्मी उसळून येते क्रिकेटच्या चेंडू सारखी

आणि माझ्या भावना जातात थेट सीमारेषेपार'

हे झांबरे म्हणे त्यांच्या पूर्व प्राथमिक शाळेत असताना मोठे क्रिकेटर होते. त्यांना असल्या उपमा सुचाव्यात.."

"वा! छान!"

"छान काय? तुला सांगतो दुसरीकडे एका डॉक्टरने लिहिलीय ही कविता ..

'तू गेलीस तेव्हा वाटले

आयसीयूत जणू ॲडमिट मी

आणि येशील तू मग

सीपीआर द्यायला ..

पण तू असताना कशाला हवे ते

आपोआपच धडधडू लागेल ते बंद हृदय!'

म्हटले ना कशाला वेठीस धरतील हे लोक सांगता येत नाही."

"म्हणून तुझा कवितेवर राग?"

"नाही.. माझा आक्षेप फक्त कवितेला नाही. गद्यास ही तितकाच आहे. काही कविता गद्य आहेत की पद्य भले नसेल कळत पण त्यांना माझा आक्षेप आहेच.."

"वा!"

इथे या वा ची खरेतर काहीच गरज नव्हती. त्यामुळे असेल माझ्याकडे दुर्लक्ष करत तो बोलत राहिला ..

"पण गद्य म्हणूनच लिहिल्या गेलेल्या खऱ्याखुऱ्या गद्यालाही आक्षेप आहेच. काय चेकाळून लिहितात लेखक लोक. फक्त 'आम्ही असू लाडके' असा कवीगणांसारखा फाजील आत्मविश्वास दाखवीत फिरत नाहीत हे लोक हे एकच चांगलेय."

"हे एक खरंच."

"अरे, एका कथालेखकाने हे लिहून ठेवलेले वाचलेय मी.. थांब ह्या वहीत लिहून ठेवलेत हे विचारांचे मणी. ऐक.."

आपल्या कवीलोक घेऊन फिरतात तशा झोळीतून वही काढून वाचायला लागला तो..

"ऐक, 'सगळे जग शब्दमय असताना त्यातील काही शब्दांना अलगद पकडून आम्ही कागदावर उतरवतो. त्यांना कथा रूप देतो. आम्ही पात्रे घडवतो. पात्रांचे आयुष्य घडवतो. आमच्या इशाऱ्यावर नाचणारे शब्द म्हणजे आमची खाजगी मालमत्ता जणू. घडणे बिघडवणे आणि त्यांचे कर्ताकरविता आम्हीच. शब्दसृष्टीचे ईश्वर आम्ही. त्या जोरावर पात्रे आमच्या हाताच्या बोटावर नाचतात कठपुतळ्यांसारखी..' असे आत्मचिंतन या लेखकाने केलेले वाचलेय मी. आत्मचिंतन हा ही त्या लेखकूचाच शब्द."

"भाषाप्रभू आहे हा.."

"प्रभू? शब्दच्छलकार! तुला सांगतो कादंबरी म्हणजेही तेच. कथेचा वाढवून वाढवून मोठा केलेला अवतार. एका पात्राला दुसऱ्या पात्रीच्या प्रेमात धापकन पाडा नि मग त्यातून दोर लावून वर काढा.. किंवा मग त्रिकोण का चौथा कोन बनवून भौमितिक कादंबऱ्या लिहा. अगदीच सामाजिक वगैरे असतील तर त्यात

जगण्याचे मुद्दे घाला. अरे, जगण्याचे मुद्दे इतके महत्त्वाचे असतील तर ते सोडवा की. उगाच कागद नि शाईची नासाडी कशाला?"

तो पोटतिडिकेने बोलत असावा कारण त्याच्या पोटात तिडिक गेल्यासारखे भाव होते त्याच्या चेहऱ्यावर.

"मग ललित लिखाण म्हणून काहीतरी करतात काही. एक ललित लेखक म्हणे आयुष्याचा अर्थ सांगणारे निरूपण करत जगण्याचे सार सांगतो. खरे सांगतो, यापेक्षा अगदी कारल्याचे सार थोडे मीठ नि जिरे टाकून ही बरे लागेल. वर आरोग्यदायी!"

"सार .. यू आर्राइट सार.."

उडप्याच्या सारम् ची आठवण आली ते बोलताना मला.

"तुला माहितीये, समीक्षा नामक जाडी पुस्तके असतात म्हणतात. कॉलेजात समीक्षा सावे नामक फटाकडी होती. तिच्याही वाटेला कधी गेलो नाही तर ह्या जाडजूड समीक्षा ग्रंथांकडे मी वाकडी नजर करून कसा पाहीन?"

समीक्षा सावेकडे वाकड्या नजरेने न पाहणे समजू शकतो मी पण समीक्षा पुस्तकांकडे? तरीही म्हणालो, "तू तसा सरळ चालीचाच रे.. वाकड्यात कसा शिरशील?"

त्याच्या वाकडेपणावर मी वाकड्यात शिरलो पण सरळ तो पुढच्या मुद्द्यावर येत म्हणाला,

"राहता राहिले ते आत्मचरित्र. हे स्वतःच स्वतः चे लिहिणे बंधनकारक आहे म्हणतात. काही चरित्र नि आत्मचरित्रांइतकी रंजकता तर कथालेखनातही नसते म्हणतात. नसेलही. बाकी विनोद आणि नाटकं.. किंवा विनोदी म्हणून लिहिण्याची नाटकं.."

"हे खरंय. अरे मराठीला केवढी मोठी विनोदाची परंपरा आहे!"

"हुं! विनोद! पूर्वी पुलं देशपांडे म्हणून बरे लेखक होऊन गेले म्हणतात. लोकांना हसवणारे. जगात समस्यांचा महामूर महापूर असताना हसू कसे शकतात कोणी? आणि बाकीच्यांच्या इनोदाला हसण्यापेक्षा जागतिक समस्यांचा गांभीर्याने विचार का करू नये?"

मी हळूच हसलो तर म्हणाला,

"हेच. हसण्यावारी नेतात सारे.."

"हुं.." मला आता मनातल्या मनात हसण्यावाचून पर्याय नव्हता.. ते मी हसून घेतले.. पण तो पुढे बोलतच राहिला ..

पुढे काही दिवसांनी आम्ही असेच बसलेलो मारूतीरायाच्या पारावर. याच्या विनोदावरील रागास पारावार नसावा बहुधा. इतक्या दिवसांपूर्वीचा संवाद मागील पानावरून पुढे चालू असावा असे म्हणाला,

"बघ. हा विनोदाचा नमुना बघ. मी मुद्दाम ते पुस्तकातून उतरवून आणलेय!"

"म्हणजे तू पुस्तक वाचतोस की काय?"

"छे.. पण तुला पुरावा द्यायला म्हणून. नाहीतर कवटाळून बसशील विनोदाची मोठी परंपरा! ऐक हा संवाद.. 'हॅलो जोशी' नावाचे  विनोदी रहस्यमय नाटक म्हणवणाऱ्या नाटकातला .. ऐक हां..

'हॅलो जोशी का?'

'हो जोशी.'

'कोण? जोशी?'

'हो जोशी.'

'तुम्ही नाही, मी जोशी'

'मी जोशी.'

'मी मिसेस जोशी.'

'मी पण मिसेस जोशी.'

'कसे शक्य आहे. मिसेस जोशी मी आहे.'

'तुम्ही सांगा कसे शक्य आहे? मीच मिसेस जोशी आहे..'

'शक्य नाही. तुमच्या मिस्टरांचे नाव मिस्टर जोशी आहे?'

'अर्थात. माझ्या मिस्टरांचे नाव मिस्टर जोशी.'

'कसे शक्य आहे? ते माझे मिस्टर आहेत..'

'आई गं.. माझे पण मिस्टर जोशीच आहेत..'

'चूप सटवे..'

'सटवी कोणाला म्हणतेस गं? तू सटवी.. तुझी बहीण सटवी..'

'तुझ्या मावस, आते, मामे सगळ्या बहिणी सटवी.'

'सटवी कसले? अनेकवचनात सटव्या म्हण सटवे, साधे व्याकरण येत नाही सटवीला ..'

'कळळं बरं. व्याकरण शिकवते मला..'

( दरवाज्यावरची बेल वाजते..) 'थांब मिस्टर जोशी आलेच घरी..'

( दरवाज्यावरची बेल वाजते..) 'तूच थांब.. माझेच मिस्टर आले घरी..'

दोघी दरवाजे उघडतात .. परत फोनवर..

एकाचवेळी ..

'अय्या .. मिस्टर जोशी पण दोन, मिसेस जोशी सारखे .. व्हाॅट अ कोइन्सिडन्स ..'

असल्या बाष्कळपणास विनोद म्हणावा अशी अपेक्षा आहे तुझी? हीच का तुझी ती परंपरा? आणि मी सांगतो तुला, गद्य नि पद्य या आघाडीवरही एकूण कठीण आहे!"

मारूतीरायाच्या दर्शनाला हा औरंगजेब आल्याचे पाहून हनुमंताने पण फुत्कार सोडले असतील..

"हे एवढ्यावर नाही रे थांबत. संगीत.. शास्त्रीय अशास्त्रीय .. कसेही असो. पंडित म्हणवणारे कितीतरी वेळ गाण्याची एकच ओळ आळवीत बसतात. थोडे पाठांतर बरे असेल तर अशी वेळ ओढवेल का त्यांच्यावर? अगदीच नाही तर कागदावर लिहून नाही घेऊ? वर मग त्यांच्या रियाझाचे कौतुक. किती तास तंबोऱ्याच्या तारा खाजवल्या, रोज सकाळी कशा ताना घेऊन लोकांच्या झोपा मोडल्या वगैरे कौतुकमिश्रीत मुलाखती. मी म्हणतो ते हेच. अरे जगाकडे पहा. जग कुठं चाललेय आणि तुम्ही गळा नि तंबोरा खाजवत बसलायत. अगदी तबला नि पेटी वाल्यांचे पण असेच. त्यातल्यात्यात पेटी बरी. कमीतकमी गाणं ओळखू तरी येते. तबल्यावर तर तेही नाही."

काय दर्दी श्रोता आहे हा! पण त्याचे निरीक्षण काही चुकीचे नव्हते.

"लोकं काय लहानपणीच त्या मार्गावर लागतात म्हणे. आणि त्याला संगीत साधना वगैरे गोंडस नाव देतात. इतका वेळ आहे आपल्या हाती की नुसत्या संगीतामागे तो घालवावा?"

तरी बरे बेगम म्हणजे मिसेस औरंगजेबचे नाव संगीता आहे!

"मग ती चित्रकार वगैरे मंडळी. काय सांगावे त्यांच्याबद्दल? हुबेहूब चित्र म्हणे नि रंगसंगती. आणि काही एक अमूर्त चित्रकला ही असते म्हणे. आता तंत्रज्ञान पुढारले असताना हुबेहूब फोटो निघत असतील तर या चित्रांची काय ती मातब्बरी म्हणावी? उगाच आपला कागद नि रंगाचा अपव्यय आणि काय!"

कुठल्याश्या अशाच शनिवारी तेलाची वाटी उपडी करता करता या औरंगजेबाने आपले मनोगत व्यक्त केलेले ..

"कला आणि कलावंत .. किती कवतिक सगळ्यांचे करणार. अरे तो औरंगजेब बघा. ध्येयाने पछाडलेला. त्यामागे त्याने अशा साऱ्या गोष्टींना दिला ना फाटा? गायन वादन लेखन चित्रकला वगैरे अनुत्पादक गोष्टींचा तिरस्कार करणारा औरंगजेब.. आदर्श आहे या बाबतीत. बाकी त्याच्याबद्दल कोणी काहीही म्हणा. औरंग्या पापी म्हणा त्याला. पण असा आदर्श घालून देणारा आहे दुसरा कुणी राजा?"

"खरंय तुझं. नाहीतर नवरत्नं घेऊन दरबार चालवणारा अकबर.."

"खरंय ना मी म्हणतो ते? मला ठाऊक आहे सगळे औरंगजेब म्हणतात मला, माझ्या पाठीमागे. पण याबाबतीत आदर्श आहे माझा तो. त्याच्यावरून मी माझी ओळख बनवलीय.. अभिमान आहे मला माझाच.."

एकदा तर त्याने बॉंबच टाकला. म्हणाला, "मला लिहायचेय रे.."

"तुला आणि लिहायचे आहे? लिहिणार? आणि तू?"

"हो. अरे माझे हे मूलगामी विचार लिहून लोकांच्या हाती द्यावेत.. लोकांनी ते वाचावेत.. या सर्व खटाटोपातून एक जरी कलासक्त कलेच्या मागे लागणे सोडून खरेखुरे जगू लागला ना तर ती माझी माझाच विश्वास नसणारी लेखनकामाठी कामी आली म्हणेन मी!"

तो औरंगजेबाचा आदर्श मानणारा .. मारूतीसमोर बसून आपले ध्येय सांगतोय.. त्याच्या बाजूलाच चौसष्ट कलांचा नायक गणराय ही ऐकत असणार ते. पण त्याला त्याचे काही नाही.

"अरे, खरंच सांगतोय मी.. लिहिणार आहे मी.. औरंगजेब! लोकांना या कलामार्गावरून भटकताना पाहून जीव तुटतो रे.. त्यांना परत रस्त्यावर आणेन मी.."

आणेल ही हा बापडा!

.. बाकी औरंगजेबाचे तरी मागणे दुसरे काय होते?

# सगुणाबाई

आजी गेली नि पाठोपाठ सगुणाबाई निघून गेली. मी एकटी उरले खऱ्या अर्थाने.

आजी म्हणजे आई माझी. सगुणाबाई तिच्या देखभालीसाठी आली ती चारेक वर्षांपूर्वी. ती आईला आजी म्हणायची म्हणून माझ्या तोंडात पण तेच बसले.

आई माझी गेली तेव्हा नव्वदीची होती. पाच सात वर्षांपूर्वी अगदी तरतरीत आणि उत्साहाचे मूर्तिमंत उदाहरण असलेली आई अंथरूणावर खिळलेली पाहणे कठीण होते. हळूहळू त्याचीपण सवय झाली. शेवटी मेंदूचे आजारच असे. ना धड मरू देत, ना ही नीट जगू देत. हृदय धडधडतेय नि श्वास चालतोय म्हणून जगतोय म्हणायचे माणूस. काही वर्षे मी एकट्याने पाहात होते. मी एकटीच. म्हणजे यजमानांच्या अकाली जाण्यानंतर एकटीच उरलेले. मग गावाहून आई रहायला आली माझ्याकडे. मी बँकेतील नोकरी सांभाळून होते नि आई घरची आघाडी. मी रिटायर झाले तेव्हा आई सत्तरीत होती. तशीच कामात तत्पर आणि उत्साहाने सगळे

करणारी. लहानपणीच बाबा गेले. त्यानंतर आईनेच मेहनत करून वाढवलेले मला. लग्नानंतर मी इकडे आले. ती गावी एकटी होती. काय असेल नियतीचा संकेत तो असो, आम्ही दोघीच एकमेकांसाठी होतो जणू. कारण यांच्या जाण्यानंतरही आम्ही दोघीच परत एकत्र आलो. आई आजारी पडेतोवर माझी काळजी घेत ही होती नि करत ही होती. तशी माझी काळजी करायला फार काही कारण नव्हते, पण आई आहे म्हटले की पोरीची सकारण वा अकारण काळजी करणे मागोमाग आलेच. आजारी पडल्यावर देखील ती अंथरूणावर पडल्या पडल्या काही बाही चार शहाणपणाच्या गोष्टी सांगायची. जणू काही मी अजून शाळकरी मुलगीच होते. मग मी तिची काळजी घेण्याचे दिवस आले.. पण माझ्याच मागे गुडघेदुखी लागली नि सगुणाबाई आईची काळजी घ्यायला लागली कामावर आमच्याकडे. सगुणाबाई आली ती घरचीच होऊन राहिली. सगुणाबाई आली तेव्हा आई अंथरूणावर खिळलेली पण काही बोलत तरी होती. पुढे आई अजूनच खालावत चालली. इतकी की ओळखू येईनाशी झाली. काहीच वर्षांपूर्वी अखंड काम करणारी ती अशी एका ठिकाणी पडून राहिलेली .. बघूनही डोळे भरून येत. हल्ली हल्ली तर आईची तब्येत अशी की तिला आजूबाजूचे भान नव्हते. एकटे सोडून

चालणार नाही, आणि कितीही काळजी घेतली तरी कमीच अशी स्थिती झाली बिचारीची.

कोठून कशी कोण जाणे, सगुणा सापडली .. सगुणा मूळची खानदेशातली. बहुसंख्य येतात तशी मुंबईत जगण्यासाठी आलेली. भाकरीचा चतकोर चंद्र दिसण्यासाठी मेहनत करणारी. इकडे एका झोपडीत रहायची. आधी ती घरकामे करायची. हळूहळू आजारी लोकांची सुश्रूषा करायला शिकली.

"घरकाम करायची बाई मी. भांडी न कपडे. झाडलोट. पैसे मिळायचे पण कामाची मजा नव्हती.. म्हणून हे काम शिकले. नवरा दारू पिऊन नवरा असायची कामं पार पाडायचा. थकले त्याला सांभाळून. एक पोरगा पाठीशी सोडून गेला वर. दारूपायी घरदाराचा सत्यानाश. तो गेला न हे काम पकडलं. तो आजारी होता. हाॅस्पिटलात तेव्हा पाहून पाहून शिकले. तिकडे डॉक्टर न नर्स मिळतात पण ह्या कामाला कोण? मग त्याला साफ करणे, खाऊ पिऊ घालणे.. सारं करायची. तिकडचीच नर्सबाई म्हणाली, शिकून घे इकडे. ही कामं करायला चांगली माणसं पाहिजेत. त्यात बाईमाणूस असलं की लोकांना विश्वास वाटतो.."

मग सगुणाने तेच मनावर घेतले. नवरा गेला नि ती या पेशंटला सांभाळायच्या कामाला लागली. त्यातील बहुतेक अशीच अंथरूणावर खिळलेल्यांना आधार द्यायची कामे.

सगुणाबाई जे काही शिकली त्यात शिकण्याचा भाग कमी नि तिच्या स्वभावाचा भागच जास्त असणार. स्वच्छतेमागे ती वेडावल्यासारखी वागायची. घर झाडून पुसून लख्ख केल्यावाचून स्वस्थता नसायची तिला. ती घरी आली नि म्हणाली, "बाई, हे दोन बायकांचं काम हाय होय? मी सगळे करते .. उगाच दोन दोन जणांचा खर्च तुम्हाला .."

खरेतर तिला कामाबद्दल इतरांवर विश्वास नव्हता. तिच्यासारखी कामं इतरांना जमायची नाहीत हे  खरेच नि तिला इतरांचे काम पटायचे नाही हे ही खरे. आईची काळजी घ्यायच्या कामाला म्हणून लागलेली ती स्वतःहून सगळे घर सांभाळायला लागली. आमच्या दोहोंपैकी आई बोलेनाशी झालेली शेवटी. एखाद वर्ष तेव्हा माझ्याबरोबर ती एक सगुणाच होती बोलण्यासाठी.

शिकलेली नव्हती ती अजिबात. खरीखुरी अंगठाबहाद्दर. पण उपजत शहाणपणा अंगात मुरलेला असावा. त्यामुळे बोलता

बोलता काहीतरी महत्त्वाचे सांगून जायची ती. जीवनाच्या शाळेत शिकलेली ती. सगळ्या कठीण परिस्थितीतून तावून सुलाखून गेलेली. अशा परिस्थितीत एकतर माणूस मोडून पडतो नाहीतर परिस्थितीला भिडून त्यातून तावून सुलाखून वर तरी येतो. त्यातूनच सगुणा शिकत शिकत मोठी झाली असणार. त्यातून बोलता बोलता तिची कहाणी सांगायची ती. ते ही कधी मूड असला तर. उगाच गेल्या दिवसांतल्या संघर्षाचे रडगाणे न गाता ती सहज सांगत जायची.

नवरा तिचा मिलमध्ये होता. काही वर्ष सगळे चांगले होते. त्याला दारूची लत लागली नि सगळे चित्र पटापट पालटले. देशोधडीला लागायला कारण ठरणारी ती बाटली त्याने प्राण सोडेपर्यंत सोडली नाही. एक पोरगा पाठी ठेऊन तो गेला. सगुणा हाॅस्पिटलात कामावर लागली. एकेका पेशंटला सांभाळता सांभाळता शिकायला लागली.

"जेवढा पेशंट म्हातारा तेवढा सांभाळणे कठीण..

तुम्हाला सांगू बाई, एकेक पेशंट म्हणजे नमुना असतात. त्यात म्हातारं माणूस म्हणजे नखरे फार. एक आजोबा होते ते तर व्हसकन ओरडायचे अंगावर .. पण किती दिवस? पहिले आठ दहा दिवस. मग सवय झाली माझी की सगुणा सगुणा म्हणून मागे लागायचे. हे

वयच विचित्र पहा.. दुसरे लहान मूल .. पण तान्ह्या बाळाला दटावून शांत बसवता येतं.. ह्यांना थोडीच ओरडता येतं.. मी तर त्या आजोबांना सांगितलेले, बाबा काही झालं तरी मी काय जायची नाही. कितीही बोंबाबोंब करा. पण त्यांनापण माया कळते ना हातची. हळूहळू सवय होते. इतकी की एखादा दिवस नसली मी की म्हणतात, सगुणे नकोस सोडून जाऊ.. शेवटी या वयात माया लागते फक्त.."

आणि सगुणाची माया माझ्या अंथरूणातून न उठणाऱ्या आईलाही जाणवत असणार. सगुणा आली तेव्हा आईने जेवढा करता येईल तेवढा निषेध केलाच होता. पण काही दिवसातच सगुणे.. जरा बस की बाजूला म्हणून तिच्याशी जमेल तशा गप्पा मारू लागली ती. तिच्याकडून अंग पुसून घ्यायची, कपडे बदलून घ्यायची.. सगुणा पण तिला पावडर लावत कधी म्हणायची, 'चला.. आता शाळेत जायचे.. तयारी झाली..' तर कधी.. 'आजी, आता गाई गाई करा तर..' म्हणत लहान बाळासारखे आईला पांघरूणात गुंडाळायची. आईला मी भरवायची दोन्ही वेळेस तर पाठून ही 'अजून दोन घास खाऊ घाला बाई' म्हणून भुणभुण लावायची.

"तू बरी न थकता करतेस काम सगुणे.." एकदा विचारले तिला.. तर म्हणाली, "आपले कामच ते बाई. न थकता करावेच लागते. आजीचे करताना श्रम नाही जाणवत. माझी आई असती तर ती याच वयाची असती.."

"पण हे सगळे जमतं बरं तुला. कपडे बदलणे काय. अंथरूण पांघरूण साफसूफ करणे काय.."

"तुम्हाला सांगू बाई, हे काम म्हणजे माणसाची घाण साफ करायची. चांगल्या चांगल्या घरातली माणसं सुद्धा आपल्याच म्हातारा म्हातारीला साफ करायला तयार नसतात. नाक बंद करून बसतील पण हात नाही लावणार. नाकं मुरडतात या कामासाठी. तर कित्येकांना वेळच नसतो. बरोबर ना बाई.. सगळे जग धावतंय त्यात ह्या एका जागेवर अशा पडलेल्यांसाठी कसे कोण थांबणार आहे बाई?"

हे खरेच होते.

"सगळेच काही दुर्लक्ष करणारे नसतात, पण पोटापाण्याचा व्यवसाय कुणाला चुकलाय?

पण लोकं काय काय प्रकारची असतात सांगू बाई? कितिकांना तर आपले आईबापच जड झाले असतात. दिवस चे दिवस त्यांच्याशी एक शब्द बोलणे नाही की त्यांच्याजवळ बसणे

नाही. कितीही अंथरूणावर खिळलेले असले किंवा बेहोष असले तरी मायेचा हात कळतो त्यांना. पण माया असेल तर हात फिरवणार ना. कुणी तर इतके फटकून वागतात जन्मदात्यांशी. दोन भाऊ असतील तर एक दुसऱ्यावर ढकलतात.. बहिणींची तऱ्हा तर वेगळीच. एकीकडे तर चार बहिणींपैकी एक म्हणाली, बाईचे, म्हणजे माझे, पैसे मी वाटून देईन पण इस्टेटीतला चौथा हिस्सा देणार असाल तर.. माझा पगार जड होता त्यांना .. पण दर आठवड्याच्या पार्ट्यांचा खर्च जड नव्हता .. पण कुठे उलटे चित्र. वेळ मिळेल तेव्हा आईबापाला सांभाळणारी पोरं पण असतात. अगदी व्हीलचेअर वरून बाहेर फिरवून आणतात.. जमेल तितकी काळजी घेतात नि करतात ही. किती वेगवेगळे लोक.. आणि कुठे हे म्हातारे लोक पण काय कमी नसतात. आपली काळजी घेणाऱ्या पोरांना ही काहीही बोलतात. जणू सगळे काम सोडून त्यांनी बसून रहावे घरात. आणि काहींना तर म्हातारेच व्हायचे नसते. मग आपला राग जो दिसेल त्यावर काढत बसतात. पण काहीजण तशा अवस्थेतही पोरांची काळजी करतात.. जेवढे लोक तेवढे प्रकार बाई.."

'व्यक्ती तितक्या प्रकृती'चे सुलभीकरण करत सगुणा सांगत होती.

सगुणा मध्येच एखाद दिवस घरी जाते म्हणून जाऊन दुसऱ्या दिवशी परत येई. तिचा एक मुलगा आहे नि त्याच्या घरी जाऊन येई ती एवढेच कित्येक दिवस मला माहिती होते.

एके दिवशी पेढे घेऊन घरी आली..

"बाई पेढे घ्या.. पोरगा मोठा झाला. नोकरीत पुढे गेला.. प्रमोशन म्हणे.."

तिचा मुलगा कॉलेजात प्रोफेसर होता! बहुधा लेक्चररचा प्राध्यापक झाला असावा.

"काय सांगू बाई, मुलगा माझा गुणी. बाप दारू पिऊन गेला ते पाहून शहाणा झाला. झोपडपट्टीत राहून म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकला. कॉलेजात गेला. चांगल्या नोकरीला लागला. त्याचा पोरगा आहे पाच वर्षांचा.. घर आहे चांगले .."

"मग अजून तू हे काम करतेस?"

"पोरगा मागे लागतो, माय हे काम सोड, विश्रांती घे. तो म्हणतो यातच सर्व आले. कष्टाचे चीज झाले. कष्टाचे काही वाटत नाही बाई पण ज्याच्यासाठी करायचे त्याला त्याची जाणीव आहे एवढेच पुरेसे असते.. आता तर मलाच करमत नाही. सेवेचे काम बाई. डॉक्टर मिळतात, नर्स मिळते पण घाणीचे काम करणारी आया मिळत नाही. मिळाली तर नुसता पैशांचा हिशेब करणारी. आता

परिस्थिती चांगलीय. पोरगा कमावतोय. बिल्डिंगमध्ये घर आहे. पैशांची कमी नाही. आधी पैसे मिळवायला करायची काम. आता लोकांची गरज म्हणून. सेवेचे काम. पुण्याचे काम बाई."

सगुणेचे पुण्याचे हिशेब वेगळे असावेत. कारण सगुणा कधी व्रतवैकल्ये करताना दिसायची नाही. परिस्थितीने गांजलेल्या कित्येक जणी देवामागे लागतात नि त्या न पाहिलेल्या कुण्या देवाच्या भक्तीपायी इकडच्याच कुणी माणसाने आखून दिलेल्या व्रत नि वैकल्यांमागे लागतात. कसले कसले कडक उपास तापास नि पूजाबिजा.

"बाई मी कधी देवळात जात नाही. मोठमोठे संत महात्मा लोक सांगून गेलेत.. देव देवळात नाही .. माणसात आहे. चुकीचे कसे सांगतील? कबीराचे ते भजन आहे ना.. मोको कहां ढूंढे रे बंदे आणि आपला तुकाराम पण तेच म्हणतो. मग आपण त्यांचे ऐकायला नको? आणि आपले बाबासाहेब आंबेडकर सांगून गेले .. ह्या देवदेवळात अडकू नका .. मी पोराला सांगितले, बाबा ह्या माणसाकडून शिक.. शिक्षण घे. मोठा हो. नाहीतर नरकात जगणे काही सुटायचे नाही. पोराने ऐकले म्हणून आज मी सुखात आहे बाई.."

हे सांगताना ही सगुणा माझ्या आईचा बरबटलेला डायपर बदलत होती!

"मुलगा पण म्हणाला मला, आई हे देव देव काय खरं नाही. आम्हालाच नाही तर आमच्या सारख्या सर्वांनाच आंबेडकरांनी मार्ग दाखवला. पण आमचे लोक ग्रेट.. त्यांनाच देव मानायला लागले. त्यांना देव मानणे म्हणजे त्यांच्याच शिकवणुकीचा पराभव नाही का? त्यांची शिकवण मानत शिका नि मोठे व्हा की सहा डिसेंबरला एक दिवस नमस्कार नि बाकी दिवस दारू पिऊन नशिबाला नि जातीला दोष देत पडून रहा.. पोरगा फार गुणाचाय माझा बाई. अजून काय हवं. मोठमोठया घरातल्या पैसेवाल्यांच्या घरातली पोरं उडाणटप्पू बनतात. माझ्यासारखी नशीबवान मीच.."

एके दिवशी म्हणाली, "बाई तुमच्या घरात मी लवकरच रूळले.. पण नवीन घरी कामाला जायचे म्हणजे टेन्शन बाई. माणसं कशी असतील कुणास ठाऊक. त्यात मुंबई म्हटली वेगवेगळ्या प्रकारची माणसं. बाई म्हणून कोणी फायदा नाही घेऊ शकत.. तेवढी मी खमकी आहे. पण आमची जात.. जातपात मी पाहात नाही पण ती पाहणारे पण आहेत.. अगदी या मुंबईत. आता त्यांना वाटतात तशा वरच्या जातीतल्या बायका मिळतील का या

कामाला? नाही म्हणून येतात नाईलाजाने आमच्या मागे. पण असले लोक कमी बाई इकडे. गावाकडे ही जात बित फार.

मी मात्र शिकले ते एकच.. पहिले तुम्ही स्वच्छ रहा, भाषा सुधारा. घर छोटे असले तरी असे ठेवा की येणारा म्हणेल किती बरे वाटते इथे आल्यावर. टापटीप हवी. बघणारा नुसता बघून हुडूत हुडूत करेल असले कपडे नाही घालू. दोन साड्यांवर दिवस काढले, पण स्वच्छ धुतल्याबिगर नाही. अंगाखाली झोपताना घेतली घडी घालून की इस्तरी होते. उगाच रडतोंड्या चेहऱ्याने काम मागत फिरायची नाही मी. आणि इकडे आल्यावर प्रयत्न करून सुधारली ती भाषा माझी. म्हणजे गावची भाषा काही वाईट असलं नाही .. पण आपल्याकडे ही असली उतरंड आहे ना.. इंग्रजी बोलणारा तो मोठा.. तसा मराठी गावची भाषा बोलेल तो छोटा. त्यात अशुद्ध भाषा सुधारली तर काय वाईट आहे ना बाई? बामणाची भाषा बोलते तू.. मला एक पेशंटची नातेवाईक बोलत होती. आडून आडून जात विचारत असेल. पण खरं सांगते, मी अन माझ्या पोराने जात कधीच मागे सोडून दिली बाई. म्हणजे अगदी त्या रिजर्वेशनाचे फायदे पण. पोरगा माझा हुशार, म्हणाला माय, आपल्या मेहनतीने मिळवेन मी. कुणाची दया नको नि भीक नको .."

माझ्या डोळ्यांपुढे ते टीव्हीवरच्या बातम्यातले 'आम्हाला मागास म्हणा' म्हणत आरक्षणासाठी निघणारे मोठमोठे मोर्चे आले.. आणि इकडे ही सगुणा जातपात सोडण्याची गोष्ट करतेय! तिच्या पोरानी रिझर्वेशन सोडलं तेव्हा काय ती आता सारख्या सुस्थितीत नसणार. आणि महत्त्वाचे म्हणजे तिचा मुलगा तिच्यासारखाच विचार करतोय..

"बाई या मुंबई सर्वांना पैसे मिळतात. इकडे कष्ट करणारा कुणी उपाशी नाही राहात. आणि प्रामाणिक राहिला माणूस की मरण नाही कामाला. सुतळीच्या तोड्यालाही नाही हात लावत मी. मागे एकदा मात्र मी चोरलेला.. एक चमचा.."

"तू आणि चमचा चोरलास?"

"सांगेन नंतर कधीतरी बाई.."

नाही म्हटले तरी मुंबई सारख्या ठिकाणी कोणी कोणाचा भरवसा देत नाही. सगुणावर मी तर पूर्ण विसंबून होते.. पण कुणी चोरून चमचा का चोरावा आणि सगुणा तर स्वतःच आपली कबुली देतेय.. तिच्या स्वभावाशी विसंगत का वागली असेल तेव्हा ती.. मी नाही म्हटले तरी काही दिवस विचारात पडलेच. अगदी तोवर तिच्याबद्दल इतकी माहिती झाली असूनही.

आई गेली तेव्हा सगुणाच्या डोळयांत पाणी तरळले. जाताना म्हणाली, "बाई मला जायला हवे. इतकी वर्ष एका ठिकाणी मी काढत नाही. आणि काळजी घेतलेला पेशंट जाताना बघवत नाही मला. काही कारण काढून मी तो सोडते.. लक्षात येतं ना आपल्या आता ह्या पेशंटचे काही खरं नाही तेव्हा. ती चमचा चोरीची गोष्ट सांगितलेली मी.. ती चोरी मात्र वेगळ्या कारणासाठी बाई.."

"चमचा? आणि त्याची चोरी?"

"काय आहे बाई.. ते घर श्रीमंतांचे. मनाने कद्रू. मला दुपारी बाहेर झोपताना पंखा नाही लावू द्यायचे. लाइट बिल वाढते म्हणे. मला सगळीच सवय आहेच. पण असली वागणूक. त्या बाईंकडे पाहून टिकून राहिले. घर मोठे पण मनं कोती. कोणी बाईंकडे ढुंकून पाहिल तर. एकदा वाटले मला आता या बाई जाणार लवकरच देवाघरी .. मी विचार केला मला काढले कामावरून तर यांना तिच्याकडे बघावेच लागेल .. त्यांच्या लक्षात येईल असा चोरला एक मोठा डाव नि घातला पिशवीत. मग काय.. इतक्या वर्षांत कशाला हात न लावणारी मी.. तो मोठा चमचा पाहताच सगळे खवळले.. काढून टाकले नोकरीवरून.. बिचाऱ्या बाई एक दोन दिवसांत गेल्या. मी नाही म्हणून रडतखडत का होईना गेले असणार

बाईंकडे. कमीत कमी आपल्या माणसांच्या संगतीत तरी गेल्या असणार त्या. तेवढेच आपले मला समाधान .."

सगुणाबाई निघून गेली. आई गेली.. घर रिकामे झाले खऱ्या अर्थाने .. सगुणाबाई इतके शहाणपण कुठून शिकली असेल? जगण्यासाठी इतके काही करून वर आनंद आणि समाधान मिळवणारी ती.. अशिक्षित कशी म्हणावी? एके दिवशी कुठून कोणास ठाऊक.. इंग्रजी गुळगुळीत नि रंगीबेरंगी स्त्रियांचे कुठलेतरी मासिक घरी येऊन पडलेले. अशा विकाऊ मासिकांतल्या तोंडदेखल्या प्रगत स्त्रियांच्या मासिकांची मला तरी ॲलर्जीच आहे. नेमक्या त्या मासिकाच्या त्या अंकात 'वीमेन ऑफ सबस्टन्स' ची भली थोरली यादी होती. उच्चभ्रू समाजातल्या भरल्या पोटी फावल्या वेळात समाजसेवा करणाऱ्या कित्येक सुळसुळीत कपड्यांतल्या स्त्रियांचे तितकेच गुळगुळीत फोटो होते. नि गुणवर्णन होते. सगुणासारख्या खऱ्याखुऱ्या लढणाऱ्या बायकांना त्यात स्थान मिळणार नव्हतेच.. पण त्या रंगीबेरंगी महिलांहून तीच खरी वुमन ऑफ सबस्टन्स म्हणावी. पण..

.. पण नेटके पण विटके लुगडे घालणारी सगुणाबाई त्या गुळगुळीत पानांवर नसतीच शोभली..

## नटसूर्य

२३.९

आज पहिलाच दिवस कामाचा. बाबा तसे आजारी आहेत. पण बोलतात तरी व्यवस्थित. या वयानुसार जुने आठवते सगळे पण आताचे नाही. दुपारी जेवलेले विसरले पण दहा वर्षांपूर्वी कोल्हापूरात दौऱ्यावरच्या नाटकानंतर असला मसालेभात खाल्ला होता म्हणाले. मी मुद्दाम बनवलेला त्यांच्यासाठी. आवडीने खाल्ला. नंतर त्या जुन्या आठवणी सांगत बसले. मोठे नट ते. आता वयानुसार सारेच बदलले..

चांगले आहेत पण. नाटकासिनेमातल्या माणसांबद्दल ऐकून असतो आपण तसे नाही वाटत. पहिलाच दिवस माझा..

२४.९

आत्माराम चापेकर .. नटवर्य आत्माराम चापेकर. त्यांच्या घरातल्या कित्येक ट्रॉफीजवर हेच लिहिलेय. नटवर्य! शेवटची

ट्राॅफी पाच वर्षापूर्वी .. त्यानंतर आजारी पडलेत.. बाहेर जाणे नाही. एकटेच आहेत. बहुधा शिखरावरच्यांना हा एकटेपणाचा शाप असणार .. आता फक्त ते आणि त्यांच्या असंख्य ट्राॅफीज आणि ढाली उरल्यात.

२८.९

गेले दोनतीन दिवस बाबा चिड चिड चिडले माझ्यावर. बहुधा स्वतःचा असहाय्यपणा जाणवत असणार. कीर्तीच्या शिखरावरचा माणूस असा एकाकी. त्यात परक्या बाईच्या हातून सारे करून घ्यायचे म्हणजे थोडा त्रास होणारच. पण आता सवय करून घेतील. आज अगदी छान बोलले. म्हणजे मीच त्यांना त्यांच्या नाटकाबद्दल बोलते केले तर कळी खुलली त्यांची. प्रत्येक पेशंटचा असा आवडता विषय सापडला की काम सोपे होऊन जाते.. बाबा मोठे होते त्यांच्या काळी.. पण काळ थांबतो कोणासाठी? वयानुसार आता त्यांची मान हलते, हातपाय लटलटतात..

'मनीषाबाई, काय तो आवाज लागायचा सांगू.. साउंड सिस्टीम वगैरे आता आले.. बंद थेटरात शेवटच्या प्रेक्षकाला ऐकू जाईल असा बुलंद आवाज होता एकेकाळी .. शेवटच्या रांगेतला प्रेक्षक आला असतो तो नाट्यप्रेमी. त्याच्याकडे पुढच्या रांगेचे पैसे

नसतात. त्याचे पैसे वसूल आवाजावरच होतात .. आता कापतो तो आवाज..'

मी काय बोलणार? तो अजून खोलवरच जाणार आहे ठाऊक आहे मला.

८.१०

बाबा आता चांगलेच खुललेत. जुन्या गोष्टी सांगताना डोळे चमकतात, खोलवर गेले असले तरीही. पहिले नाटक केले ते आत्मा अमर आहे.. त्यात आत्म्याचा रोल.. आत्माराम चाफेकरांचा.

'बाई, तेव्हा मी नटवर्य नव्हतो. नुसताच नट होतो. पहिलेच नाटक. वेड म्हणा. कॉलेज संपलेले.. घरून बाबा म्हणाले, दोन वर्षे घे. नाटकात टिकलास तर ठीक नाहीतर नोकरीला लाग. आत्मा चालले खूप.. मग माझी गाडी सुसाट निघाली.. मग दिवसातून दोन तीन वेगवेगळी नाटके.. गावोगावी दौरे.. काय दिवस होते..'

१०.१०

बाबा आज उठताच म्हणाले, 'बाई, तीन वर्षे झाली..' कशाला विचारताच म्हणाले, 'मी स्टेजवर पहिल्यांदा आलो नि नुसत्या एंट्री

ला टाळया घ्यायला.. नुसत्या एंट्रीला कडकडाट नुसता .. तो ऐकू येतो मला..' इकडे यांच्या कानात ओरडून बोलावे लागते.. आणि तो टाळयांचा आवाज यांना स्पष्ट ऐकू येतो म्हणतात. असणार ही. 'आवाजाची काळजी घ्यायचो चांगली .. ही होती तेव्हा. रोज दूध हळद द्यायची .. गेली काही वर्षांपूर्वी. तेव्हापासून असा एकटा मी..'

हे वयच असं असते. कशानेही डोळे वाहू लागतात. बाबांचा आवाज कातर होतो.. आजचा दिवसभर जुन्या आठवणींची पोतडी उघडून बसले. बसले म्हणजे झोपूनच सांगत होते.. एका आयुष्यात किती आयुष्ये असतात .. नटाला तर फारच. कधी न्यायाधीश तर कधी चोर.. कधी डॉक्टर तर कधी पेशंट .. कधी पुढारी तर कधी रस्त्यावरचा सामान्य माणूस!

बोलता बोलता बाबा त्यांच्या नकळतच झोपून गेले ..

१४.१०

'तुम्हाला इतके कसे हो जमायचे कुठलेही रोल्स?'

'मनीषा, तुला सांगू, कठीण काम नाही ते.. बघायचे आपले कॅरॅक्टर कोण आहे, त्याची हिस्टरी पाहिजे.. मग तो चालेल कसा.. आता नाही चालता येत पोरी मला.. पण डॉक्टर चालतो वेगळा नि पोलिस चालतो वेगळा .. चालून दाखवले असते तुला.. मग काय

त्या कॅरॅक्टरला अंगात शिरू द्यायचे.. तात्पुरते. शो संपला की आत्माराम परत आपल्या जागी.. नाहीतर कुण्या चोराची भूमिका गंभीरपणे घेतली तर? किंवा एखाद्या राजाची! आणि कोण विचारणार एकदा प्रयोग संपला की!

पण मनी, तुला सांगतो, नाटकात सारेच खोटे.. फक्त ते इतके खोटे करायचे की खरे वाटायला हवे!

नट असतो ना तो मेहनत करून अभिनेता होतो.. मग अजून मोठा झाला की नटसूर्य!'

'नटवर्य बाबा!'

मी म्हणाले, तर ते म्हणाले, 'पोरी अगं, नटाचा होतो नटचंद्र.. परप्रकाशित. मग नटसूर्य व्हायला वर्षानुवर्ष मेहनत करायला लागते.. स्वयंप्रकाशित व्हायला. सगळेच नाही होत. कित्येक नुसतेच सीनियर होतात. नटसूर्य होऊन आपल्या तेजाने तळपणारे थोडेच. मी नाही नटसूर्य. पण लोक काय झाला म्हातारा त्याला नटवर्य म्हणतात..'

बाबा अगदी रंगात आलेले आज. दोन घास जास्त खाल्ले त्यांनी त्यात.

२०.१०

मी मनीषाबाईची मनीषा नि मनी नि नंतर नुसतीच पोर कशी झाले? आपलीच पोर असावी अशा मायेने डोक्यावर आपला थरथरता हात फिरवतात बाबा. खऱ्या भावना कळतात. काय गंमत आहे नाही? नट मंडळी हसतात नि रडतात खऱ्या आयुष्यात.. ते खरेखुरे आहे की नाही याचाही संशय यायला लागतो बाकीच्यांना. पण नाही. आधी मला घरून ते हाकलवायला निघालेले, साधारण दोन तीन आठवड्यात माझ्यावर विसंबून रहायला लागले .. आज म्हणाले मला, 'पोरी, आम्हाला न मूल न बाळ. पण मुलगी असती तर तुझ्याइतकी असती..' ही काही कुणी लिहून दिलेली वाक्ये तर नव्हती .. आणि पैलतीरी नेत्र लागलेली बाबा आता या आयुष्याच्या टप्प्यात माझ्याशी कशाला तोंडदेखले बोलतील?

२३.१०

आज आपल्या नाटकातले संवादच एकाएकी बोलू लागले. कुठल्याशा नाटकातले ऐतिहासिक संवाद. मोठमोठी वाक्ये.. कापरा नि खोल जाणारा आवाज. पण पाठांतर अजूनही चोख. म्हटले ना, जेवलात का विचारले तर माहिती नाही म्हणतील, आठवत नाही म्हणून हात करतील पण हे जुने पुराणे कित्येक वर्षांपूर्वीच्या नाटकातले उतारे अस्खलित म्हणत राहतील. त्यातले

काही शब्द कळतात, काही नाही. त्यांच्या आजारात वाचा अशीच अस्पष्ट होत जाते.. नटाला शरीरावर कंट्रोल हवा तोच जातो नि बोलण्यावरचाही. पण बाबा आता त्यापलीकडे पोहोचले. असहाय्य असण्याच्या जाणिवेपलिकडे असावेत. पण एकाच महिन्यात त्यांची वागणूक इतकी बदलावी? आता ते हक्काने बोलायला लागलेत.. आज म्हणाले, 'लागले नेत्र पैलतीरी.. आता कंटाळा आला जगायचा..'

२८.१०

मी मराठी घेऊन बी.ए. झालेय हे कळाले तर बाबा आश्चर्यचकित झाले.. मी म्हणाले त्यांना, मला नर्सिंग करायचे होते पण सायन्स जमेना, मग बी.ए. केलं. पेशंटला बघायची हौस.. त्यांना मदत करण्याचे समाधान आणि त्याबरोबर पैसेही मिळतात. मग हेच काम करते.. असे म्हणाले तर खूप चांगले काम करतेस पोरी.. देव कल्याण करेल तुझं म्हणून डोक्यावर हात ठेवला त्यांनी.

३.११

आज दिवाळी. बाहेरून आवाज येतोय फटाक्यांचा. पण बाबांना त्याचे काही नाही. जेवणात गोड केलं काही तर म्हणाले, 'आज काय विशेष?'

दिवाळी आहे म्हटले तर डोळयातून धारा लागल्या .. ही गेली ती दिवाळीतच. तेव्हापासून दिवाळी अंगावर येते ..

विषय बदलावा म्हणून म्हणाले, 'बाबा भर दिवाळीत करायचात का प्रयोग तुम्ही?' त्यावर, 'अर्थात! दिवाळी पहाटे आम्ही करायचो.. स्वातंत्र्य सूर्य.. प्रत्येक प्रयोग हाऊसफुल्ल.. एकात तर एकदा गायलो होतो मी.. पण ते गंमत म्हणून. आत्मा अमर रहे.. पहिले नाटक दिवाळीत आले.. आता हा आत्माराम अमर व्हायची वाट पाहतोय.. तुला काय वाटते? स्वर्ग नरक खरंच असतील? म्हणजे तिकडे जाऊन ही भेटेल परत?'

मी त्यांना काय सांगणार होते?

८.११

दिवाळी गेली. मला म्हणाले, 'पोरी दिवाळी गेली. तू घरी नाही गेलीस तुझ्या? माझ्यासाठी तुझी दिवाळी बिघडवलीस?' मी काय सांगणार होते त्यांना? वयाच्या ऐंशीव्या वर्षी आलेले एकाकीपण मला चाळिशीतच आले म्हणून? पण कोणीतरी विचारले तरी बरे

वाटते. बाबा तशी काळजी घेतात.. रोज रात्री झोपताना का होईना विचारतात, 'पोटभर जेवलीस ना मनी?'

११.११

चुकून बोलून गेले एकदा, 'मिस्टर माझे, दारू पिऊन गेले.. मोठया अपघातात.. ठोकली गाडी ..' तर आज बाबा दिवसभर नट नट्यांच्या मद्यपानाबद्दल बोलत राहिले. 'रंगदेवता म्हणे.. तिच्या देवळात असे मद्यधुंद कोणी कसे जाऊ शकतो? प्रयोग संपला की सारे यथासांग पीत बसतात.. मोठे मोठे नट संपले या दारूपायी.. उगाच आपल्या मद्यसेवनाचे समर्थन करतात.. मी आयुष्यात एकदाही त्या वाटेला नाही गेलो.. आमचा सुशांत गेला.. भूषण गेला.. दोघे चाळीस वर्षांचे. हा नाद वाईट .. लोक म्हणतात ही नाटक लाइन वाईट. पण त्यात नाटकांचा काय दोष? रंगदेवता काय आग्रह करकरून दारू पाजते तुम्हाला? मी कित्येक तरूण पोरांना त्यातून वाचवलं .. आजही ती पोरं गाजवतायत रंगमंच ..'

२०.११

आज बाबांचे जुने मित्र आलेले.. नाटकातलेच. सत्तरीतले असतील. बाबा रंगात आलेले.. 'विन्या, तू आलास तर बरं वाटलं

बघ.. हा नटसूर्य मावळण्याआधी आलास.. बरं वाटलं.. नाहीतर मावळत्या सूर्याला कोण कसले बघणार? सगळे उगवत्या सूर्यामागे..'

नाटकाच्या गंमती सांगत बसले. बाबांनी आणि त्यांनी एकत्र केलेली नाटके आठवत होते.. विन्या म्हणजे कोण? कोणास ठाऊक. मी ऐकत होते. नाटकाचा पडदा पडण्याआधी आणि नंतरच्या गोष्टी. बाबा मात्र येता जाता 'तू आलास.. बरं वाटलं' म्हणत होते .. जाता जाता म्हणाले, 'आता परत भेटशील की नाही नाही ठाऊक.. पण एकत्र काम करताना मजा आली नाही?'

२३.११

विन्याभाऊ म्हणून जे कोणी होते ते आलेले त्याला तीन दिवस झालेले.. मधे काही दिवस गेलेच नसावेत असे समजून बाबा परत म्हणाले आज, 'विन्या गेला का?'

'कधीच ..' म्हणाले मी तर बाबा म्हणाले, 'सांगून नाही गेला. असाच तो.. पडदा पडला की घरी धावायचा.. मुलगी त्याची लहान होती ना.. त्यात अपंग.. आजपण तसाच गेला तो.' बाबांना वेळेचे भान विसरायला होत होते.. काल भर रात्री उठवले मला..

विचारायला.. 'आज किती तारीख? मुहूर्त कधी आहे? डायरेक्टरला सांग, मी येतोच आहे..'

२९.११

बाबांची प्रकृती ढासळतेय. त्यांच्या घरचे कुणीच नाही तर मी बोलावू कुणाला? एक त्यांची दूरची मावस बहीण. मोठया मायेची पण बिचारी ती तरी दूरवर कशी येत राहणार. माझा पगार तीच देते.. पण दरवेळी बाबांची तब्येत नाजूक वाटली तर येणार कशी ती?

५.१२

बाबांनी आज कमाल केली. डोळे उघडले. आवाज पण बराच सुधारल्या सारखा वाटला. अगदी मागून जेवण घेतले.. तोच मसालेभात हवा म्हणाले. त्यांना भरवता भरवता त्यांचे बोलणे सुरू झाले.. मी म्हटले 'बाबा, आधी खाऊन घ्या, मग बोला..'

बाबा म्हणाले, 'पुढच्या क्षणाचा काय भरवसा मनी..'

आपल्या गाजलेल्या नाटकांच्या गोष्टी सांगत राहिले.. 'एंट्रीला टाळया.. मग हुकुमी लाफ्टर..कधी खुर्चीवरून पडतील की काय असे गडगडाटी हसणे.. हवे तिथे प्रेक्षकांचे चुकचुकणे.. हवे तिथे डोळे पुसणे.. हुकुमी अभिनय अगदी. इतक्या वर्षात अंदाज येतो ..

संवाद कसे बोलावेत.. वाक्यात जोर कशावर द्यावा .. सगळे प्रकार अभिनयाची परीक्षा पाहणारे.. अख्खे शरीर हेच नटाचे भांडवल.. ते वापरून नाटकातील व्यक्तीरेखा उभी करणे.. हा आत्माराम आपला आत्मा दोन तीन तासांसाठी बाजूला ठेवायचा. नाटकातल्या व्यक्तीचा आत्मा मग त्यांच्या शरीरात शिरायचा.. त्याची भूक मोठी. प्रेक्षक स्तब्ध झाले पाहिजेत.. हलले पाहिजेत मुळापासून .. ते साधायला इतकी वर्षे तपश्चर्या केली.. नटाचा नटसूर्य.. आणि लवकरच तो आता अस्ताला जाणार.. नटसूर्याचा अस्त.. पोरी मी गेलो तरी नाटकातले कुणी येणार नाही .. खांदे द्यायला चार जणांना जमवेल विन्या. सर्व उगवत्या सूर्याला नमस्कार करतात. मावळता काळाच्या सागरात बुडून जाईल..'

८.१२

त्या दिवसानंतर बाबांनी बोलणेच सोडलेय. कसेबसे जेवण भरवते.. त्यांना पाहून मनात पाल चुकचुकते.. त्यादिवशीचे बोलणे म्हणजे विझण्यापूर्वी दिवा फडफडतो तसे तर नाही काही?

१५.१२

बाबा गेले. दोन अडीच महिन्यात चांगलाच लळा लावून. विन्याभाऊ आलेले. अजून दोनचार कुणी. नटसूर्य गेले.. तर तमाम

नाट्यसृष्टी गर्दी करेलसे वाटले होते. पण बाबा म्हणाले तसेच झाले, मावळत्या सूर्याकडे कोण बघतो? पण असेच कशावरून? कदाचित नाटकातल्या लोकांना बातमी कळलीही नसेल.. गेली काही वर्षे विस्मृतीत गेलेल्या नटवर्यांची बातमी पोहोचलीही नसणार.

१७.१२

सारे आटोपले दोन दिवसांपूर्वी घरी आले. उद्यापासून दुसऱ्या एका घरी. गेल्या दहा वर्षात अशा पेशंट्सच्या आठवणींच्या कित्येक डायऱ्या जमल्यात. नटवर्य आत्माराम चाफेकरांची डायरी पन्नासावी.. ना ना व्यक्ती ना ना तऱ्हा..

२५.१२

आज बाजारात विन्याभाऊ भेटले.. त्यांनी सांगितले ते ऐकून धक्काच बसला .. बाबा गेले तर नाटकातले कुणीच कसे नाही आले विचारले मी.. एवढे नटवर्य गेले.. त्यावर विन्याभाऊ म्हणाले, 'आत्माराम काय सांगून गेला तुम्हाला माहित नाही.. अहो सामान्य वकुबाचा नट तो.. हौस दांडगी नाटकाची.. माणूस मात्र एकदम सच्चा.. नाटकात राहून असा निर्व्यसनी आणि साधासुधा.. शोधून सापडणार नाही.. पण शेवटी त्यावर काय आहे? इकडे तुमच्या

नावावर गल्ला जमेल तोच मोठा .. मग भले तो उशीरा येवो की दारू पिऊन धिंगाणा घालो..'

मी चकित झाले..

त्या सगळ्या ट्राॅफीज ते स्वतः बनवून घेत म्हणे. स्वतःच स्वतःला दिलेले बक्षीस. प्रत्येक मोठ्या बक्षीस समारंभाच्या वेळी बाबा अशा ट्राॅफीज बनवून घेत.. मोठा नटवर्य बनण्याची हौस, पण त्यांची तितकी झेपच नव्हती त्याला नाट्यसृष्टी काय करणार? अगदी पहिल्या नाटकापासून हे असेच. दुय्यम भूमिका.. कधी अगदी छोट्या छोट्या पण काहीच काम मिळत नसेल तर.. कुणी नटवर्य म्हणो न म्हणो, शेवटी ते स्वतःलाच नटसूर्य म्हणवून घ्यायला लागलेले. आणि शेवटच्या आजारात तर काय? सत्य आणि कल्पनेच्या सीमेवरच होते ते..

पण नाही.. मी विचार करते तसे लक्षात येते.. बाबांनी माझ्यासमोर हा शेवटचा रोल बेमालूम वठवला. ते नटसूर्य नव्हते कधी.. पण खरेखुरे नटसूर्य असल्याचा हा अभिनय जमला अगदी व्यवस्थित त्यांना. जाता जाता का होईना जीवनाच्या नाटकातली ही भूमिका अगदीच बेमालूम झाली.. अगदी पात्राच्या अंतरंगात शिरून..

# धृतराष्ट्र

'टेहळणी बुरूजावरून..'

आमच्या ऑफिसात नव्यानेच एक 'पुणे काकदृष्टी' पेपर यायला लागला.. नि त्यात या नावाने एक सदर सुरू झाले.. त्यावर एक चष्मिस माणूस गोफण घेऊन उभा असल्याचे चित्र.. आणि खाली लेखक म्हणून नाव धृतराष्ट्र.. लिहिण्याची पद्धत तीच.. आजूबाजूच्या घटनांवर मल्लीनाथी. एकेकाला गुदगुल्या करून मारणाऱ्या अस्वलाची स्टाईल. खाली धृतराष्ट्र नाव पाहिले नि म्हटले हा तोच असणार .. आमचा धृत्या..

तो म्हणजे धृतराष्ट्र. आणि त्याचा तो चष्मा. तो ही उलटा. अंध धृतराष्ट्राने चष्मा घातला की न घातला.. मग तो सुलटा असो की उलटा .. काय फरक पडणार आहे? पण आमचा हा धृतराष्ट्र वेगळा..

महाभारत हा आपला एक मानबिंदू आहे.. कृष्ण भर युद्धात अर्जुनाला गीता सांगतो नि अर्जुन त्या धुमश्चक्रीत ती समजून ही घेतो.. आणि लगेच  अंमलातही आणतो. अगदी देवाधिदेव कृष्ण का सांगेना ती पण समजून घेणारा तितका हुशारच हवा की नाही? नंतर खुद्द ज्ञानेश्वर इतरेजनांना ती साध्या भाषेत सांगतात .. नि आज गीता रहस्य सांगायला टिळकांसारखे विद्वान लागतात. सुबोध गीता सांगायला कित्येक निरूपणकार सरसावतात ..

म्हणजे ओरिजिनल गीता कृष्णाच्या तोंडून डायरेक्ट समजून घेणाऱ्या अर्जुनाची बुद्धिमत्ता काय असेल? असो. विषय तो नाही. सांगायचे इतकेच की धृतराष्ट्रासहित सारे कौरव बदनाम नि सारे पांडव सारे नामवंत झाले. नामवंत म्हणजे आज पाची पांडवांची नावे बारश्यात ठेवली जातात .. पण एकतरी दुर्योधन दु:शासन नामक दिसतो कुणी? काही शासनकर्ते दु:शासनाला विशेषणाचा दर्जा मिळवून देतात हा भाग वेगळा पण नाम म्हणून त्याला तो दर्जा नाही मिळत. कर्णही करण म्हणून उत्तर भारतात भेटतो.. त्याची माता कुंती असल्याने त्याला झुकते माप मिळत असेल. पण स्वत: राजा असूनही धृतराष्ट्र नामक एकही कोणी व्यक्ती या डोळस महाराष्ट्रात सापडायची नाही.. आणि बिचारी ती गांधारी देखील.. तिच्या नावाचे पण कुणी दिसणार नाही. पण आमच्या मित्राला

आम्ही प्रेमाने धृतराष्ट्र नाव ठेवलेले.. धृत्या हा त्याचा अतिप्रेमाने केलेला अपभ्रंश ही.

म्हणजे धृतराष्ट्र नामकरणामागे मोठे रामायण घडलेले. आमच्या कॉलेजच्या गॅदरींगमध्ये आरण्यक नाटकातला एक प्रवेश बसवलेला. हा त्यात धृतराष्ट्राची भूमिका करत होता. अगदी भूमिकेत शिरला तो.. डोळे असूनही अंध. बोलता बोलता जाऊन कुंतीच्या अंगावर धडकला.. गांधारी.. नाटकातली.. डोळ्यावरच्या पट्टीआडून बघत राहिली .. कुंती गोंधळली.. त्या गंभीर सीनमध्येही प्रेक्षकांना हसू फुटले. कुंतीने म्हणजे नाटकातल्या मुलीने नाटक संपल्यावर थैमान घातले.. कसेबसे प्रकरण मिटले.. पुढे हीच कुंती मिसेस धृतराष्ट्र झाली नि एक नवीन महाभारत कथा लिहिली गेली हा भाग वेगळा.. पण त्या नाटकानंतर हा धृतराष्ट्र म्हणून फेमस झाला. धृत्याचे मूळनाव त्यालाही विसरायला झाले असणार. त्याचे बारसे झालेले कॉलेजच्या पहिल्याच वर्षी आणि शेवटच्या वर्षापर्यंत त्याचे मूळ नाव उरलो नावापुरता म्हणून राहिले होते.

असा हा धृतराष्ट्र .. जाड भिंगांचा चष्मा घालणारा. अभ्यासात हुशार, थोड्याफार कविता करणारा असला तरी त्या कधीही ऐकवून काव आणणारा नव्हता तो त्यामुळे तसा सुरक्षित

होता कंपनी म्हणून. लिखाण करायचा कॉलेजच्या भित्तीपत्रकात. म्हणजे दर आठवड्यात भित्तीपत्रकात याचे नवे सदर असायचेच. अगदी परीक्षा असली डोक्यावर तरीही. आणि त्याचे नावही त्यानेच ठेवलेले.. धृतराष्ट्राचा उलटा चष्मा! तो त्या लिखाणामुळे पोरांत नि खरेतर पोरींत फार पॉप्युलर होता. दर बुधवारी त्याचे लिहिलेले वाचायला गर्दी होई.. लिहायची पद्धत म्हणावी तर एकेकाचे पाय ओढायचा तो. सगळे काही कॉलेज घडामोडींशी निगडीत. कुणा शिक्षकांबद्दल, पोरापोरींबद्दल नि एकूण कॉलेजच्या गोष्टींबद्दल. कुठून कुठून माहिती काढत लिहायचा. एकेकाला टपल्या मारायचा. बरे लिहायचे तर असे की ज्याची टर खेचावी तोही हसायला तयार.. असा त्याचा तो उल्टा चष्मा कॉलेजची चारी वर्ष चालला..

कॉलेज सोडताना बहुतेक सगळेच त्याच्या उल्ट्या चष्म्याच्या आठवणी घेऊन गेला. या गोष्टींनाही आता कित्येक वर्षे उलटली. धृतराष्ट्र नि त्याचा तो उल्टा चष्मा अजूनही सगळयांच्या आठवणीत आहे.

'काकदृष्टी'त ते नाव पाहिले नि त्याची आठवण आली. म्हटले हा तोच का ते शोधावे. काकदृष्टीचे ऑफिस माझ्याकडे

ऑफिसच्च्या जवळच निघाले. म्हणजे आजवर माझ्या काकदृष्टीतून सुटले होते की काय? अगदी दोन बिल्डिंग सोडून असलेले ते ऑफिस मी काखेत कळसा घेऊन गुगलच्या आंतरदेशीय जालातून वळसा घालून शोधून काढले. त्या ऑफिसात गेलो.. धृतराष्ट्राला भेटायचेय म्हणालो ..

तिकडचे गृहस्थ म्हणाले, "छे हो. या नावाचे कुणी नाही .."

"तुमच्या पेपरात लिहितात ते?"

"धृतराष्ट्र?"

"टेहळणी बुरूज .."

"बुरूज?"

"ते गोफण घेतेलेले.."

"ओह.. ते होय! नाही."

"काय नाही .."

"पर्वानगी नाही .."

"कशाला?"

कशालाच नाही..

"म्हणजे? चौकशी करतोय नुसती .."

"पर्वानगी नाही.."

"म्हणजे?"

"म्हणजे म्हणजे काय?चौकशीला पण पर्वानगी नाही.."

"अहो पण.. त्यांचा पत्ता .."

"कट्.. पत्ता कट्. उगाच चांभार चौकशा नकोत .. अजून काही हवंय?"

"संपादकांना भेटायचेय.."

"पर्वानगी नाही .."

"भेटायला.."

"पर्वानगी नाही .."

"मग कशाला आहे पर्वानगी?"

"रवानगी .. इकडून रवानगी ला पर्वानगी आहे.."

हा बाहेर बसलेला इसम अगदी चेहऱ्यावरची सुरकुती हलू न देता बोलत होता.. फक्त पर्वानगी नाही इतके म्हणायला नाहीतरी कितीशा हलवाव्या लागतात सुरकुत्या?

जाता येता ते काकदृष्टीचे ऑफिस दिसायचे. खरेतर ते तिथेच होते पण आजवर कधी पाहिले नव्हते. दिसणे आणि पाहणे यात एवढा फरक असावा? जाता येता हटकून नजर पडायची त्यावर. दर

बुधवारी 'काकदृष्टी'तील 'टेहळणी बुरूजावरून' वाचणे चुकायचे नाही .. धृतराष्ट्र त्याच फा ॅर्मात होता. आजूबाजूच्या घटना नि राज्यातील घटना.. क्वचित कधी देशभरात घडलेले काही.. त्याची चुरचुरीत शैली तशीच होती. दिवसेंदिवस हा तोच.. आमचा धृत्या असणार असे वाटत होते.. एके दिवशी एकाएकी माझ्या काहीतरी ध्यानात आले. काकदृष्टीच्या संपादकाचे नाव पाहिले तर 'सविता जी. जी.' होते. पत्ता तोच होता.. फोन नंबर होता .. फोन केला तर त्याच पर्वानगीवाल्याने उचलला .. धृतराष्ट्राच्या खऱ्या कुंतीचे नाव सविता .. जी. जी. म्हणजे तोच गणेश गोविलकर तर नसेल? धृतराष्ट्राचे ते खरे नाव.. फारसे कॉलेजात न वापरात असलेले .. माझ्यातला जणू डिटेक्टिव्ह जागा झाला..

एके दिवशी मला तो दिसलाच. मी गाडीत होतो. त्या पेपरच्या ऑफिससमोरून चाललेलो.. काकदृष्टीच्या बिल्डिंगबाहेरून धृत्या घाईघाईत आत शिरत होता. गाडी थांबवून मी जोरात हाक मारली खरी.. पण ती न ऐकता तो आत जवळजवळ धावत निघून गेला. तो धृतराष्ट्रच असणार? इतका योगायोग तर शक्य नाही .. की कोणी त्याच्यासारखाच दुसरा असावा.. तो त्याच ऑफिसात.. त्याच्याचसारखे आणि धृतराष्ट्र नावाने लिहित

असावा .. सविता म्हणजे कुंतीच असणार त्याची.. माझी खात्री पटत होती. पण कॉलेजातले आम्ही जवळचे मित्र .. मला तो का टाळत असेल? की हा तो नव्हेच?

काही दिवस गेले मध्ये नि दुपारी फोन घणघणला..

"मी धृत्या बोलतोय रे.."

मी तीन ताड उडालो.

"कधी रिकामा असशील.. भेटूयात.. मीच येतो."

"तुला मी कुठेय.."

"मला सारे ठाऊक आहे. भेटलो की बोलतो.."

दोन दिवसांनी धृतराष्ट्र आला. त्याला मी इथे आहे ते ठाऊक होते.. आणि आजवर तो मला टाळत होता.. त्यामागे त्याची कहाणी होती..

धृतराष्ट्र आला.. बराच वयस्कर वाटत होता खऱ्या वयापेक्षा. कॉलेज सोडल्यावर पहिल्यांदाच भेटत होता. पंचवीस एक वर्षे झालेली. कॉलेजच्या त्या दिवसानंतर सगळे वेगवेगळ्या दिशांना

पांगले. कामाला लागले नि संसारात पडले. त्याही जबाबदाऱ्या कमी व्हायचे वय आमचे. इतक्या वर्षांनी त्याला भेटताना एकदम जुने दिवस आठवत होते..

"आहेस कुठे धृत्या तू.. काकदृष्टीतला तूच ना लेखक .. आणि असा पळतोस कसला .."

"एकावेळी इतके प्रश्न? पण तुला मी सगळे सांगेन.. पण आता नकोच ते.. परत भेटू तेव्हा .. वेळ काढून. तू भेटलास.. बरे वाटले. तसा तुला मी पाहात होतोच.. तू आलेलास त्या दिवशी ठाऊक आहे मला. तुला आमचा काकदृष्टी कसा काय मिळायला लागला? मीच पाठवतो तो.. माझाच पेपर .. तुला इकडे पाहिले म्हणून पाठवायला लागलो.."

"अजून छान लिहितोस तू.. मला नाही वाटत धृतराष्ट्राचा उल्टा चष्मा कुणी विसरला असेल अजून .."

"हुं.. विरंगुळा आहे तो माझा.."

इकडतिकडच्या गप्पा झाल्या..

का कोण जाणे बोलताना तो थोडा हातचे राखून बोलतोय किंवा काहीतरी गडबड झाली असावी असे बोलत होता..

निघताना तोच म्हणाला, "कधी भेटूयात रे..?"

मग एके दिवशी आम्ही निवांत भेटलो. त्यानेच बोलावून घेतले, त्याच्याच पेपरच्या ऑफिसात.. आणि सारी कहाणी ऐकवली त्याची.

"तुला सांगतो, दुबईला होतो आम्ही कित्येक वर्षे. माझा जॉब होता. सविता .. तुला ठाऊकच आहे ती. वुई गा◌ॅट मॅरिड.. दोघे तिकडे होतो.. ती घरून काम करायची. देन वुई हॅड किड्स. जुळे होते.. लव आणि कुश. रामायणातून डायरेक्ट उचलली नावे.. पोरं मोठी होत होती. आम्ही दुबईत छान सेटल होत होतो. सगळे काही होते.. आणि एके दिवशी एका अपघातात लव आणि कुश दोघे गेले.. आम्ही दोघे बचावलो .. पण सोन्यासारखी लेकरं गेली. अरे सात वर्षं काय जायचं वय आहे? मग काय.. सारंच बिघडत गेलं. सविताचं कामातून मन उडाले. मला जॉबमध्ये इंटरेस्ट वाटेनासा झाला. एक दिवस सारे सोडून इकडे आलो निघून .. आम्ही इकडे आलो .. जणू काही देश बदलल्याने सारे काही विसरणार होतो दु:ख आम्ही. कुणाला भेटावे वाटेना. तुलाही टाळत होतो. जगात आपल्याच मुलांना अग्नि देण्यासारखे दु:ख नाही रे. दोन तीन वर्षे मन भरकटत राहिले. सविता आपलीच सावली असल्यासारखी उरलीय.."

"मग हा पेपर?  तिचेच नाव ना संपादक म्हणून?"

"अरे.. तिचे नाव नावापुरते. तिच्या जिवंतपणाची निशाणी म्हणून. सगळे मीच पाहतो.. काही महिन्यांपूर्वी तू दिसलास.. कॉलेजचे दिवस आठवले.. तो धृतराष्ट्राचा उल्टा चष्मा आठवला. वाटले परत तसेच लिहावे.. मग लिहायला लागलो.. लोकांना आवडतेय.. लोक विचारतात हा धृतराष्ट्र कोण? मीच सांगून ठेवलेय.. ना ॅट टू डिस्कोल्ज. अरे वाचणाऱ्याला वाटेल हा किती हॅप्पी गो लकी माणूस असणार. मी हा असा.. असे लिहिणे म्हणजे विरंगुळा. आजूबाजूला नुसते बघितले की विसंगती दिसायला लागतात.. लोकांच्या बोलण्यातल्या.. वागण्यातल्या. कॉलेजात पोरांची टर खेचायचो.. इकडे तर मोठया प्रमाणात कच्चा माल देतात लोक. लिहितो. तेवढेच काही क्षण आनंदात जातात. धृतराष्ट्राची आठवण जिवंत राहते.."

"आणि सविता?"

"तिचे काय? ती अजून त्या धक्क्यातून बाहेर आलेलीच नाही.. राहून राहून मला ते नाटक आठवतंय.. आरण्यक.. तुला आठवतं?"

"अर्थात. कसे विसरेन? त्यानंतरच तुला धृतराष्ट्र नाव पडलेले ना?"

"अरे.. तुला सांगतो अगदी त्या नाटकासारखे झालं बघ.. ती एक त्यांच्या दु:खाची नि वेदनांची गाथा.. कुणी हरले म्हणून पुत्रशोकाने व्याकूळ .. कुंतीतर जिंकून ही हरलेली तशीच.. तशीच ही आमची कथा. आम्ही आमच्या गेलेल्या मुलांच्या दु:खात .. अजूनही सावरलो नाही.. तिकडून दूर निघून आलो.. जंगलात ते निघून गेलेले तसे. कुंती म्हणजे माझी सविता .. त्या नाटकातही आपल्या प्रथम पुत्रास गमावते त्याचे दु:ख तिला .. बाकी पाच पांडव जिंकल्याचा आनंद नाही तिला तर गेलेल्या सूर्यपुत्राचे दु:ख खातेय तिला.. तसे सविताला दु:ख कुरतडून खातेय.. मी तिचे सांत्वन कसे करणार? धृतराष्ट्र अंध असेल तर मी हा असा.. आधार देणारा स्वतःच डळमळीत असेल तर? अरे आधाराला आपण काही पकडतो तो तरी स्थिर असला पाहिजे की नको? नाटकात जंगलातील वणवा सगळ्यांना घेऊन जातो.. वुई आर फेसिंग रियल लाइफ ट्रायल बाय फायर.. बट आयॅम ट्राइंग माय बेस्ट टू ओव्हरकम .."

धृतराष्ट्राची कथा अशी गणेश गोविलकरच्या आयुष्यात खरेच घडावी? त्याला धृतराष्ट्र नाव पडले ते कॉलेजच्या दिवसातला टारगटपणा म्हणून. ज्या नाटकावरून त्याला नाव पडले

त्यातली कुंती त्याला जीवनसाथी म्हणून भेटावी.. आणि दोघांच्या आयुष्याचे असे दु:खाचे आरण्यक व्हावे?

धृतराष्ट्र म्हणजे गणेश अधूनमधून भेटत असतो. त्याचा तो पेपर चालतोय त्यातील लोकप्रिय 'टेहळणी बुरूजावरून' सकट.. त्यात त्याबद्दल वाचकांची पत्रे येत राहतात .. आणि धृतराष्ट्र म्हणजे नक्की कोण याबद्दल चर्चा अजूनही रंगतेय..

# निवृत्तीबुवा

खूप वर्षांनी गावी जाणे झाले.. देवळात पिंपळाच्या पारावर कांबळे सर भेटले. इतक्या वर्षांत सर वयस्कर दिसायला लागलेले. तिथल्या तिथे वाकून नमस्कार केला ..

"कोण रे तू? डोळ्यांनी कमी दिसते .. वय वाढते तशी भिंगं ही जाड जाड व्हायला लागतात."

मी नाव सांगितले तसे काही आठवल्यासारखे करत सर म्हणाले,

"म्हणजे ऐंशीची बॅच."

"होय सर."

"तू म्हणजे हुशार. शाळेत पहिला येणारा. पण मध्ये मध्ये बोलायची सवय तुला. तसं फार चुकीचे नाही पण एखादे मार्मिक वाक्य बोलायचास.. हुशार होतास ना. पण शाळेतल्या शिस्तीत नाही बसत ते. मग अवसरे बाईंनी भर मैदानात सगळ्या शाळेसमोर थोबाडीत दिलेली.."

"सर.. इतके सारे कसे लक्षात तुमच्या?"

"अरे, दर बॅचच्या फायली डोक्यात तयार आहेत. फक्त नाव घातले की डिटेल्स बाहेर.. काहींबाबत तर जास्त.. तसे मैदानात मध्ये बोलणे शिस्तीबाहेर.. पण तू बोललास ते काय चुकीचे तर नव्हते .. आणि सर्व शाळेसमोर थोबाडीत मारणे.."

इतक्या वर्षात मी ते विसरून गेलेलो. तसे काही झालेले एवढी अंधुक आठवण उरलेली.

"अरे, मुलं त्यावयात मातीच्या गोळयासारखी असतात. घडवाल तशी घडतात. त्यांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचेल अशी शिक्षा मामुली गोष्टीसाठी.. मी अजून नाही विसरलो."

अवसरे बाईंनी भर मैदानात माझ्या श्रीमुखात मारलेली चापट सरांनाच जास्त इजा करून गेली असणार. इतक्या वर्षांनी सरांना तेच आठवतेय अजून..

"जाऊ देत हो सर. मी आता विसरून गेलोय."

"ते ठीकच आहे. सर्व गोष्टींना काळ हा एकच उपाय आहे. काळ जातो तशा वेदना बोथट होत जातात. कसा आहेस तू? नोकरी की धंदा? जे काही करशील प्रामाणिकपणे कर. आपल्या शाळेचा विद्यार्थी तू. तुला सांगायला नको.."

"खरंय सर.."

मी माझ्याबद्दल सांगितले. दहावीत शाळा सुटली. बारावीत मराठी भाषा ही विषय म्हणून सुटली. पण कांबळे सर मराठी शिकवायचे. त्या भाषेची कायमची गोडी लावून गेलेले. मला एकाएकी जुना प्रसंग अगदी डोळयांसमोर उभा राहिला. मी आठवी किंवा नववीत असेन. आमच्यापासून दूर दोन गावं सोडून माझं आजोळ होतं. आईबरोबर तिकडच्या जगदंबेच्या देवळात कीर्तनाला गेलेलो मी. कीर्तनकार ह.भ.प. निवृत्तीबुवा. देऊळ गच्च भरलेले. श्रोते तल्लीन होऊन ऐकताहेत. एका क्षणी माझ्या लक्षात आले तसा मी आईला म्हणालो, "आई हे तर आमचे कांबळे सर."

आईने ऐकून न ऐकल्यासारखे केले.

कीर्तन संपले. सारे श्रोते कीर्तनकाराच्या पाया पडत होते. पाया पडतापडता मी 'सर' म्हणून हाक मारली. सर क्षणभर चमकले असावेत. परत सावरत आपल्या कीर्तनकाराच्या भूमिकेत शिरले. हा प्रसंग नि सर क्षणभर चपापले का असावेत.. हा प्रश्न कित्येक दिवस डोक्यात राहिला. पुढे तो ही विस्मरणात गेला. आज एकाएकी आठवण आली.. तसे सरांना म्हटले

"सर अजून कीर्तन करता का?"

"नाही रे. वयोमानाप्रमाणे नाही झेपत. समोरचे नीट दिसत नाही. बोललेले नीट ऐकू येत नाही. फक्त ही वाचा खणखणीत राहिलीय तेवढी."

"पण तुम्ही कीर्तनं खूप वर्षे केलीत?"

"अरे या मास्तरला तेवढेच तर एक यायचे.. निवृत्तीबुवा.. आता ते बुवा ही मोडीत निघाले."

"पण तुम्ही असे दूरच्या गावी जाऊन कीर्तन करायचात? आपल्या गावी कधीच नाही?"

"अरे, त्याला कारण आहे.. माझे आडनाव.."

सर कांबळे सर होते.. आमच्या शाळेत कधी त्यांची जात आमच्या लक्षात आली नव्हती. पण ती होतीच म्हणजे.

"अरे त्या देवळातले दामलेगुरूजी होते.. मोठा माणूस. त्यांचा मुलगा आपल्या शाळेतला. आपल्या शाळेत येता यावे म्हणून पोराला घरापासून दूर काकाच्या घरी म्हणजे आपल्या गावात ठेवलेला. मी संस्कृतचा विद्यार्थी. आणि मराठी आणि संस्कृत शिकवायचो. कीर्तनातून लोकांना समजावणे नि होता होईल तेवढे बदल घडवणे.. आमची पिढीच तशी असावी. दामले गुरूजींनी भरीस घातले. आठवड्यात तीनदा कीर्तन .. विषय कोणताही

चालेल.. अगदी जातपात निवारणाचा ही.. फक्त त्याच गावात आयुष्यभर कीर्तन करत राहिलो."

मी सरांची कीर्तने ऐकलेली कित्येक वेळा. गोष्ट कुठलीही असो.. सर त्यांचा शेवट मुलामुलींच्या शिक्षणाशी आणून जोडायचे.. मुलींना शिकवून शहाणे करा.. म्हणजे एक अख्खे कुटुंब शहाणे होईल.. अजून आठवत होते मला.

"अरे, तू म्हणालास म्हणून दामले गुरूजींची आठवण झाली. मोठा माणूस रे. मी कीर्तन करावे म्हणून मागे लागले. मी म्हणालो गुरूजी शेवटी सारे कीर्तनकाराच्या पाया पडतात. माझ्यासारख्या हलक्या जातीच्या माणसाच्या पाया पडतील तर लोक .. त्याची काळजी तुम्हाला नको म्हणाले. पण गाव आहे. गुरूजींना त्याच गावात राहायचे आहे. मी त्यांना गळ घातली. अट म्हण. म्हटले मी निवृत्तीबुवा एवढेच नाव लावेन.. हो नाही करता करता गुरुजी तयार झाले.. पुढे गंमत झाली बरं का.. ऐक म्हणजे कळेल दामले गुरुजी किती मोठे होते ते.."

सर जोशी भटाची गोष्ट सांगायला लागले. जोशी भट आमच्या गावातले. सनातनी आणि कर्मठ. जशी कांबळेसरांच्या कीर्तनाची कुणकुण लागली, त्यांना रंगेहात पकडावे म्हणून पोहोचले एकदा. रंगेहात शब्द त्यांनीच वापरलेला. बुवांचे कीर्तन सुरू झाले. जोशी

अचानक येऊन कडाडले.. "बंद करा हा भ्रष्टाकार. एक नीच जातीचा कुणी देवळातून कीर्तन करतो.. आणि दामले गुरूजी खुशाल धर्म बुडवायला निघालेत. पण हा जोशी भट जिवंत आहे अजून.. बरे रंगेहात पकडले गेलात.."

त्यावर दामले गुरूजी ताडकन उठून उभे राहिले ..

"जोशी भट, धर्म आम्हाला तुमच्या कडून नाही शिकायचा.. हिंमत असेल तर निवृत्तीबुवांच्या सारखे कीर्तन करून दाखवा.. ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण.. बुवांच्या रसाळवाणीतून जशी ईश्वरभक्ती होते तशी तुमच्या ह्या रंगेहात पकडण्याच्या पोलिसी काव्यातून होईल काय .."

मग लोकांकडे वळून म्हणाले,

"लोक हो.. आजवर निवृत्तीबुवांची कीर्तने होत आली आहेत. तुम्ही भक्तिभावाने गर्दी करता आहात अजूनही. बुवा निरूपण करतात तसे करणारा या पंचक्रोशीत कुणी नाही. तरी ज्याला कुणाला उठून जायचे त्यांनी जावे. कीर्तन होणारच. निवृत्ती बुवा कांबळेच ते करणार आणि कुणी श्रोता नसेल तर एकट्या माझ्यासाठी ते करणार .. तुम्ही ठरवायला मोकळे आहात."

श्रोते स्तब्ध झाले. सगळीकडे शांतता झाली. आणि अचानक आवाज आला, "आम्हाला बुवांचेच कीर्तन हवेय.."

सगळयांनी टाळयांचा कडकडाट केला.. जोशीभट तडकाफडकी निघून गेले.

"त्यादिवशी कीर्तन जास्त रंगले बघ. अरे शिवाजी नि त्यांचे मावळे नि आपल्या स्वातंत्र्य लढ्यातले शिलेदार.. कुठकुठली उदाहरणे दिली. म्हटले मनातून काढून फेकून द्या ती जात. माणूस नावाची एकच जात आहे जगात. तिला वेगवेगळया कुंपणांनी बंदिस्त करू नका. लोकं काय एका कीर्तनात बदलतात थोडीच.. पण हळूहळू बदल होतोच."

गावी होतो तसा रोज देवळात सरांना भेटत होतो. सर रोज काहीना काही सांगत होते.

एके दिवशी म्हणाले, "अरे समाज पुरूष हा एखाद्या कडेकपारी सारखा. ओबडधोबड आणि बेलाग कडे असणारा. त्यावरून बदलाचे वारे वाहू लागतील तेव्हा तो घासून गुळगुळीत होईल. पण ही झीज व्हायला काळ जाऊ द्यावा लागेल. दामले गुरूजी पण हेच म्हणायचे.. गेले दोन वर्षांपूर्वी .. आपण समाजबदलात आपला खारीचा वाटा उचलायचा. सारेच काही सेतू बांधणारे श्रीराम नाही होऊ शकत, ना ही महात्मे. पण विचार करा असंख्य लोकांनी विचार बदलले की समाज बदलणारच.."

शाळा हा त्यांच्या अभिमानाचा नि जिव्हाळयाचा विषय.

"मला शाळेचा अभिमान आहे रे. मला नाही वाटत आपले कुणी विद्यार्थी या जातीपातीच्या बंधनात अडकतील.. बघ बाहेर, मुलं शिकताहेत. मुली शिकताहेत. मुलींची लवकर होणारी लग्नं आता अठरा नाहीतर विसाव्या वर्षानंतर होताहेत. अजून समस्या आहेत पण हळूहळू बदल घडतोय रे.. काळाचे काटे उलटे चालवून मागे जाऊ पाहतील काही लोक पण दामले गुरूजींसारखी हिंमत दाखवावीच लागेल आपल्याला.. आमचे दिवस सरले .. तुमच्या पिढीच्या हाती सारे."

एके दिवशी सरांचा वेगळाच सूर लागला. म्हणाले, "तुला काय वाटते रे? धर्म हा आवश्यक आहे? आमच्यापैकी कित्येक जण बौद्ध झाले.. मी नाही. मला धर्मामुळे फरक पडत नसेल तर मी हिंदू असलो काय की बौद्ध .. ज्या देशात बहुसंख्य हिंदू आहेत त्या देशात त्याच धर्मात राहून सुधारणा नकोत करायला? तेव्हाच तर खऱ्या सुधारणा होतील..

अरे बुद्धाचीच शिकवण आहे, मी म्हणतो म्हणून प्रमाण मानू नका.. आपल्या मनाशी तावूनसुलाखून घ्या. म्हणजे मग मला हा

धर्माचा प्रश्न पडलाय.. त्याचे उत्तर नाही मिळाले अजून. बहुतेक या आयुष्यात मिळणारही नाही."

यावर मी काय बोलणार होतो? एकतर ह्या गोष्टीची न मला कधी झळ पोहोचलेली, ना ही त्यावर मी कधी विचार केलेला.

जाण्याच्या आदल्या दिवशी सरांना म्हटले, "उद्यापासून मी नाही सर. परतावे लागेल .."

सरांच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या..

"तुम्ही मुलं म्हणजे आमची संपत्ती .. परत येशील तोवर मी असण्याची शक्यता नाही. पैलतीर खुणावतोय.." सरांना डोळे पुसले. सरांना नमस्कार करून निघालो ..

दोन वर्षांनंतर आज गावी परत आलो. आई म्हणाली "अरे तुझे निवृत्ती कांबळे सर, नुकतेच गेले.. दोन आठवडे झाले असतील .."

मागच्या वेळी डोळे पुसत निरोप घेताना सर म्हणालेले, "अरे, अश्रू हेच एक सत्य आहे.

अश्रू हे देवाने दिलेले वरदान आहे. इतर प्राणी रडत नाहीत कुणी. साने गुरूजींनी अश्रूंचे महत्त्व जाणले.. आम्हाला ही पटले.. माणूस जगात येतो तो रडत.. नि जातो तो इतरांना रडवत .. ह्या दोन रडण्यातला प्रवास म्हणजे जीवन.. रडणे काही चुकलेय का कुणाला?"

सरांच्या घरी गेलो. समोर निवृत्तीबुवांचा कीर्तन करतानाचा फोटो होता. मोठा हार घातलेला.. नि:शब्द नमस्कार केला.. डोळे भरून आले माझे. बरोबर सरांच्या मुलानेही डोळे पुसले.. सर म्हणाले ते खरेच होते..

.. माणूस जाताना पण असा रडवून जातो..

# साहेब

नमस्ते.

मी .. साहेबांची राऊ. साहेब म्हणजे यशवंत कोंडाजी शेलार. म्हणजे यजमान माझे. मी राजलक्ष्मी. साहेबांनी लग्नात नाव नाही बदलले. साहेब म्हणाले, लगीन होऊन आलीस म्हणजे काय लगिनाआधीची तू नावासकट बदलली पाह्यजे की काय? पण साहेबांना ती कुठल्याशा बाजीरावाचीच ना.. राऊ आवडायची. तेव्हा खुशीत आले की मला राऊ म्हणायचे. कानाला फारच गोड वाटायचं ते. आणि साहेब सदा खुशीतच असायचे म्हणा ना.. त्यामुळे सदा मला राऊच हाक मारायचे साहेब.

तर लगीन होऊन या घरला आले मी त्याला लोटली पन्नास वर्षे. त्याकाळी लगिनं लवकर लावून देत. आता बरीच सुधारणा झालीय. पोरं पोरी तावून सुलाखून लगीन लावतात. पोरी शिकतात ही आजकाल. माझं झालं तेव्हा मी शाळेत जात असती तर मॅट्रिकपण झालेली नसती. सांगते काय तर साहेब विशीत न मी तेरा

वर्षांची. लगीन म्हणजे काय हे ही ठाऊक नसायचे वय. साहेब विशीतले. मग त्यांनीच सांभाळून घेतले. पहिली दोन वर्षे तर म्हणाले, 'राऊ, तू आन मी चांगले दोस्त व्हायला पाह्यजे.' मला उमगायचे नाही तेव्हा, पण दोस्ती ती ही नवरा बायकोत? पण साहेबांच्या डोक्यातली कल्पना होती ती. मी जेमतेम चौथी शिकलेली. साहेबांनी बळजबरीनं हिंदी शिकवली, इंग्रजी पण शिकवली. थोडी थोडी शिकले मी. अगदी रीतसर शाळेची पुस्तकं घेऊन साहेबांनी तीन वर्षात नववीपर्यंत अभ्यास घेतला. दहावीला बाहेरून बसले असते पण घरात तेव्हा सासरे म्हणजे कोंडाजींचा मृत्यू झाला.

.. आणि रातोरात साहेब मोठे झाले.

मोठेपणासोबत जबाबदारी आली. साहेब कित्येक वर्षे त्या ओझ्याखाली दबून गेले. शिकवतात कसले मला, स्वतःच दुनियादारी शिकायला लागले. साहेब दुनियादारी शिकले खरे, पण स्वतः मात्र कोरडे पाषाणच राहिले. कारण स्वार्थाच्या दुनियेत स्वार्थी नि वेड्यावाकड्या वाटेवर चालणाऱ्या लोकांच्या गराड्यात राहूनही स्वतः मात्र सरळसोटच चालत राहिले ..

काय काय सांगू. तशी लिहायची सवय नाही मला. पण साहेबांबद्दल बोलू तर काय काय बोलू असे होऊन जाते मला. मग त्यात क्रम वरखाली झाला तरी चालेल. थोडी भाषेची भूलचूक पण चालेल.. पण त्यामागची भावना सच्ची आहे. आणि साहेबांबद्दल लिहायचे तर भावना सच्च्याच हव्यात.. कारण साहेबच मुळापासून तसे होते आणि आहेत.

दुनिया पाहिली साहेबांनी खूप. बघितले सारे. समजले पण खूप काही. शिकले मात्र थोडंफारच. स्वार्थाच्या बाजारात रडणारी पामरे म्हणून सगळा विषय टाळत साहेब. झाली काही वर्षे, पण अगदी काहीच वर्षांपूर्वी झाल्यासारखे लख्ख आठवते ते वाटणी झाली तेव्हाचे घर. सासरे म्हणजे कोंडाजी गेले. यशवंत शेलार म्हणजे साहेब घराचे मुख्य झाले. इच्छा असो की नसो.. घरातले मोठे म्हणून सगळी जबाबदारी आली. पाठोपाठ दोन भाऊ नि एक बहीण. भावांचे शिक्षण नि भावाबहिणींची लग्नं. साहेब स्वत:चे शिक्षण सोडून नोकरीत लागले. त्या पण एका वेळी दोन दोन. सकाळी एक, संध्याकाळी दुसरी. रात्री फक्त यायचे घरी झोपायला.. अशी दहापंधरा वर्षे काढली साहेबांनी. दोघे भाऊ अभ्यासात हुशार होते. शिकत शिकत पुढे गेले. साहेब आपल्या दोन नोकऱ्यांच्या

दोन डगरींवर पाय ठेऊन तोल सांभाळत होते. भाऊ दोघे मोठे झाले.. बहिण लगीन होऊन तिच्या घरी गेली. साहेबांना यातच मोठी खुशी होती. पण उमेदीच्या दहा पंधरा वर्षात साहेब पार थकून गेले. हे मी सांगते, ते कधी म्हणाले नसतील तसे. आपले कर्तव्य पार पाडणे एवढे एकच डोळ्यांपुढे ठेवत 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' म्हणत साहेब काम करत राहिले .. 'अपेक्षा न ठेवणे हा सुखी आयुष्याचा पाया आहे' सांगत सर्वांसाठी झटत राहिले. भाऊ दोघे त्यांना पायाचा दगड मानत वर चढत गेले.

घराची वाटणी झाली तेव्हा कळस झाला सर्वात. चार भावंडं. तेव्हा चार जणांत वाटा आला.. ही भांडाभांड झाली. साहेब निमूटपणे बघत होते. सख्खे भाऊ नि बहिण आपल्या गेलेल्या आईबापाच्या संपत्ती वाटपातील जास्त वाटा मिळावा म्हणून जोरजोरात भांडत होते.. शेवटी लागला सोक्षमोक्ष. वाटण्या तर झाल्या चौघांत. बहिणीला एक हिस्सा द्यावा लागला कायद्याने. त्या कायद्याला बाकी दोघा भावांकडून दोनचार शिव्या हासडल्या गेल्या. साहेबांची बहिणही फार आपल्या हक्काबद्दल जागृत. बाकी कुठे स्त्री मुक्ती होवो की न होवो, याबाबतीत मात्र स्त्री मुक्ती झालीय समाजात, सर्व हक्कांची जाणीव झालीय मुलींना. कर्तव्याची व्हायची तेव्हा होवो.. साहेब निमूटपणे साक्षीदार होते सगळ्यात. शेवटी वाटण्या झाल्याच. मग जे साहेबांना वाटणीत मिळाले ते

साहेबांनी पुन्हा बाकी तिघांना वाटून टाकले.. म्हणाले, 'आजवर आयुष्यात केले तेच आताही. तरूणपणीच सर्व या तिघांसाठी केले, आता ही तेच करेन.'

तिघांनी विना संकोच आपल्या वडिलधाऱ्या भावाचा मान राखत सगळे स्वीकारले. साहेब आपले आपल्या हिमतीवर कमावलेल्या गोष्टी सांभाळत राहिले.. कुठे गेले ते भावाबहिणींचे प्रेम याचा हिशेब लावत.

साहेबांना ही भाऊबंदकी कधी उमगायची नाही. लहानपणी एक तीळ वाटून खाणारे मोठे झाले की आपापल्या पोळीवर तूप कसे ओढायला लागतात .. मोठे झाले की? यालाच मोठे होणे म्हणावे? जिवापाड जपलेले बहिणभावांचे नाते.. ती आपल्या ताटातली भाकर उपाशी भावाला द्यायची.. स्वतः अर्धपोटी राहून. तेव्हा तर घरात सगळ्याच गोष्टींची कमतरता होती.. नंतर सुबत्ता म्हणावी तसे नाही तरी बरे दिवस आले.. आणि त्यानंतर तीच आपला भाकरीचा तुकडा देणारी बहिण भावांशी भांडतेय निर्जीव जमिनीच्या तुकड्यासाठी? निरागस लहानपण जाऊन असले स्वार्थी अप्पलपोटे मोठेपण कधी आले सर्वांत? भावासाठी जीव टाकणारे एकाएकी जीव घेणारे कसे झाले? चार रुपये.. चार दागिने

नि चार पावलं जमिनीच्या तुकड्यापायी? माणसं मोठी झाली की मनं छोटी होतात की काय? वाटण्या झाल्या तर साहेब कित्येक दिवस उद्विग्न होते.. वाटणी झाली नि साहेबांनी आपला वाटाही वाटून टाकलेला उरलेल्या तिघांत.. शेवटी म्हणाले, "सारे तुझ्यामुळे.. राजलक्ष्मी. नाहीतर दोन्ही वहिन्या नि भावजी कसे हिरीरीने उतरलेले मैदानात. तू होतीस अशी म्हणून माझ्या पाठीशी."

मला त्यात विशेष वाटत नव्हतेच. मीच भांडू लागले तर माझे साहेब अशा भांडणानंतर कसे काय ठीक राहू शकतील? आणि मला त्यांनी काय कमी पडू दिले की अजून चार डाग अंगावर चढावेत म्हणून हट्ट धरू? तेही बापकमाईचे? साहेबांनी सारे वाटून टाकले .. बाकीच्यांनी ते एकमेकांच्या तोंडाकडे न बघता घेऊन टाकले ..

त्यातच साहेब मला म्हणाले होते, "राजलक्ष्मी, तुझ्या घरी असला प्रसंग येऊ नये, पण आलाच तर आधीच तुला वाटा नको म्हणून सांगून टाक. त्या भांडणांचा मनावर जो परिणाम होईल ना त्यापेक्षा आधीच अंग काढून घे. देवदयेने आपल्याला दोनवेळचे जेवण आहे.. कपडालत्ता आहे, डोक्यावर छप्पर आहे.. आयुष्यात काय हवे? तर मनाची शांती.. तिच्यासाठी उगाच अशांती निर्माण

करून मग मन:शांतीसाठी बुवा नि स्वामींच्या नादी लागा..? कुणी सांगितलेय?"

हे शेवटचे त्यांच्या छोट्या भावाबद्दल होते.. कुठल्याशा स्वामींचा गंडा बांधून बसलाय तो.. वाटणीतील मोठा हिस्सा तर मिळवला त्याने.. नि नंतर जवळच्या एका स्वामींच्या नादी लागला.. दिवसेंदिवस झोप येत नाही म्हणून.

वाटणीनंतर साहेब परत आपल्या कामाला लागले .. म्हटले ना मी साहेब सारे शिकले पण दुनियादारी? ती नाही शिकता आली. वर व्यवहार ज्ञान नाही म्हणून पाठीमागून शेरे ऐकायला आले ते आलेच.

"राऊ, स्वतःच्या स्वच्छ मनाइतके मूल्यवान जगात काहीच नसते. सात तास शांत झोप हीच आयुष्यातली खरी कमाई माझी .."

हे खोटे नव्हते. एखाद्या लहान मुलासारखी असावी अशी साहेबांची झोप शांत होती.

देवदयेने सगळे आहे म्हणाले साहेब, पण साहेब देवदेव करणाऱ्यातले नव्हते. पूजाअर्चा करावी.. देवभक्ती करावी नि

दुसऱ्याशी माणसासारखे न वागता वागावे.. कसे? तर आपला स्वार्थ साधेल असेच? अगदी दररोज देवपूजेला न चुकणारा माणूस सकाळी पूजा आटोपली की दिवसभर कसाही वागायला मोकळा कसा होतो? आणि इतक्या देवभक्त समाजात इतकी विषमता कशी काय?

उच्चनीच, जातपात नि स्वार्थाचा कळस होईलसे वागणे.. यांचा नि देवभक्ती नि पूजाअर्चेचा ताळमेळ कसा घालावा? साधे माणसाला माणूस समजण्याइतके पण शहाणपण या देव देव करण्यातून येत नसेल तर काय कामाचे हे सारे?

प्रवचने नि मोठमोठे आध्यात्मिक कार्यक्रम यांची त्यांना नावड. वाटणीनंतर ही मोठया तोंडाने छोटे बंधू आलेले, त्यांच्या स्वामी चरणी लीन व्हा सांगायला. साहेब म्हणाले ते एवढेच, "बाबा रे ते अध्यात्म मला समजत नाही, उमजत नाही .."

खरेतर मला ठाऊक होते, त्यांच्या ते पचनी पडत नाही. सर्वांना समान वागा, माणुसकी दाखवा, उगाच भेदभाव करू नका नि लोकांवर अन्याय करू नका .. सत्यवचनी व्हा नि प्रामाणिकपणा जपा.. अशा काही गोष्टी पाळल्या की कशाला हवे पुढे जपतप नि व्रतवैकल्ये.. न पाहिलेल्या देवापुढे नतमस्तक व्हा नि समोरच्या जित्याजागत्यांना हिणवीत स्वार्थ साधा.. ही कोणती,

आध्यात्मिकता.. एक होते पण.. मला त्यांनी कधी पूजाअर्चा करण्यापासून थांबवले नाही .. पण कधी स्वतः त्यात सहभागी पण झाले नाहीत.

साहेबांना बातम्या वाचायची हौस भारी. रोजचा पेपर अथ पासून इति पर्यंत वाचून काढणार साहेब. मग त्यावर आपली मतं बनवणार. राजकारण आणि राजकारणी आणि त्यांचा दुटप्पी व्यवहार यांची चीड असायची त्यात. राजकारणी किती हुशारीने प्रत्येकाच्या देवधर्मात शिरून लोकांचे विचार बदलवू शकतात याचे मात्र आश्चर्य वाटे त्यांना. त्यावेळी 'शब्द बापुडे केवळ वारा' नसून शब्दांच्या ताकदीवरच सगळे राज्य चालते असे साहेब सांगायचे. मी तशी यापासून दूर. थोडीफार पूजाअर्चा करायची मी, पण सारी व्रतवैकल्ये साहेबांच्या सांगण्यावरून एकेक करून सोडली मी. मोठमोठया स्वामींची प्रवचने ऐकायला आमच्या शेजारच्या कारेकर बाई जात. आल्यावर काहीतरी आत्मा नि उन्नतीबद्दल सांगत.. बाईपण बोलायच्या प्रासादिक हे खरे.. तर त्या बोलायच्या तेव्हा साहेबांची आठवण यायची.. साहेब सांगायचे, 'राऊ, हे आध्यात्म वगैरे असेलही ग्रेट काही पण खरेतर काही खरे नाही बघ. उगाच न पाहिलेल्या आत्म्यामागे लागून समोर

दिसणाऱ्या जित्याजागत्या माणसाशी वाईट वागणे.. ही कुठली आध्यात्मिकता?'

कारेकर बाई प्रवचनाबद्दल सांगून झाले की हटकून आजूबाजूच्या सांगोवांगी गोष्टी सांगत एखाद्याची निंदानालस्ती करीत. जमले तर नुसत्याच चुगल्या करणे वगैरे. आणि कित्येकदा त्यातला मजकूरही कल्पनाशक्ती ताणून बनवत. म्हणजे तिखटमीठ लावून. अशावेळी साहेब आठवत मला. बाई पडल्या शेजारीण. त्यांना टाळणे शक्य नव्हतेच. पण त्यांच्या घरी येणाऱ्या दूध नि कामवाल्यांशी बाई अतिच उद्धटपणे वागत.. वर आपल्याहून खालच्या लोकांशी असेच वागले पाहिजे असे मोठ्या आढ्यतेने सांगत.

त्यांच्या स्वामींनी बहुतेक याबद्दल काही प्रवचनात सांगितले नसणार. सदा आत्म्याबद्दल बोलणारे परमात्म्याच्या इतर जित्याजागत्या अवतारांशी कसे वागावे हे शिकवत नसणारच.

तर साहेब असे होते.. आत एक बाहेर एक असला व्यवहार कधी त्यांनी नाही केला. अगदी तात्पुरता तोटा सहन करूनही. धंद्यातही कधी प्रामाणिकपणा न सोडणारे साहेब. धंदा म्हणजे ..

खूप वर्षे साहेब नोकरी करत होते. आधी तर धावाधाव करून दोन नोकऱ्या एकावेळी, त्याच वेळी टायपिंग करायचे ते रात्री बसून. घर चालवायचे एकट्याने तर मिळकतीसाठी काहीतरी करावे लागेच. पुढे साहेब नोकरीला कंटाळले. त्यांनी धंदा सुरू करायचे मनावर घेतले. टाकले झेराॅक्सचे दुकान. कॉलेजच्या जवळ छोटी जागा घेतली. धंदा उत्तम सुरू झाला. इतक्या वर्षांच्या पायाच्या भिंगरीला आराम मिळाला. साहेब थोडे तरी स्वस्थ बसायला लागले. अगदी काही वर्षां आधीपर्यंत साहेब दुकानात जायचे, स्वतः मशीन चालवायचे. कॉलेजातल्या पोरांना चार समजुतीच्या गोष्टी सांगायचे. दुकानात रमलेल्या साहेबांना बघितले की बरे वाटायचे एकदम.

साहेबांकडून मी काय काय शिकले नसेन? साहेब न आवडणाऱ्या माणसाला मनातही ठेवायचे नाहीत. म्हणायचे, 'एवढ्या अनंत जगात इतकी माणसं आहेत.. त्यातली सर्वच आवडतील? न आवडणारी आपल्यासाठी नाहीतच जगात. राऊ, त्यांच्याबद्दल वाईट विचार म्हणजे आपल्यास हृदयावर भार.. मी स्वार्थी आहे या बाबतीत .. ती माणसे या जगात नाहीतच समज..

म्हणजे एकदम सारे सोपे होते की नाही बघ! नाहीतर निम्मा वेळ त्यांच्याबद्दल विचार करण्यात घालवायचा!'

खरेच होते ते. रात्रीची शांत झोप हा एकमेव आनंदी असण्याचा मापदंड ठरवणाऱ्या साहेबांना याहून वेगळे काही वाटायची शक्यता नव्हती नाहीतरी.

मी साहेबांबद्दल सांगतेय .. खरेतर कोणी नवऱ्याला साहेब म्हणतात का? मी परकरी पोर होते. साडी नेसायला शिकले लगिन ठरले तेव्हा. सासरला आले तेव्हा अगदी अनाडी होते मी. साहेब तेव्हा वीस वर्षांचे. लग्नातला कोट अंगावर मिरवण्याची भारी हौस होती त्यांना. मला ते गंमतीचे वाटे. तेरा चौदा वर्षांच्या अवखळ मुलीला नवरा म्हणजे कोण इतके थोडी समजायला. पण साहेब तेव्हा अगदी मित्र असल्यासारखे होते. मी मोठी होईतोवर आम्ही नुसत्या गप्पा मारत बसत असू आणि साहेब मध्ये मध्ये शिकवणी घेत बसायचे. त्या कोटावरून मी म्हणालेली त्यांना, "दिसता अगदी साहेबासारखे. मी साहेब म्हणू तुम्हाला?"

त्यानंतर तेच नाव तोंडात बसले. साहेब..

कित्येक वर्षे लोटली. आयुष्यात कित्येक चढ उतार आले. आमची पहिली दोन्ही पोरं जगली नाहीत. मी मोडून पडणार ती साहेबांमुळे सावरले. पाठोपाठ सुमी आली. मुलगा नाही म्हणून बाकी समाजात माझ्या वाटेला त्यामुळे दोषच आला असता. पण साहेब खंबीर होते. साहेब वागणुकीतही एखाद्या साहेबासारखे होते, अधिकार असणारे पण गाजवणारे नव्हेत. त्यांनी कुणाला भीक घातली नाही. सुमीच्या मागे मुलगा व्हावा म्हणून मागे लागलेल्या सगळयांकडे दुर्लक्ष करत साहेब माझ्या मागे उभे राहिले. आज सुमी तिच्या सासरी सुखात आहे. साहेबांनी मागे लागून तिला शिकायला लावले.. अगदी तिचे बाकीचे काका 'मुलीच्या जातीला कशाला शिक्षण' म्हणत असताना ही साहेब ठामपणे सुमीमागे लागले. तीच सुमी आता शाळेत शिक्षिका आहे. साहेब असे कणखर होते म्हणून त्या सगळया गोष्टींची झळ लागली नाही कुणाला. त्यांच्या छायेखाली पन्नास वर्ष उलटली. साहेब आता थकलेत. दुकान चालवायला दिलेय. त्याच्या भाड्यावर घर चालतेय. आता इन मीन दोघेच आम्ही. एकमेकांना इतके समजून चुकलोय की बोलायची पण गरज वाटत नाही एकमेकांशी.. न बोलताच समजते सारे.. कालच लग्नाचा पन्नासावा वाढदिवस झाला.

"राऊ, तू होतीस म्हणून निभावले.. नाहीतर माझे कसे झाले असते.."

साहेब भावनाविवश होऊन म्हणाले खरे, पण माझ्या सारख्या अल्लड मुलीला प्रसंगी वडलांसारखे जपणाऱ्या नि तशी काळजी घेणाऱ्या साहेबांचेच श्रेय सारे.

हे सारे मी लिहिलेय ते काही साहेब कुणी मोठे नेते वा साधुपुरूष होते म्हणून नाही. खरेतर असे लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतात. पण मोठे सामाजिक काम न करताही कुटुंब हा घटक उत्तम सांभाळणाऱ्यांचे महत्त्व कमी नाही कारण असेच लोक समाजाचे सामूहिक चारित्र्य घडवण्याला हातभार लावत असतात. म्हणजे समाज घडवण्यात त्यांचा खारीचा वाटा असतोच. मग त्यासाठी त्यांनी घरदार सोडून भाषणं वा प्रवचन देत हिंडलं पाहिजे असं थोडीच आहे. आपले काम नि नियत कर्तव्य निष्ठेने नि प्रामाणिकपणे पार पाडणे हे ही मोठया माणसाचेच लक्षण नव्हे का? आपापल्या परीने असे मोठे लोकच समाजाला पुढे नेत असतात. त्यामुळे साहेब कुणी साधुपुरूष नसले तरी मला मोठेच वाटतात.

हे सारे लिहून ठेवायला निमित्त म्हणजे आमच्या लग्नाचा वाढदिवस. नुकताच झाला. लग्नाच्या पन्नासाव्या वाढदिवसाला सुचले म्हणून लिहिले. म्हटले जे वाटते ते कुठेतरी जमेल तसे नोंदवून ठेवावे. वेडेवाकडे लिहिले पण मनापासून वाटते तेच लिहिलेय.

आणि जाता जाता वाटते ते एक..

.. एक खरे..

साहेबांनी तेव्हा लिहायला वाचायला शिकवले नसते तर? तेव्हा अभ्यासाचा कंटाळा यायचा. पण साहेब कधी ओरडून तर कधी गोडीगुलाबीने अभ्यास करवूनच घ्यायचे.. तशी मला अक्षर ओळख होती तेव्हा पण ती जुजबी. साहेबांनी शिकवले म्हणून बरे.. नाही तर आज हे इतके सारे लिहूच नसते शकले की नाही?

# रूपमती !

खूप दिवसांनी मुंबईत येणे झाले. मूळचा मुंबईकर मुंबईबाहेर जाणे तसे विरळाच पण मला मुंबईचे आकर्षण नव्हतेच कधी. धावत्या मुंबईपेक्षा रेंगाळणारे दिवस पाहणारी गावे माझ्या स्वभावात बसतात हे खरे. म्हणून अगदी मेडिकल प्रॅक्टिससाठी ही मुंबईबाहेर जावे लागले याचा आनंदच होता मला. आज फिरता फिरता जहांगीर आर्ट गॅलरी बाहेर अवंती भेटली. तशीच. म्हणजे इतक्या वर्षांचा तिच्यावर परिणाम काहीच नसावा? ती भेटली नि खूप वर्षांपूर्वीच्या कॉलेजच्या दिवसांची आठवण झाली. तिचा नवरा कोण असावा याची उत्सुकता होतीच .. आणि आता ती काय करते याचीही होती..

आम्ही दोघे दोन धृवांवरचे. म्हणजे एकाच कॉलेजात एकाच वर्गात असलो तरी क्लासेस आणि मासेस मध्ये असतो तसा आमच्यात फरक होता. ती क्लासेस मधली तर मी जनसामान्य .. ती राजहंस तर मी एखादा इकडेतिकडे उडणारा साधा पक्षी .. ती

राजकन्या तर मी राज्यातला एखादा मामुली शिपाईगडी. अर्थात हे फरक होते आमच्यात.. तिचे वडील आमच्याच हाॅस्पिटलात मोठे बाॅस.. हेड ऑफ द डिपार्टमेंट. तर माझ्या घरचे.. गिरणी कामगाराच्या घराची तुलना एका प्रथितयश डॉक्टरशी कशी होऊ शकेल?

पण तो फरक तितक्यातच मर्यादित नव्हता .. ती खरीखुरी राजकन्या होती. आरस्पानी म्हणावे असे सौंदर्य लाभलेली. नाजूक आणि तितकीच ऐटबाज. कित्येकदा मला वाटायचे की लहानपणापासून ती असे कौतुक ऐकत आली असणार नि त्यामुळे तिला आपल्या सौंदर्याची जाणीव असणारच .. या उलट मी.. एका पायाने अधू.. लंगडत चालणारा लहानपणच्या आजाराने. वर चेहरा कुठल्याही अंगाने हँडसम म्हणावे अशा वर्गातला नाही. तिला लहानपणी तिच्या सुंदरतेची जाणीव करून देत असतील .. तसे मला माझ्या कुरूपतेची.. खरी गोष्ट मात्र मला ठाऊक होती. माझ्या मर्यादा ठाऊक असल्या तरी माझा अंगभूत आत्मविश्वास मात्र उदंड होता. त्या जोरावर मेडिकल कॉलेजात पोहोचलो नि तगूनही राहिलो होतो मी. सगळ्या बॅचमध्ये तिचा बोलबाला होता अगदी पहिल्या वर्षीच्या पहिल्या महिन्यापासून. अठरा वर्षाची तरणी पोरं तिच्या दिसण्याने घायाळ न झाली तर नवल. त्यात मला माझ्या पोझिशनचा हेवा वाटायचा. ज्याला गमावण्यासारखे काही नसेल

तो माणूस सर्वात सुखी.. आणि कदाचित दैव अशांच्या तागडीत जास्तीचे काही टाकत असावे .. माझे तसेच झाले.. बाकी सारे तिच्या आगेमागे घुमत असताना त्यांना सोडून तिची माझ्याशी मैत्री जुळली.. मी विशेष काही प्रयत्न करता. तिला तशा मैत्रीणी होत्या .. पण ती हटकून माझ्याबरोबर कँटिनला येत असे.. बहुतेक वेळी लायब्ररीत आम्ही एकत्र अभ्यास करत बसत असू.. त्या अर्थाने आमची जोडी नव्हती पण आम्ही चांगले मित्र होतो हे खरे.

कॉलेजात बाकी पोरं होती.. हुशार नि बाकी कशा कशात तरबेज.. अगदी खेळापासून ॲक्टिंग नि ऑर्केस्ट्रात गाणे वगैरे पर्यंत. असल्या शायनिंग पोरांची कमतरता नव्हती. नि तिच्या आगेमागे फिरणाऱ्या भुंग्यांचीही नव्हती. त्या सगळयांत ऑड मॅन आऊट म्हणजे मी.. तरीही बाकी सगळयांना सोडून तिची माझी मैत्री होती. बाकीच्यांशी ती थोडी हातचे राखून वागत असली तरी माझ्याशी ती मनमोकळेपणाने बोलत असे. आणि असे असले तरी आमची त्या अर्थाने जोडी जमणे अशक्य हेच सर्वांनी.. अगदी माझ्यासकट सर्वांनी.. गृहित धरले तर त्यात आश्चर्य नव्हते. तरीही तिच्याशी बोलताना बरे वाटायचे हे खरे..

तिला आपल्या सुंदरतेची जाणीव होती हे तर खरेच. कॉलेजात ती एकीकडून चालली की पोरांच्या नजरा तिच्यावर खिळून राहात आणि तेही तिला ठाऊक होतेच. तरीही तिचे वागणे मात्र गर्विष्ठ मुलीसारखे नव्हते. सर्वांना सुरक्षित अंतरावर ठेवण्यासाठी कधी फटकून वागायची असेच वाटे मला. त्यात कोणत्याही बाजूने विचार केला तर मी तिला मित्र म्हणून सुरक्षित वाटत असलो पाहिजे .. हा माझा एक नुसता तर्क होता..

काही असो, कॉलेजची काही वर्षे तिची न माझी निखळ मैत्री होती. कित्येक कठीण टॉपिक्स आम्ही एकत्र बसून करीत असू. वा ॅर्डात केस प्रेझेंटेशन पण आम्ही एकमेकांना करीत असू. या सर्वात तारूण्यसुलभ बाकी बडबड स्वाभाविक होती, त्यातून मला तिची पर्सनॅलिटी थोडीथोडी उलगडत जाई..

ती तशीच होती.. सुंदरतेचे वरदान मिळालेली. पण जणू त्याच वरदानामुळे कैद झाल्यासारखी. हे असे तिला वाटू शकते हे मला कळले तेव्हा मला धक्का बसल्याशिवाय राहिला नव्हता ..

आमचे फायनल वर्ष होते. दिवस पावसाळ्याचे. धो धो पावसाने सारे ठप्प पडलेले. मी कसाबसा पोहोचलेलो कॉलेजात.

ती जवळच राहायची त्यामुळे आलेली.. क्लासेस नव्हतेच.. कॉरिडॉरमध्ये गप्पांमधून त्यादिवशी तिचे वेगळेच दर्शन झाले..

"आज मूड नाही यार.. नो स्टडीज .. गप्पा मारूयात .."

"चालेल.. हवा अशी आहे.."

तिच्या तोंडून आज अभ्यास नको ऐकणे म्हणजे कमाल होती. आधीच मेडिकलचा अभ्यास अमर्याद .. त्यात ती हुशार .. सतत अभ्यासाचा विचार करणारी ती..

"तू पोहोचलास बरा.. सगळीकडे पाणीच पाणी.."

"पोहोचलो.. पण गेला मोहन कुणीकडे म्हणायला कुणी नाही .."

"शोधू तुझ्यासाठी?"

"तू? माझ्यासाठी?"

"अर्थात .. नाहीतर व्हाॅट आर फ्रेंड्स फाॅर..?"

"माझं सोड.. तुझ्याबद्दल सांग.."

"माझ्याबद्दल सांगण्यासारखं आहे तरी काय?"

"म्हणजे काय? तू एक इशारा केलास तर अशी इच्छुकांची रांग लागेल.. अगदी ॲप्लिकेशनांचा पाऊस पडेल.."

"कां"

"कां काय? ॲज इफ यू डोन्ट नो.. तुला ठाऊक आहे निम्मा क्लास तुझ्यामागे पागल आहे.."

"तेच.. तेच नकोय मला .."

"म्हणजे?"

"सोड तो विषय .. पण तुला मी एकदा सांगेन व्हाॅट आय मीन अँड व्हाॅट आय वाँट.. आज नको.."

"ओके मादाम अवंती.."

त्यादिवशी तर ती काहीतरी सांगता सांगता राहिली.. पण पुढे काही दिवसांतच ती वेळ आली. आमची इमर्जन्सी होती. वाॅर्ड रिकामा.. म्हणजे नवीन ॲडमिशन्स नव्हत्या. बाकी पोरं घरी निघून गेली. बाॅसची मुलगी ती.. अशी कशी इमर्जन्सी सोडून घरी जाईल .. ती राहिली .. म्हणाली, "इफ यू डोन्ट माइंड.. तू जाऊ नकोस .."

त्या रात्री वाॅर्डच्या साइड रूममध्ये ती मनमोकळेपणाने बोलली. खरेतर कोणाला तरी तिला ते सांगायचे असावे.. आणि माझ्यासारखा पेशंट लिसनर दुसरा नसावा कुणी..

"त्यादिवशी तुला म्हणाले ना.. त्याबद्दल आज सांगते तुला .."

"बोल.."

"यू आर माय बेस्ट फ्रेंड.. खरं सांगू ना तर मित्र म्हणून तू आवडतोस मला .. पण त्या अर्थाने नाही .."

"अगं, ती माझी अपेक्षाही नाही .. तू कुठे न मी कुठे .. आपल्यात जमीन अस्मानाचा फरक.."

"चुकतोयस तू.. ते कारण नाही. एखादा असतो ना की ज्याला पाहिल्या पाहिल्या वाटते.. हाच तो.. तसं तुझ्याबद्दल नाही कधी वाटलं.. पण वुई आर स्टिल बेस्ट फ्रेंड्स .. आय विल चेरिश धिस फ्रेंडशिप थ्रूआऊट लाइफ.. पण मला तू आवडतोस त्याला कारण आहे.."

"काय?"

"आय थिंक यू आर बियाँड द कन्व्हेनशल थिंकिंग.. आपल्याकडे कुणी गोरी मुलगी दिसली की ती सुंदर .. मग नाकीडोळी नीटस असेल तर बघायलाच नको.. पण यातले दिसणे.. आपल्या हाती असते का रे? म्हणजे आपण एखाद्याला दिसण्यावरून जोखणार खरे.. पण त्यात त्याचे कर्तृत्व ते काय?

म्हणून मला माझ्यामागे पागल झालेली पोरं नाही आवडत.. जे मला ओळखत ही नाहीत.. त्यांना माझी स्वप्नं पडावीत.. का? जस्ट बिकॉझ ऑफ माय स्कीन कलर? माझ्या गुणांसाठी नको मी.. फक्त दिसण्यासाठी? जस्ट बिकॉझ आयॅम फेअर? इजन्ट इट अनफेअर?"

"हुं.."

मी अजून काय बोलणार होतो. कुरूपतेकडे झुकणारा मी आणि एक सौंदर्यवती माझी साक्ष काढत होती..

"तुला सांगू .. आय शुड हॅव बीन ॲन ऑर्डिनरी गर्ल.. म्हणजे चारचौघीं इतकी सुंदर किंवा साधी.. आणि लाइफ इज स्टिल मोअर अनफेअर.. मी एका मोठया डॉक्टरची मुलगी.. तुला सांगू .. आजवर मी कुठेही टॉपला आले ना की ऐकायला काय मिळणार .. अरे डॉक्टर प्रधान्स डॉटर.. ती हुशारच असणार .. आणि मी इतका अभ्यास का करते माहितीय.. अरे आयॅम द लिस्ट इंटरेस्टेड इन मेडिसीन.. आई आणि वडिल डॉक्टर असताना मी पण डॉक्टर बनायलाच हवे.. तेवढी त्यांची अपेक्षा पूर्ण करणार मी.. पण चांगले मार्क्स मिळाले तर पार्श्यालिटीचा आरोप होऊ नये म्हणून मी इतका अभ्यास करत राहते. कुणी बोट दाखवून नको म्हणायला.. प्रधान सरांनी पोरीला कसा हात दिला बघा.. पण या सगळयात मला

स्वतःला काय हवे ना तेच मागे पडलेय.. आय हॅव टोल्ड माय पेरेंट्स.. डॉक्टर डिग्री मिळवेन.. अगदी टॉप रँकर म्हणून .. पण द डे आय डू धिस .. मी मोकळी.. पिंजऱ्यातून सुटणार मी.. मला खरेतर चित्रकलेची आवड. माझी ॲनाटॉमी जर्नल्स पाहिली असशील तू.. ज्या दिवशी मी डॉक्टरकी पास होईन त्यादिवशी कॉलेज सोडून मी आर्टच्या मागे जाणार.."

अवंती अंग मोडून अभ्यास करणारी .. तिच्या डोक्यात असे विचार असावेत?

"आर्ट की कोणी आर्टिस्ट? मग काय.. कॉलेज सुटले की लगेच वाजवा रे वाजवा? बोहल्यावर चढणार लगेच.. मला बोलाव न विसरता .. खूप दिवसांत लग्नातले जेवण नाही खाल्ले.."

"काहीपण तुझे.. तुला ठाऊक आहे मी कधीच लव्हमॅरेज करणार नाही .."

"म्हणजे अगदी बघून .. अरेंज्ड .."

"नो.. न बघता .. अरेंज्ड.."

"डोळे मिटून?"

"त्या अर्थाने नाही .. पण एका अर्थाने डोळे मिटूनच.."

"म्हणजे?"

"अरे, मुलगा बघणे नि मुलगी बघणे.. आय डोन्ट ॲप्रूव्ह .. माझी कंडीशन असणार .. मुलगा आणि मुलगी भेटणार.. बोलणार पण एकमेकांना न बघता .. समोर कोण कसा दिसतो किंवा दिसते यावरून अंदाज का बांधावा? जज इट आफ्टर टॉकिंग टू इच अदर.. एकमेकांना समजून घ्या.. मग ते जमले की आहेच.. बघण्याचा कार्यक्रम! माझ्यापुरते तरी सांगते.. आय डोन्ट वॉँट एनी बडी टू मॅरी मी जस्ट बिकॉझ ऑफ माय ब्यूटी .. वोन्ट दॅट बी अनफेअर टू माय ॲक्च्युअल बिईंग?"

त्यारात्री अवंती बोलत होती. मी ऐकत होतो शांतपणे.. तिच्या सुंदर चेहऱ्यामागे कितीतरी व्यथा दडलेल्या होत्या .. सुंदर असणे हे वरदान असे वाटते सगळ्यांना.. तिला तो पिंजरा वाटत असावा? किंवा तिच्या अस्तित्वाला घातलेले कुंपण? जे काही असो.. ती मनापासून बोलत होती हे खरं. या वयात नसलेले सौंदर्य नकलीपणे दाखवणाऱ्या पोरींपेक्षा अवंती वेगळी होती.. मनाच्या सुंदरतेला मानणारी .. कदाचित आजवर तिच्याहून तिच्या रूपाचेच कौतुक झाल्यामुळे असे झाले असेल?

जहांगीर आर्ट गॅलरी समोर अवंती अचानक भेटली. एका क्षणात ते पूर्वीचे सारे डोळ्यांसमोरून तरळून गेले. अवंती कॉलेज सोडून गेली ती गेलीच. तिने म्हटल्याप्रमाणे ती टॉप रँकमध्ये होतीच. पण पुढे पी जी वगैरे न करता ती निघून गेली.. तिच्या रस्त्याने गेली असावी. आर्ट गॅलरी बाहेर ती? अचानक मला तिची कलेची आवड आठवली..

"तुझं पेंटिंग प्रदर्शन तर नाही इथे?"

"अर्थात आहे.. म्हणून तर मी इथे आहे.."

मग ती मला आत घेऊन गेली. तिच्या हातात कला होतीच. एखाद्या पेंटिंग प्रदर्शनात जाण्याचा माझा पहिलाच प्रसंग .. लोक एकेका चित्रापुढे उभे राहून पाहात होते निरखून.. मला मुळात चित्रकलेतले काही गम्य नाही .. चित्र छान आहे की बरे इतके मला कळते इतकेच.. पण अवंतीला बरे वाटावे म्हणून मी काही चित्रे निरखूनही पाहिली .. छान आहेत वगैरे म्हणालोही काहींना. त्याच्यावरचे किंमतीचे आकडे मात्र माझ्या खिशाला परवडणारं नव्हते .. फक्त एकच माझ्या नजरेतून सुटले नव्हते, ते म्हणजे सर्व चित्रामागे थीम नजर किंवा डोळे ही होती.. कदाचित दृष्टिकोन हाच विषय असावा ..

इतक्या वर्षांनी अवंती भेटली पण ती तिच्या व्हिझिटर्समध्ये बिझी होती.. मी जायला निघालो तशी आली..

"आज संध्याकाळी भेटूयात? म्हणजे तुला वेळ असेल तर?"

"यस्स.. तुला चालणार असेल तर.."

तिचे घर शिवाजी पार्कवर होते.. गर्भश्रीमंत ती.. अशा कोट्यावधींच्या मालमत्ता मी स्वप्नातही पाहू शकत नव्हतो.. पण सुंदर साधे घर होते तिचे..

"बस की.."

"किती वर्षांनी भेटतेस.. यू लूक हॅपी .."

"अर्थात .. हॅपी ऑन माय टर्म्स.."

लग्न वगैरे केले की नाही हे विचारणार होतो.. पण गप्प राहिलो. ह्या हाय सोसायटीवाल्यांचे काय.. लग्नच नाहीतर एखादा डायव्होर्स ही झाला असायचा..

"काय घेणार..?"

"अर्थात कटिंग चहा.. काय दिवस होते नाही .."

"हो ना! काय दिवस होते.. बाकी आपण अभ्यास मस्त केलेला तेव्हा .."

"आपण काय? तू म्हण. माझी नय्या जेमतेम पार लागलेली.."

"पण नाऊ यू आर डुईंग सो वेल.. मला ठाऊक आहे.. बायको काय करते?"

"ती पण डीसीएच्.."

"कुठे भेटली?"

"कुठे काय? तिथेच.. कॉलेजात नाही.. प्रॅक्टिस सुरू केल्यावर .."

"ओह! लेट ब्लूमर!"

"आणि तुझं काय? कधी फुलला गुलमोहोर?"

"मी म्हटले होते आठवते तुला .. तसाच फुलला.. एक दिवस.. अरेंज्ड मॅरेज!"

"मला आठवते.. तू म्हणालेलीस.. डोळे मिटून अरेंज्ड मॅरेज ते! मग अगदी डबल ब्लाइंड स्टडी की काय?"

औषधशास्त्रात 'डबल ब्लाइंड स्टडी' म्हणून प्रकार असतो.. तो शब्द उसना घेत विचारले मी..

"अर्थात .."

"मग दिसत नाही तुझा लकी वन.."

"येतच असेल आता .."

"भेटलेच पाहिजे त्या नशिबवानास.."

"अरे, मी म्हणाले होते तसेच केले. हा मॅट्रिमनी कॉलममधला .. त्याने वा◌ॅटेड ब्राइड.. विथ ब्युटीफूल माइंड अशी जाहिरात दिलेली.. तिथेच अर्धा पसंत केला त्याला .. बाकी तू बघशीलच. पण आयॅम हॅपी.. मला सुंदरतेपलिकडे जाणून घेणारा.. किशोर माने.. नाव त्याचे.. खरे सांगू अगदी ब्लाइंड गेम झाला.. पण जिंकले मी.."

तिच्या नवऱ्याला बघायची उत्सुकता अजूनच वाढली माझी. अवंतीच्या पसंतीस पडला म्हणजे कुणीतरी चांगलाच असायला हवा.. म्हणजे मनाने..

इकडतिकडच्या गप्पा झाल्या.. थोड्यावेळात घराच्या दरवाज्यातून एक पांढरी काठी आत आली.. पाठोपाठ तो आला.. काठीने चाचपडत ..

.. अवंतीचा किशोर चक्क अंध होता..

"किशोर..गेस हू? स्पेशल वन.. माय कॉलेज फ्रेंड.."

"वाॅव! कोण?"

"तोच.. मी ज्याला सगळे सांगितलेले तो.."

"वाॅव! नाइस मिटिंग यू.."

किशोरनी अंदाजाने माझ्यापुढे हात केला..

रात्री आम्ही गप्पा मारत बसलो तिघे. किशोर फक्त डोळ्यांनी आंधळा होता.. पण त्याला सर्व गोष्टी बघण्याची एक नजर होती.. दिसणे आणि बघणे यातला फरक कळायचा असेल तर तो त्याला पाहून कळावा. त्यांचे लग्न ठरले ते अवंतीच्याच पद्धतीने. मग नवरा अंध म्हणून विरोध झाला.. पण अवंती ठाम होती..

"ही तुझी मैत्रीण राजकन्येसारखी आहे बघ .. लोकं म्हणतात.. शी इज ब्यूटिफूल.. मी तिला तसे तर पाहू नसतो शकलो कधी.. पण मला अशीच हवी होती.. समवन विथ ब्यूटिफूल माइंड.. बाकी बाह्यरूप काय.. आज आहे उद्या नाही .. खरं की नाही राजकन्ये?"

"हे राजकन्या काय?"

हे बोलताना अवंती त्याच्यासमोर चक्क लाजली..

"बरं बाई.. लाज कन्या! पण लाजू नकोस .. खरं तेच सांगतोय.. बरं.. राजकन्या नाही, शी इज अ क्वीन.. आणि तिला राणी म्हटले की मी आपोआपच राजा.. हो की नाही?"

"काहीतरीच लॉजिक तुझं .."

"अगं मी तुला माझ्या अंतर्चक्षूत पाहू शकतो सदा.. राणी अवंतिका बाई.."

किशोरला ती लाजल्याचे न बघताही जाणवले .. अजून कुठल्या डोळसपणाची गरज होती त्याला?

दोघे भेटले अवंतीच्या अटीप्रमाणे .. तेव्हा म्हणे अवंतीला ठाऊक नव्हते किशोरचे आंधळेपण.. पण बाकीच्या वरवर बघणाऱ्या डोळसांपेक्षा हा किशोरच तिला खरा डोळस वाटला असणार ..

जन्माला आलेली ती रूपाने राजकन्या खरी.. पण आता खरीखुरी राजकन्येची राणी झालेली..

एखाद्या साधारण रूप असणाऱ्याने 'रूपाचे काय एवढे' म्हणावे नि एखाद्या अप्सरेने तसे म्हणावे यात फरक तर आहेच.. अंगच्या गुणांपेक्षा रूपासाठी कौतुक होणारी अवंती .. खरेच इतकी


सुंदर नसती तर अशी आंतरिक सौंदर्याच्या शोधात गेली असती? काही असो, एका राजकन्या आपल्या आंतरिक सौंदर्याच्या जोरावर जणू राणी रूपमती बनून राज्य करताना दिसली.. मोठया समाधानाने मी किशोर आणि अवंतीचा निरोप घेऊन निघालो.

कित्येक प्रेमकथा वाचल्या, पाहिल्या.. 'लव्ह ॲट फर्स्ट साइट' वाल्या तर नुसत्याच सुंदर दिसण्यावरून सुरू होतात .. पण स्वतः सौंदर्याचा पुतळा असूनही स्वतःची वेगळी लव्हस्टोरी घडवणारी ही रूपमती.. राणी रूपमती..

डॉ. नितीन मोरे यांची ३० प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.







































डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या


भ्रष्टाचार


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे

छ..छ..म..

डॉ. नितीन मोरे
काही कविता


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
## डॉ. नितीन मोरे यांचे हे एकतिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही

परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३१), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(२) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची

आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "इ"यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।